९२०७६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ९२

# भिषग्वर्य लवंदे यांचें चरित्र

REFBK-0000183

गा. ब्र. कामत

भिषग्वर्य

# त्रिविक्रम प्रभु लवंदे यांचें चरित्र.

हें पुस्तक

**वै. वा. नारायण जगन्नाथ कामत**

यांनीं लिहिलें

तें

**कृष्ण जगन्नाथ थळी**

यांनीं

मुंबईंत 'कर्नाटक' छा० छा० प्रसिद्ध केलें.

आवृत्ति पहिली.

( सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधिन ठेविले आहेत. )

इ. सन १९०४.

किंमत १ रुपया.

स्थळ प्रत
म. ग्रं. सं. ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
...... नं. ९८
ग्रा. ............



श्रीमंत आत्माराम वासुदेव प्रभु देसाई.

( विस्कोंद दे पेडणें. )

हें पुस्तक

सद्गुणमंडित श्रीमंत रा. रा. आत्माराम वासुदेव प्रभु देसाई ( विस्कोंद दे पेडणें ) जे आपल्या अंगच्या ईश्वरनिष्ठा, परोपकारबुद्धि, निगर्वीपणा, विद्याभिरुचि इत्यादि गुणांमुळें

आणि

सुस्वभावानें व दयार्द्र अंतःकरणानें सर्वत्र प्रिय झाले आहेत

त्यांस

ग्रंथकर्त्यानें परवानगी घेऊन कृतज्ञतापूर्वक अति आदरानें नजर केलें आहे.

नारायण जगन्नाथ कामत.

REFBK-0000183

## प्रका[redacted]

यद्यद्विभूतिम[redacted]मेववा ।
तत्तदेवावगच्छत्वं [redacted] संभवम् ॥
(भ. गी.)

वरील भगवदुक्तीप्रमाणें पुरुषाच्या अंगीं कांहींतरी तशाच प्रकारचा ईश्वरीतेजांश असल्याशिवाय त्याचीं चरित्ररूपानें वगैरे अशीं अक्षय स्मारकें होणार नाहींत हें उघड आहे. तशा भाग्यशाली पुरुषांस व्यक्तिमात्रानें केवळ देवासमान मानिलें पाहिजे. कित्येक निर्मत्सर, सात्विक व भाविक लोक त्यांच्या तसबिरा परमप्रेमानें पूजेला लावतात. अशा अलौकिक पुरुषांची योग्यता वर्णन करावी तेवढी थोडीच आहे. परंतु आमच्या गोमांतकांतील व्यक्तिमात्रांस मात्र अंगच्या अज्ञानामुळें व आळसामुळें अशा महात्म्यांची योग्यता समजून येत नाहीं. यदाकदाचित् समजलीच तर तिकडे त्यांचें अगदींच दुर्लक्ष्य होतें आणि अशामुळेच आजपर्यंत आमच्या गोमांतकांत होऊन गेलेले **महेश्वर भट्टां**सारखे ग्रंथकार व टीकाकार, **जिवबा दादा बक्षी** यांच्यासारखे रणशूर व मुत्सद्दी अशा सुप्रसिद्ध नररत्नांचीं स्मारकें त्यांनां करावीशीं वाटत नाहीं, हें त्या प्रांताचें दुर्भाग्य होय. ज्यांच्या गुणातिशयाचें कौतुक अन्य प्रांतांतील विद्वान् करितात, त्यांच्याबद्दल पुष्कळसा मत्सर मात्र ह्या प्रांतांत दृष्टोत्पत्तीस येतो. सद्सद्विचारी लोक तो करित नाहींत हें खरें, तथापि उदासीन राहतात. एवंच स्वाभिमानशून्यता आणि आळस ह्या दोषतरी त्या सर्वांवर येतोच.

गोमांतकांतील अशा गुणाढ्य पुरुषांचीं स्मारकें करून आपलें कर्तव्यकर्म बजावावें असें वाटणारे जे थोडेबहुत पुरुष आज हयात आहेत, त्यांपैकींच प्रस्तुत चरित्र ग्रंथाचे कर्ते आ. एक होते. हें एक पुस्तक बाहेर पडल्यावर बाकीच्या तशाच प्रार्थ. पण ह्याधुनिक पुरुषांच्या चरित्रांबद्दल खटपट करण्याची त्यांची फारशी शिफा होती; परंतु ईश्वरी·

संकेत कांहीं निराळाच दिसला, तेथें कोणाचा इलाज नाहीं ! हें चरित्र लिहून तयार करण्यांत पुष्कळ अडचणी आल्या; परंतु कर्त्यांनीं त्यांकडे दुर्लक्ष्य करून दृढनिश्चयानें तें काम पार पाडिलें. परंतु, शेवटीं हें पुस्तक छापून तयार होत असतां ह्मणजे लेखकाच्या आनंदाच्या ऐन भरावर त्यास इहलोकची आपली यात्रा आटपावी लागली !! हरहर!! लेखकास आपल्या श्रमाच्या फलाचा उपभोग घेऊंदेण्याची जगपालकाच्या मनांत इच्छाच नसावीसें दिसतें !

आधींच कर्त्याचें शिक्षण व जन्मभाषा गोमांतकी. त्यांत पुस्तक लिहिण्याचा हा त्याचा पहिलाच प्रसंग होता. याकारणांमुळें या पुस्तकांत हरएक प्रकारांनीं अनेक दोष असण्याचा संभव आहे. तरी सुज्ञ व गुणज्ञ वाचकांनीं त्यांकडे दुर्लक्ष्य करून कर्त्याच्या सद्धेतुकडे लक्ष्य द्यावें, अशी सर्वांना माझी सविनय प्रार्थना आहे.

आज हें पुस्तक पुष्कळ अडचणींतून बाहेर पडून प्रसिद्ध होत आहे, याबद्दल मला अत्यंत आनंद व अभिमान वाटतो. व याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानितों. आपले समाजहितचिंतक पुरुष उत्तरोत्तर आपलीं कर्तव्यकर्में अशाच प्रकारें करून घेओत व दयाळू परमात्मा त्यांच्या मनांत सदसद्बुद्धीची प्रेरणा करो, असें मी वारंवार इच्छितों.

प्रकाशक.

# प्रस्तावना.

**गोमांतकदेश** ह्मणजे पुराणप्रसिद्ध पुण्यक्षेत्र आहे. आर्यभूमीचा हा एक भाग असल्यानें ही स्वर्णभूमिहि आहे, हें निराळें सांगणें नकोच. रत्नाकरासन्निध असलेल्या या पुण्यभूमींत इतर रत्नांबरोबर नानाप्रकारचीं अमोल्य नररत्नेंहि आहेतच. पारख करणारे रत्नपारखीच पाहिजे आहेत. या देशांत तानाजी मालुसऱ्यासारखे आपल्या मातेस वीरमाता ह्मणविणारे क्षात्रतेजसंपन्न शूरवीर पुरुष आहेत; राजर्सीच्या पाण्याप्रमाणें शस्त्रांस पाणी देणारे व तसलींच नानाप्रकारचीं कामें करणारे कारागीर आहेत; मनांत आणलें तर स्वदेशाचें दारिद्र्य दूर करण्यास समर्थ असे लक्ष्मीपुत्र आहेत; आणि ते कृपण नसून औदार्यसंपन्न व रसिक असेहि आहेत. '**गोंयबाबू**' हें स्वदेशबांधवांचें अपमानकारक उपपद मागें सारून क्षणभर **बंगाली बाबूंस**हि मान डोलवावयास लावणारे बुद्धिमान पुरुषहि आहेत; संगीतनाट्यकलेचे उत्पादक ह्मणून सर्व हिंदुस्थान देशभर नांवाजलेल्या कै. वा. **अण्णा किर्लोस्करां**सारख्या कवींनां आपल्या प्रासादिक कवित्वानें मोहून टाकणारे व त्यांच्यांत संगीत नाटकाची प्रथम स्फूर्ति उत्पन्न करणारे व त्यांचे विनंतीवरून त्यांस आपल्या हातानें प्रसादाचा नारळ देणारे साधू व कविहि येथेंच झाले.* त्याचप्रमाणें मृत्यूच्या जबड्यांत ओढून नेणाऱ्या महारोगांचें निर्मूलन करणारे धन्वंतरीहि पण गोमांतकांत आहेत, आणि

---

*हे साधू व कवि गोमांतक डोंगरी येथील **कृष्ण जगन्नाथ भट्ट बांदकर** हे होत. कविवर्य **अण्णासाहेब** हे क्रॉफर्ड साहेबांबरोबर गोव्यांत आल्यावेळीं डोंगरी येथें श्रीरामाच्या उत्साहार्थ वार्षिक नाटकें चाललीं होतीं तेव्हां मित्रमंडळीबरोबर तेथें गेले होते त्यांनां तीं फारच पसंत वाटून सदरहू नाटकमंडळी घेऊन मुंबईस आपल्याबरोबर येण्याबद्दल अण्णांनीं भटजी महाराजांनां शिफारस केली. पण तीं नाटकें पैसे मिळविण्याकरितां केलीं नसल्यामुळें अर्थातच त्या शिफारसीचा कांहीं उपयोग झाला नाहीं हें पाहून सदरहू नाटकें आपणासतरी मिळावीं ह्मणून त्यांनीं

ते रामदास स्वामींनीं 'जैसा वैद्य दुराचारी। केली सर्वस्वें बोहरी। आणि शेखीं भीड करी। घात घेणार ॥' (दासबोध–स० ५ द० २ ओ० २६) या ओवींत दर्शविल्याप्रमाणें नाहींत, हें सांगण्यास मोठा आनंद व अभिमान वाटतो. ह्या गोष्टी निर्मत्सरपणानें व बारकि रीतीनें शोध करणाऱ्या चाणाक्ष पुरुषांच्या ध्यानांत आल्यावांचून रहाणार नाहींत. चांगला शोध न करणाऱ्या सामान्य वाचकांस यांत कांहीं अतिशयोक्ति वाटेल तर त्यास उपाय नाहीं. परंतु, इतकें असूनहि हा देश सर्व कामांत मागसलेल्यासारखा कां बरें दिसतो, असा एक प्रश्न उद्भवणें साहजिक आहे. त्याचें उत्तर प्रापंचिक व पारमार्थिक रीतीनें असें दोन तऱ्हेनें देतां येईल.

प्रापंचिक रीतीनें उत्तर ह्मणजे अंगच्या स्वाभाविक गुणांचा विकास करून मनुष्याच्या बुद्धीला व्यापकपणा आणणारें '**शिक्षण**' येथें दिलें जात नाहीं, त्यामुळें जो तो आपापल्यापुरता पहाणारा अर्थात् दुसऱ्याच्या ह्मणजे आपल्या देशबांधवांच्या हिताकडे दृष्टी न देणारा असा बनलेला आहे. याचाच अर्थ परस्परांचें अहितचिंतिणारा त्यांचा स्वभाव बनला आहे ह्मटल्यास हरकत नाहीं. द्वेषमत्सरादिविकार अज्ञानजन्य आहेत आणि अज्ञान हें सुशिक्षणाच्या अभावामुळें उत्पन्न होतें. आतां सुशिक्षण ह्मणजे देशी शाळांतून किंवा कॉलेजांतून शिक्षण मिळतें तेंच केवळ नव्हे; कारण, तसें असतें तर पुण्यासारख्या शहरांत श्रेष्ठश्रेष्ठ सरस्वती भक्तांमध्यें इतका परस्पर मत्सर व दुफळी वागली नसती. आतां त्या शिक्षणानें, त्यांनां आपण कोण, पूर्वीं आपली स्थिति होती कशी, आतां आहे कशी व अशाच रीतीनें डोळे झांकून चाललों तर ती पुढें

---

मोठी भीड खर्च केली; परंतु त्या नाटकांचा उद्देशच निराळा असल्यामुळें तीं थिएटरांत करून पैसे मिळविण्याकरितां मुळींच दिलीं जाणार नाहींत, असा साफ जबाब मिळाला. शेवटीं आपल्या हातचा आशीर्वाद युक्त प्रसादतरी मिळावा अशी विनंति केल्यावरून भटजी महाराजांनीं देवासमोर उभें राहून गाऱ्हाणें घालून मोठ्या आदरानें किर्लोस्करांनां नारळ व पुष्पप्रसाद दिला. त्यानंतर किर्लोस्करांनीं नाटकें रचून स्वतंत्र कंपनी काढली, ही गोष्ट जगप्रसिद्ध आहे.

होईल कशी, देशावर आपला हक्क काय आहे व राज्यकर्त्यांशीं आपलें कर्तव्य व संबंध कोणता आहे, इत्यादि गोष्टी करूं लागल्या आहेत. परंतु याचादेखील गंध येथें नाहीं.

दुसरें पारमार्थिक कारण जें सर्व देशीं सारखेंच लागू आहे म्हटल्यास चालेल, तें हें कीं, आपल्या सदिच्छेला, बुद्धिमत्तेला, कर्तृत्वाला अथवा प्रयत्नाला, धैर्य, शौर्य, चातुर्यादि अंगच्या गुणाला गुप्त रीतीनें यश पुष्टी देणारें जें स्वधर्माचरणजन्य तपोबल तें अगदीं कमी आहे. अलीकडील विद्वानांच्या किंवा राजकारस्थानी पुरुषांच्या शुभेच्छेला अथवा प्रयत्नाला यश येत नाहीं याचेंतरी कारण दुसरें काय आहे बरें? देशांत सर्वत्र स्वधर्माची अनास्था चालू असल्यामुळें उद्धारकशक्तीला तद्विरुद्ध शक्तींचा अवरोध होतो. या परस्परविरुद्ध शक्ति आपल्या योगबळानें आवरून धरणारा एखादा महात्मा पुरुष-**शिवाजी**सारखा-कोणी उत्पन्न झाल्याशिवाय हल्लीं असलेल्या स्थितींत देशोद्धार होणें कठीण आहे. सुख किंवा यश हें अंगच्या पराक्रमावर, तिजोरींतल्या द्रव्यावर, शरीरांतल्या बळावर किंवा डोक्यांतल्या बुद्धिमत्तेवर अवलंबून नाहीं. तर तें फक्त ईश्वरीकृपेवरच अवलंबून आहे. त्याच्या कृपेवांचून बहुगुणी मनुष्य अवगुणी होतो व कृपेनें अवगुणी मनुष्य जगांत बहुगुणी ठरतो. यासाठीं आपल्या गुणाचें तेज पडण्याकरितां कल्याणेच्छू पुरुषानें ईश्वरकृपेचीच प्रार्थना केली पाहिजे व त्याची कृपा होण्याकरितां त्यास भजलें पाहिजे. ज्ञानेश्वरींत यासंबंधानें भगवंतांनीं पुढील उद्गार काढले आहेत:—

**जेथ चहूंकडे जळत वणवा। तेथूनि न निगिजे केंविं पांडवा।**
**तेविं लोकां येऊनि सोपद्रवा। केविं न भजिजे मातें?॥**
**अगा मातें न भजावयालागीं। कवण बळ पां आपुलिया**
**आंगीं। काइ घरीं कीं भोगीं। निश्चिंती केली?॥**
**नातरी विद्या कीं वयसा। यथ प्राणियांसि हा पैसा।**
**मज न भजतां भरंवसा। सुखाचा कोण?॥**

(अ. ९ वा. ओ. ४९२।९३।९४.)

सर्व सुखाचा आगर परमेश्वर असल्यामुळें आपणास इष्ट सुख मिळणें हें त्याच्याकडूनच मिळालें पाहिजे आणि जें थोडेंबहुत प्रत्येकास मिळालेलें आहे अगर मिळतें तें त्याच्याच कृपेचें फल होय, हें निर्विवाद समजावें. आतां त्याची कृपा संपादन होण्यासाठीं त्याला भजण्याचे जितके ह्मणून प्रकार सर्व धर्मांत सांगितले आहेत त्या सर्वांस 'तप' असें ह्मणतात. तेव्हां सौख्य हें ज्याच्यात्याच्या पूर्वापर तपावर अवलंबून आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ऋषींचाहि सिद्धांत हाच आहे. शारीरिक बळ, द्रव्याचें बळ अथवा विद्येचें बळ हीं तपोबलावांचून व्यर्थ होतात. 'नशीब' अथवा 'प्रारब्ध' ह्मणून जें ह्मणतात तेंच आपलें अदृश्य असें तपःशक्तीचें कार्य होय. याकरितां प्रत्येकानें आपली तपःसंपत्ति वाढविण्याविषयीं व असलेली कमी न होऊं देण्याविषयीं फार जपलें पाहिजे. पापाचरणानें तपःसंपत्तीचा ऱ्हास होतो व पुण्याचरणानें तपःसंपत्ति वृद्धिंगत होते. कोणी तप ह्मणजे अरण्यांत अथवा डोंगरावर वगैरे बसून ऊनपाऊस सोसून करावें लागतें असें समजतील, तर तसें नव्हे. घरीं बसल्याबसल्या करतां येणारें निष्काम स्वधर्माचरण हेंच उत्तम तप होय. पूर्वींचे राजे व समाजधुरीण पुरुष आपली व आपल्या देशाची तपःसंपत्ति बाह्य संपत्तिपेक्षां फार काळजीनें रक्षण करित असत, ह्मणूनच दुःख, दारिद्र्य, दुष्काळ, दुर्व्याधी व दुस्मान इत्यादिकांची बाधा देशास बहुधा होत नसे. कुटुंबाचेंदेखील असेंच आहे. जोंपर्यंत त्यांत असत्य, अनीति, व्यभिचार, कलह, कपट इत्यादि तपःसंपत्तीचा नाश करणारीं कारणें कोणाहि दुष्टांच्या संगतीनें अथवा कामक्रोध लोभादि दुष्ट मनोविकारांच्या योगानें शिरलीं नाहींत, तोंपर्यंत कुटुंबलक्ष्मी तेथून हालत नाहीं. व वर सांगितलेल्या कारणांपैकीं एखादें कारण जरी त्यांत शिरलें तरी तेवढेंच त्या कुटुंबाचा नाश करून टाकतें. याचीं उदाहरणें डोळे उघडून सृष्टीकडे पाहिलें ह्मणजे हवीं तेवढीं सांपडतील.

**चिंतासे चतुराई घटे, दुःखसे घटे शरीर,**
**पापसे घटे लछमी, कहते दास कबीर. १**

चिंता प्राप्त झाली असतां डोक्यांतलें शहाणपण नाहींसें होतें; दुःख किंवा कष्ट सोसावे लागले ह्मणजे शरीर क्षीण होतें; पापाच्या योगानें लक्ष्मी दूर जाते. असें महानुभव कबीरदास ह्मणतात. आतां कोणी ह्मणतील कीं, पुष्कळ धनिक लोक पापाचरणी असून ते कसे सुखी आहेत, आणि पापाचरणानेंच पुष्कळांची संपत्ति वृद्धिंगत कशी झालेली आहे? तर ती पापलक्ष्मी असून वंशाचा नाश करणारी आहे, असें समजावें. जुनीं पुराणें एका बाजूस राहोत, परंतु अलीकडील पेशव्यादिकांचींच राज्यें घ्या. श्रीमदानें उन्मत्त होऊन राज्यांत असत्य, अनीति, व्यभिचारादि पापाचरण चालविल्यामुळेंच त्यांनां राज्यलक्ष्मीनें सोडून दिलें.+ ह्याचेउलट शिवाजी राजाचें पहा. मातृभक्ति, गुरुभक्ति, ईशभक्ति, स्वधर्मभक्ति, स्वदारनिष्ठा, गोब्राह्मणभक्ति व भूतदया इत्यादि अनेक पुण्याचरणाच्या तपामुळेंच ते आपल्या पश्चात् जयंति करून घेणाच्या मानास पात्र झाले. विद्वान् इतिहासकार शिवाजीच्या उत्कर्षाला व पेशव्यांच्या अपकर्षाला राज्यकारस्थानपटुत्व व मूर्खत्व अशीं अनुक्रमें कारणें लावितील व तीं अक्षरशः खरींहि आहेत; तथापि त्या कारणांच्याहि पलीकडे जेव्हां ते दृष्टी देतील तेव्हां आमच्या विधानाची सत्यता त्यांस समजून येईल. याचा अर्थ एवढाच कीं, तपोविशुद्ध अंतःकरणामध्यें सहजपणानें सत्यकल्याणकारक सद्बुद्धींचाच उदय होतो व अविशुद्ध अंतःकरणामध्यें याच्या उलट ह्मणजे दुर्बुद्धीचा उदय होतो. कदाचित् क्षणभर सद्बुद्धीचा उदय झाला तरी निश्चयपूर्वक तसें आचरण होत नाहीं; अनेक संशय उत्पन्न होतात व त्या संशयामुळें नाश हा ठेवलेलाच असतो. सदाचरणी तपःसंपन्न पुरुषांच्या अंतःकरणांत दूरदर्शित्वानें युक्त, यशस्कर सद्बुद्धींचा उदय होऊन त्याला जगांतील तसल्याच गुप्तशक्ति येऊन मिळतात. वातावरणांतील त्या शक्ति आकर्षण करण्याचें सामर्थ्य तपाच्या योगानें त्यांच्यांत उत्पन्न होतें. सारांश, ईश्वरकृपेनें अघटित तेंहि घडून कार्यसिद्धि होते. पुराणांतदेखील हिरण्यकश्यपू, रावणासुर वगैरेंनां जें राज्य जें सामर्थ्य

व जें वैभव मिळालें होतें, तें त्यांच्या पूर्वीच्या तपामुळेंच नव्हे काय ? आणि मग त्यांच्या नाशासतरी कारण काय झालें ? हिंसा, गोब्राह्मणछळ परदारासक्ति इत्यादि. याकरितां प्रत्येक समाजधूरिणानें अथवा राष्ट्राधिपतीनें समाजांत अथवा राष्ट्रांत तपोवृद्धि करण्याबद्दल फार काळजी घेतली पाहिजे. असो.

आतां आपल्याविषयीं बोलावयाचें ह्मणजे हल्लींच्या स्थितींत व परकीयांच्या अमलांत आपल्या **गोमांतक** देशाची सुधारणा कशी करावी, विद्यावृद्धीचा पाया कसा घालावा, तपोवृद्धि कशी करावी आणि दयाळू पोर्तुगीज सरकारच्या कायद्यांचा फायदा कसा करून घ्यावा, याबद्दलच्या सूचना माझ्यासारख्यानें करणें ह्मणजे लहान तोंडीं मोठा घांस घेणें होय. समाजधुरीण महज्जनांनींच तें काम मनावर घेतलें पाहिजे, ह्मणजे सहज होणार आहे. आपलें रोजचें काम थोडें एका बाजूस ठेवून याच कामाचा विचार करण्याकरितां ह्मणून त्यांनीं एकत्र जमलें पाहिजे, कार्यक्षमशक्ति कांहीं जगांतून आजच नाहींशी झाली नाहीं. ती वादळांत सांपडून फुटलेल्या तारवाप्रमाणें इकडेतिकडे शिंपडलेली आहे. देशांतील महज्जन चांगल्या बुद्धीनें जेव्हां एकत्र जमतील तेव्हां ती शक्तिहि एकत्र होणार आहे. तशी बुद्धि त्यांनां उत्पन्न होईल तो सुदिन समजावयाचा. परंतु, 'जेवीन तर तुपाशीं नाहीं तर उपाशीं !' असें न ह्मणतां आपल्या हातून होईल ती देशसेवा करण्यास पुढें सरणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. त्याप्रमाणें मींहि मातृभूमीची सेवा ह्मणून हें अल्पसें कार्य केलें आहे. आपल्या मातेचें नांव आपल्या सोज्वल कर्तृत्वानें वर काढणारे पुत्र तिला अत्यंत प्रिय असतात. तेव्हां त्यांचें यश गाणें हें तिला अत्यंत प्रिय होणारच. याकरितां त्यांचें चरित्रवर्णन करणें ह्मणजे ईश्वराचीच सेवा करणें होय, असें जाणून हा प्रयत्न मीं केला आहे, तो तत्प्रीत्यर्थ होओ **'वेडें वांकडे गाईन । परि तुझा ह्मणवीन ॥'** हाच न्याय येथेंहि असल्यामुळें विद्वज्जनांनीं भाषेच्या वगैरे दोषांकडे लक्ष्य न देतां फक्त हेतूकडेच लक्ष्य देऊन सेवा पदरांत घ्यावी, एवढीच प्रार्थना आहे.

महज्जनांची सेवा महज्जनांलाच अर्पण झाल्याशिवाय ती निर्दोष होणार नाहीं. याकरितां आपले धीरोदार रसिकवर्य श्रीमंत **आत्माराम वासुदेव प्रभु देसाई विस्कोंद दे पेडणें** (पेडणें महालचे व्हाइकाउंट) यांजकडे हें पुस्तक त्यांस नजर करावें या हेतूनें परवानगी मागण्यास गेलों, तों त्यांनीं पुस्तक वगैरे पाहून उदार बुद्धीनें व प्रेमानें मला ती दिली, याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें. तसेंच पणजी शहरचे सुप्रसिद्ध गृहस्थ **श्रीमंत विष्णु गिरिधर शेणवी धेंपे** यांनीं मदत केली व कालापुरचे सुप्रसिद्ध गृहस्थ रा० रा० **रघुनाथ** उर्फ **अनंतप्रभु** नाचनोडकर यांनीं फारफार मेहनत घेऊन पुस्तकप्रसिद्धीच्या कामीं उत्तम साह्य केलें, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. आमचे सच्छील, सद्गुणी, धर्मनिष्ठ व ईशभक्तिपरायण रसिक मित्र रा० रा० **रामचंद्र कृष्णराव कामत चंदगडकर** यांनीं हें पुस्तक तपासून शुद्ध करण्याच्या कामीं आपला अमोल्य वेळ खर्चून जे अत्यंत परिश्रम घेतले व ज्या अनेक उपयुक्त सूचना केल्या, त्याबद्दल मी त्यांचा फारफार आभारी आहें. माझे परमप्रिय भाचे चि० **कृष्ण जगन्नाथ थळी** यांनीं या पुस्तकाचा मूळ पाया मोठ्या उत्सुकतेनें घातला होता व पुस्तक प्रसिद्ध होण्याबद्दल त्यांची फारच इच्छा होती. त्याप्रमाणें आज हा योग परमेश्वरानें जुळवून आणिलेला आहे, त्याबद्दल मी परमेश्वराचा अत्यंत आभारी आहें. त्याचप्रमाणें रा० रा० **रघुनाथ पांडुरंग पई** राइकर यांनीं वैद्यराजांसंबंधानें कांहीं माहिती पाठवून दिली व रा. रा. **श्रीनिवास प्रभु लवंदे**, रा० रा० **बाबू वामन कामत रेडकर** आणि रा० रा० **त्रिविक्रम शामु शेणवी सिलीमखान** यांनीं कांहीं वर्गणीदार मिळवून दिले, याबद्दल मी त्यांचाहि आभारी आहें.

शेवटीं, सर्व बुद्धिदात्या परमेश्वराचे चरणीं सहस्रशः प्रणाम करून त्याचे परम आभार मानून व देशबांधवांचे ठिकाणीं स्वाभिमान व स्वधर्मनिष्ठा जागृत करण्याविषयीं त्याची प्रार्थना करून हा प्रस्तावना लेख पुरा करितों.

**विशेष सूचना**—गोमांतक महाशेल येथील प्रसिद्ध टीकाकार कै० **महेश्वर भट्ट**, केरी येथील प्रसिद्ध रणशूर कै० **जिवबा दादा बक्षी**, व गोवा, डोंगरी येथील प्रसिद्ध साधू वै० **कृष्ण जगन्नाथ भट्ट बांदकर**, यांचींहि चरित्रें लिहिण्याचा माझा प्रयत्न चालू आहे. कोणीहि यांजबद्दल खात्रीलायक माहिती पाठविल्यास आभारपूर्वक स्वीकार केला जाऊन त्यांचा पुस्तकांत समावेश केला जाईल. हा माझा मनांतील हेतु ईश्वर पूर्ण करो.

गोवा–हणजूण
शके १८२५, शोभननामं संवत्सर,
जेष्ठ कृष्ण १२, सोमवार.

पुस्तक कर्त्ता
**नारायण जगन्नाथ कामत.**



भिषग्वर्य त्रिविक्रम प्रभु लवंदे.

स्थळ प्रत
म. रं. सं. अथे.

# रा. रा. त्रिविक्रम प्रभु लवंदे यांचें चरित्र.

## ओ३म् परमात्मने नमः

* भ्रांता वेदांतिनः किं पठथ शठतयाद्यापि चाद्वैत विद्यां
पृथ्वीतत्त्वे लुठंतो विमृशथ सततं कर्कशास्तार्किकाः किं।
वेदैर्नानागमैः किं ग्लपयथ हृदयं श्रोत्रियाः श्रोत्रशूलै—
र्वैद्यं सर्वानवद्यं विचिनुत शरणं प्राणसंप्रीणनाय ॥ १ ॥

ह्या श्लोकांत उत्तम तऱ्हेचा अलंकार साधण्यासाठीं इतर शास्त्रांना गौणपक्ष दिला असला, तरी ह्यांत खरोखर वैद्यशास्त्राचा उपयोग व वैद्याची महति फार सुंदर रीतीनें व्यक्त केली आहे. अनादि कालापासून तों तहत् आज तागायत, कोणतीहि अशी देशकालस्थिति सांपडणें कठीण, कीं, जींत औषधांची व वैद्यांची जरूर नाहीं. राजा असो रंक असो, बाल असो तरुण असो, वृद्ध असो, पुरुष असो कीं स्त्री असो, औषध व वैद्य ह्यांची सर्वत्र आवश्यकता आहे, हें निर्विवाद होय. जगतावर वैद्य हे प्रतिस्रष्टेच आहेत. मात्र ते दूरदर्शी, तर्कज्ञ व चांगले अनुभविक पाहिजेत. तरच त्यांच्या

---

* "हे वेदांत्यांनों! तुह्मी खुळे आहांत. लोकांनां ठकविण्याची अद्वैतविद्या कशाला शिकतां? हे कर्कशशब्दी तर्कशास्त्र्यांनों! तुह्मी स्वतः मृन्मयतत्वांत लोळून रात्रंदिवस विचार हो कसला करतां? लोकांच्या कानठाळ्या बसविणाऱ्या वैदिकांनों! नानाशाखायुक्त वेद घोकून छातींतून रक्त कां पाडून घेतां? सर्वांहून निष्कलंक असा जो वैद्य त्याला शरण जाऊन प्राणसंरक्षणाची तजवीज आधीं पहा."

हातून वैद्यक्रियेचें काम उत्तम रीतीनें पार पडून ते लोकादरास पात्र होतील. मोठमोठे शास्त्री, मोठमोठे पुराणिक, मोठमोठे ज्योतिषी किंवा मोठमोठे चित्रकला अथवा गायनकला-भिज्ञ, हे, रोगी मनुष्या-जवळ वसून मोठ्या आढ्यतेनें अनेक तत्वविचाराच्या, अनेक वेदां-ताच्या, आकाशांतील अनेक ग्रहांच्या गतीसंबंधाच्या, अनेक कला कौशल्याच्या किंवा गायनांतील रागरागिणींच्या वगैरे फुशारकी मारीत, पण त्या रोगी मनुष्यास त्यांचा यत्किंचितहि फायदा न होतां त्यास ह्या मायामय प्रपंचाला कदाचित् शेवटचा रामरामहि ठोकावा लागेल. याकरितां वैद्यांची समाजांत सदासर्वदा फार आवश्यकता आहे. आतां ज्या वैद्यांस नाडीज्ञान नाहीं, रोगाचें निदान समजण्याचें शहाणपण नाहीं, मात्रा, रसायनें, भस्में इत्यादिकांच्या क्रियेची ओळख नाहीं, अशा वैद्यांस नाकाडोळ्यांच्या वैद्यमालिकेंत सामील करण्यास हरकत नाहीं व अशा वैद्यांचें औषधसेवनापासून रोगी वहुतकरून चांगला न होतां आपल्या अमोलिक प्राणासहि मुकाव-याचा. ह्मणून चांगल्या अनुभविक, निरपेक्ष, कृपाळू व धैर्यवान अशाच वैद्याकडचें औषध घेतलें पाहिजे. नसल्यास भलताच परि-णाम होण्याचा संभव असतो. तात्पर्य हेंच कीं, जगांत प्रपचसुखार्थ जे अनेक तऱ्हेचे उद्योगधंदे चालू आहेत, त्या सर्वांत वैद्यकलेचें महत्व विशेष आहे. कारण यामध्यें प्राणदान दिल्याचें श्रेय मिळून त्यायोगें हजारों लोक उपकारबद्ध होतात आणि अशा योग्यतेचे वैद्य सर्वत्र वंदनीय होऊन त्यांचे लोक पोवाडे गातात.

हा क्षणभंगूर नरदेह इहपरलोकची यात्रा सुखकर करण्याच्या उपयोगीं पडावा यासाठीं प्रत्येक मनुष्यानें प्राणसंरक्षण, ज्ञानार्जन, धनार्जन व धर्मार्जन करण्याकडे आपल्या अंतःकरणाची प्रवृत्ति केली पाहिजे. या सर्वांत प्राणसंरक्षण किंवा आरोग्यलालसा ( दीर्घ जीविताची इच्छा ) हिचें विशेष प्राधान्य आहे व तीच सर्वां अगोदर पाहिजे आहे. कारण हिचेवरच इतर सर्व सुखें व पुरुषार्थ अवलंबून आहेत. देहांतून प्राण निघून गेल्यावर अगर रोगांमुळें तो

निःत्राण झाल्यावर सर्व कांहीं निरुपयोगी होऊन द्रव्य प्राप्त करून घेण्याकरितां आपण केलेलीं साधनें त्याचप्रमाणें ज्ञान व धर्मसंचयार्थ मनीं वसत असलेली इच्छा इत्यादि सर्व जागच्या जागीं राहतात. ह्मणून प्रत्येक निरोगी मनुष्यानें आपलें आरोग्य अढळ राखण्याचा यत्न करणें व रोग्यानें आपली प्रकृति औषधोपचारानें उत्तम रीतीनें सुधारणें हें जन्मांतील कर्तव्यांपैकीं आद्यकर्तव्य होय. प्रपंचशकट सुरळितपणें चालण्याकरितां ज्ञानार्जन व त्यामागून 'धनार्जन' करणें हें दुसरें कर्तव्य होय. कारण संसारांत द्रव्यावांचून कांहींच चालावयाचें नाहीं. पण तें न्यायमार्गानें मिळविलें पाहिजे. यानंतर 'धर्मार्जन' अर्थात् परलोक–मोक्षसाधन करणें, हें तिसरें व मनुष्य जन्मांतील मुख्य कर्तव्य होय. वरील तीन्हीं कर्तव्यें ह्मणजे चारी पुरुषार्थ साधून ज्यांनीं आपलीं नांवें सोज्वळ करून दिगंत कीर्ति गाजविली, तेच पुरुष लोकांनां अनुकरणीय होतात.

सर्वज्ञ जगच्चालकाच्या परम कृपेनें, जगाच्या चढाओढींत व उलाढालींत प्राणीमात्राकडून आजवर स्वपरसुखार्थ जे अनेकविध पुरुषार्थ घडून आले व येत आहेत, त्या सर्वांचा रोंख ऐहिक व पारलौकिक हित साधण्याकडे होता व आहे. त्यांतहि ऐहिक सुखसाधन करित असतां पारलौकिक सुखसाधन जोडणें याचें महत्व अधिक असतें. '**प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्यानें केला तो नर भला!**' ह्या साधूक्तीचाहि अर्थ तोच आहे. आतां प्रपंच रहाटींत वर्तत असतां पारमार्थिक हित कसें जोडावें, ह्याबद्दल आर्य लोकांचे वेद, ख्रिस्ती लोकांचें बायबल, मुसलमानांचें कुराण किंवा पारशी लोकांचा झेंदावेस्ता इत्यादि पृथ्वीवर जेवढे ह्मणून धर्मग्रंथ प्रसिद्ध आहेत, ते धुंडाळून पाहिले असतां परस्पर अविरुद्ध व सर्वव्यापक असें एकच नीतितत्व आढळून येतें. तें हें कीं '**जरी तुज व्हावा देव। तरि हा सुलभ उपाव॥ तुका ह्मणे फार। थोडा करीं पर उपकार॥**' जे सत्पुरुष आपल्या जीविताकडेहि दुर्लक्ष्य करून कायावाचामनेंकरून दुसऱ्याचें कल्याण करण्यास झटतात, ते लोकांस खरोखर देवासमान

पूज्य होतात. असे जे कोणी पुरुष बहुजन पदहित साधण्यास कायावाचामनेंकरून निरपेक्ष बुद्धीनें झटले व झटत आहेत, त्यांतच आमच्या चरित्रनायकांची गणना असल्यामुळें, त्यांचें संक्षिप्त चरित्र आह्मीं येथें सादर करितों.

*गोव्याची हल्लींची राजधानी जें **पणजी**† शहर त्या पासून

* 'गोमांतक हा देश प्राचीन काळापासून प्रख्यात आहे. परशुरामानें कांहीं ब्राह्मण गौड देशांतील त्रिहोत्र नामक नगरांतून आणून त्यांची येथें स्थापना केली आणि त्यांस येथील सर्व अधिकार दिला, यावरून त्यांनीं कांहीं काळपर्यंत स्वतंत्र राज्य केलें असावें. ह्या ब्राह्मणांची राजधानी मठग्राम हें शहर होतें. या ठिकाणीं परशुरामस्थापित मठ होता, ह्मणून यास मठग्राम हें नांव पडलें आहे.'—गो. इ.

† इ. स. १५१० त फिरंगी लोकांनीं 'गोवें' शहर आपल्या हस्तगत करून घेतलें. तेणेंकरून दिवसेंदिवस ह्याची विशेष आबादानी होऊन त्या लोकांनीं आपलीं देवळें, मठ, धर्मसंबंधी मोठ्या टोलेजंग इमारती बांधून त्यास फार रमणीय स्वरूप आणलें. पण कालचक्राच्या भयंकर झपाट्यापुढें कोणाचा इलाज आहे? ह्यांत महामारीबाईनें १५७० त आपलें अति भयानक स्वरूप प्रगट करून असंख्य मनुष्यांचे बळी घेतले. शहरांतील विहिरींचें पाणि इतकें नासलें कीं, त्यापासून लोकांस उदररोग होऊन पुष्कळ लोक मृत्युमुखीं पडूं लागले व अशा भयंकर रोगांत येथें राहून आपला बचाव होणें कठीण असें लोकांस वाटून त्यांस अन्यदेशीं पळून गेल्याशिवाय दुसरा मार्गच राहिला नाहीं. अर्थात् ह्यांतील राजश्री विलयास गेली, मोठमोठ्या भव्य व सुंदर इमारतींचा फडशा उडाला व ह्या कारणानें हें शहर सांप्रत अरण्यमय होऊन गेलें आहे. थोड्या इमारती मात्र सध्या सुरक्षित आहेत. शेवटीं ता० १ माहे दिसेंबर सन १७५९ त आपला सर्व कारभार फिरंगी लोकांनीं पणजी येथें नेऊन तें आपलें राजधानीचें शहर केलें. हा गांव पूर्वी सर्व डोंगराळ असून ह्यांत गरीब लोकांची वस्ती होती. येथीलहि कांहीं ठिकाणचें पाणी खारट व रोगट असल्यामुळें तें सेवन केल्यापासून ताप येत असे. पण सांप्रत आमच्या दयाळू सरकारानें ह्या शहराची सुधारणा फार उत्तम तऱ्हेनें केली आहे. ठिकठिकाणीं मोठे रुंद रस्ते केले आहेत, त्यामुळें कोंदट हवा नाहींशी होऊन स्वच्छ हवेचा लाभ लोकांस मिळत आहे. स्वच्छता चांगली ठेविली असल्यामुळें पाण्याचेंहि रूप बदललें आहे. एकदरींत तूर्त ह्या शहरची शोभा विशेष रमणीय होऊन, व्यापारधंदे वगैरे भरभराटींत चालले आहेत.

सुमारें एका कोसाच्या अंतरावर एक लहानसा भरंगच लोकवस्तीचा व टुमदार ‡'**रायबंदर**' या नांवाचा गांव आहे. येथें आमच्या चरित्रनायकाचा जन्म झाला. यांच्या पूर्वजांचें मूळ ठिकाण **बारदेश** प्रांतांत **शिरोडें** ह्मणून एक गांव आहे, तें होय. आपलें पूर्वस्थळ सोडून **रायबंदरीं** वसाहत करण्यास त्यांस काय कारण झालें, तें कळत नाहीं. पण कांहीं व्यापारउद्योगाच्या साधनासाठीं ते इकडे आले असावेत, असें वाटतें. ज्यावेळीं आमचा गोमांतक देश ऐन भरभराटींत होता, त्यावेळीं ह्या देशांत चांगले विद्वान्, सज्जन, परोपकारी, राजदरबारांत बहुमान पावणारे असे अनेक लोक होते. *महेश्वर भट्ट हे तर आमच्या गोमांतकांत एक अद्वितीय विद्वद्रत्न होऊन गेले.

---

‡ पोर्तुगालाहून इकडे राजवेत्र धारण करण्यास ज्या तारवांत नवीन प्रतिनिधी किंवा सरसुभेदार येई, तें तारूं थेट येथें बंदर करित असे व दोनतीन दिवसांनीं राज्यकारभाराचा अखत्यार घेण्यास त्यानें गोवें येथें जावें, अशी वहिवाट असे. हा क्रम आजतागायत चालू आहे. तेव्हां राय ह्मणजे राजा व राजा ज्या ठिकाणीं आपलें बंदर करतो तें राज किंवा रायबंदर, अर्थात् 'रायबंदर' हें नांव पडण्याचें हेंच कारण आहे.

* "हा नामांकित विद्वान महाशैल येथील रहाणारा होता. ह्याच्या बापाचें नांव रामचंद्र भट्ट असें होतें. ह्याचा जन्म इ. स. १७१९ त झाला. ह्यानें आपलें अध्ययन स्वदेशांतच संपादिलें. न्यायशास्त्र आणि धर्मशास्त्र या दोन्हींमध्यें हा प्रामाणिक मताचा असून लोकांमध्यें ह्याची मान्यता मोठी असे. अभिधान ग्रंथ ह्मणजे कोश त्यामध्यें ह्याची माहिती फार होती. ह्यानें विश्वप्रकाश, द्विरूप कोश, एकाक्षरी कोश इत्यादि कोश रचिले, त्याची पूर्वोत्तर हिंदुस्थानांत प्रसिद्धी आहे. भगवद्गीता, अमरकोश, मुहूर्तमाला, सिद्धांत, गीतगोविंद इत्यादि ग्रंथावर ह्यानें टीका केल्या आहेत. ह्यांशिवाय आणखीहि ह्याचे ग्रंथ असावे असा तर्क होतो. असें सांगतात कीं, ह्या टीका जेव्हां केल्या, तेव्हां ह्याचें वय सुमारें तीसबत्तीस वर्षांचें होतें. एकदा काशींतील पंडितांस व शास्त्र्यांस दोन संस्कृत श्लोकांचा अर्थ बरोबर करतां आला नाहीं, ह्मणून त्यांनीं ते श्लोक बहुत ठिकाणीं पाठविले; परंतु कोणीच यथायोग्य अर्थाचा उलगडा केला नाहीं. शेवटीं हे श्लोक महेश्वर भट्टजीकडे काशींतील शास्त्री स्वत: घेऊन आले. महेश्वर भट्टजीस ते श्लोक पाहून पहिल्यानें अर्थ सम-

त्यांच्या सद्वर्तनाची, परोपकाराची व अध्यात्मज्ञानाची वगैरे थोरवी गावी तेवढी थोडीच. पण सांप्रत आमच्या ह्या देशाची स्थिति कांहीं निराळीच बनून गेली आहे. विद्यावृद्धि, कलाकौशल्य, व्यापारधंदा वगैरेमध्यें सुधारणा करण्याकडे आमचे श्रीमान लोक मुळींच लक्ष्य पुरवित नाहींत. स्वदेशहिताकडे आमच्या इकडील लोकांचें लक्ष्य अद्याप चांगलेंसें वेधलें नाहीं. आळसाचे हे दुर्दिन संपून उद्योगरूपी सूर्याचा प्रकाश केव्हां पडेल तो सुदीन समजावयाचा. असो.

रायबंदर येथें **गौडसारस्वत** ब्राह्मण लोकांची वस्ती बरीच आहे.

---

जला नाहीं. ह्मणून महेश्वर भट्टजीनें त्या शास्त्र्यांस असें सांगितलें कीं, जर तुह्मी दोन दिवस माझ्या घरीं रहाल तर मी ह्या श्लोकांचा अर्थ तुह्मांस करून देईन. हें त्या शास्त्र्यांनीं कबूल केल्यावर महेश्वर भट्टजीनें सरस्वतीची स्तुति केली. नंतर हा एकांत स्थळीं बसला असतांना एकाएकीं त्या श्लोकांचा अर्थ ह्याच्या लक्ष्यांत आला. तेव्हां ह्यानें त्या दोन श्लोकांचा अर्थ वीस कागद करून दिला. सांप्रत ह्या दोन श्लोकांच्या नकला महेश्वर भट्टजीच्या घरीं एक आणि दुसरी श्रीमंत खेम सांवत सर देसाई सावंतवाडी संस्थान ह्यांकडे आहे असें सांगतात. ह्याच्या विद्वत्तेवरून ह्यास जी प्रतिष्ठा मिळाली होती ती ह्यानें आपलें सर्व आयुष्य सदाचरण आणि ईश्वरसेवन ह्यांत घातल्यामुळें अधिक वाढली. हिंदुस्थानांत ह्याची कीर्ति चहूंकडे पसरली. हा धर्मांविषयीं आपलें मत कधीं खोटें देत नसे. ह्यामुळें कोठें ग्रामण्य किंवा धर्मप्रकरणीं वाद पडला असतां लोक ह्याजवळ येऊन खऱ्याखोट्याचा निवाडा करून घेत असत. हा मनुष्य मोठा परोपकारी असून साधा असे. ह्यानें काव्य, अलंकार, न्याय आणि धर्म ह्या शास्त्रांमध्यें कित्येक विद्यार्थी पढवून तयार केले. ह्याच्या वंशजांनीहि ह्याच मार्गाचें अवलंबन केलें. महेश्वर भट्टाचें कधीं नांव घेतलें ह्मणजे ते त्याची स्तुति करून नमस्कार करीत. महेश्वर भट्टजी वैकुंठवासी झाले, तेव्हां त्यांचें वय ९८ वर्षांचें होतें. ही गोष्ट इ. स. १८१७ मध्यें घडली."—( गो. इ. )

बेळगांव येथें मधुमक्षिका नांवाचें मासिक पुस्तक निघत असे, त्यांत ह्यांचें त्रोटक चरित्र प्रसिद्ध झालें आहे, त्यावरून पहातां ह्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचें, सदाचरणाचें स्वरूप दिसून येऊन क्षणभर अंतःकरणवृत्ति तल्लीन होते.

त्यांचीं वहुतेक कुटुंबें खाऊनपिऊन सुखी आहेत. आल्यागेल्यांचा पाहुणचार घेण्यांत ते फार दक्षता ठेवितात. **गौडसारस्वत** ब्राह्मणज्ञातींत '**लवंदे**' उपनामक थोर कुलांत आमच्या चरित्रनायकांचा जन्म स्वस्ति श्री नृप शालिवाहन शके १७५३ खर नाम संवत्सर कार्तिक वद्य १ दा रविवारीं झाला. यांच्या पूर्वजांनीं या बंदरांत व्यापारासंबंधाच्या बऱ्याच मोठ्या घडामोडी केल्या आहेत असें सांगतात. यांच्या वडिलांचें नांव **फोंडु प्रभु.** हे फार सज्जन असून दयार्द्र अंतःकरणाचे व ईश्वरभक्तिपरायण होते. चरित्रनायकांच्या मातोश्रीचें नांव **रुक्मिणीबाई.** ही सुशील, सद्गुणी व साध्वी स्त्री आपल्या पतीच्या सेवेंत सदोदित दक्ष असे. घरांतील लोकांस, चाकर माणसांस, शेजाऱ्यापाजाऱ्यांस व अतीतअभ्यागतांस तिनें आपल्या सुप्रसन्नवृत्तीनें नेहमीं आनंदवित असावें. तिचा सहवास प्रत्येक मनुष्याला फार सुखकर वाटे. तिच्या पोटीं **माणकूबाई, केशव प्रभु, गोविंद प्रभु, पुरुषोत्तम प्रभु, भीमाबाई, त्रिविक्रम प्रभु, जनार्दन प्रभु** व **श्रीधर प्रभु** असे सहा पुत्र व दोन कन्या जन्मास आलीं. **माणकूबाई** ही **वडें** येथील वै० मुकुंद शेणवी भोबे यांस दिली होती. ही, आमच्या भिषग्वर्यांच्या हाताखालीं तयार झालेले वैद्य रा. रा. श्रीनिवास शेणवी भोबे यांची मातोश्री होय. दुसरी वहीण **भीमाबाई** ही वेरें येथील वै० नारायण पई यांस दिली होती.

आमचे चरित्रनायक आईच्या सातव्या महिन्यावर जन्मलेले आहेत. हें मूल जन्मास आलें त्यावेळीं कोणाचीतरी अशी कल्पना झाली असेल काय, कीं, ही मूर्ति आपल्या उज्वल कीर्तीनें सर्व देश दुमदुमून टाकील ह्मणून? प्रख्यात त्रिकालज्ञानी गोविंदचेट्टींसारख्या ज्योतिषशास्त्रवेत्त्यांनीं मात्र त्यावेळीं हें चित्र रेखाटलें असतें तर न जाणो! धन्य ती माता, कीं, जी अशा सद्गुणी, लोकवंद्य, परोपकारी, व महाकष्टतर रोगानें मरणोन्मुख झालेल्या दीनजनांस प्राणदान देणाऱ्या सुपुत्रास प्रसवली!

'प्रसाद चिन्हानि पुरःफलानि' या म्हणीप्रमाणें पुढें होणाऱ्या गोष्टीची छाया पूर्वीच दिसूं लागते. त्याप्रमाणें आमच्या चरित्र नायकांच्या ठिकाणीं त्यांच्या पुढील प्रवृत्तीचीं लक्षणें लहानपणींच दिसूं लागलीं होतीं. त्यांचा विद्याभ्यास झटला म्हणजे गोमांतकांतील त्यावेळच्या स्थित्यनुसार जेमतेमच झाला होता. गणित, भूगोल, इतिहास वगैरे विषयांचें ज्ञान करून देणारे आतांच्यासारखे शिक्षक किंवा गांवोगांव शाळाहि त्यावेळीं नव्हत्या. बालबोध व मोडी लिपी समजून साधारण पत्रव्यवहार करतां आला म्हणजे विद्यादेवीची बहुतेक सेवा आटपली, अशी स्थिति होती. शिक्षणहि घरच्याघरींच कोणातरी जाणत्या मनुष्याकडून वगैरे होत असे. त्याप्रमाणें आमच्या चरित्रनायकांनीं आपल्या वयाच्या दहाबाराव्या वर्षापर्यंत मराठी लिहिणेंवाचणें वगैरे शक्य तेवढें शिक्षण संपादिलें होतें. त्यानंतर ते आपल्या वडिलांबरोबर दुकानावर जाऊंयेऊं लागले. तेथें त्यांनीं बसून नागपंचमीं होतांच मृत्तिकेचीं गणपतीचीं वगैरे चित्रें करावीं, तसेंच कागदावर गौरीचीं वगैरे चित्रें काढून तीं नानातऱ्हेच्या रंगीबेरंगी शाईनें तयार करावीं; केव्हांकेव्हां त्याच मातीच्या लहानलहान हरभऱ्या-एवढ्या गोळ्या करून आपल्या बरोबरच्या सोवत्यांस औषधें म्हणून मौजेखातर द्यावींत! कधींकधीं रानांत जाऊन तऱ्हतऱ्हेच्या कंदमुलादिक वनस्पति जमवून त्या एकत्र करून कुटित बसावें; अशा प्रकारचा त्यांचा खेळ चालला होता. पण ह्या खेळांचाच आज झालेला परिणाम पाहूं गेल्यास मन थक्क होऊन जातें. ईश्वरीलीलेनुरूप कोणा मनुष्याकडून कोणत्यावेळीं कायकाय अद्भुत प्रकार घडून येतील, हें सांगवत नाहीं.

ह्यांचें लहानपणचें वर्तन फार दांडगाईचें होतें. उनाडपणा व कोणाहिबरोबर तंटेभांडण वगैरे करण्यांत त्यांचा हात खंडा असे. कोणी कांहीं अपमानास्पद भाषण केल्यास तें ह्यांनां बिलकूल खपत नसे. त्याच्या तोंडावर एखादी चपराक लगावण्यासदेखील हे कधीं मागें घेत नसत. पण जसजसे हे मोठे होत चालले, तसतसें हळूहळू त्यांचें लहानपणचें वर्तन बदलत जाऊन त्यांच्या ठिकाणीं पोक्तपणाची व

सभ्यपणाची झांक मारूं लागली. निस्पृहता व निर्भीडपणा हे दोन गुण मात्र लहानपणापासून आतांपर्यंत ह्यांच्या अंगीं कायम आहेत व ते त्यांच्या धंद्यास चांगली शोभा देतात. असो.

त्यांच्या लहानपणांतच एके दिवशीं असा एक चमत्कार झाला कीं, घरांत आपल्या भावंडांसहित ते एका ठिकाणीं निजले असतां, रात्रौ सुमारें बारावर एक वाजतां एकाएकीं एक नागसर्प त्यांच्या उशावर येऊन फूत्कार करूं लागला. मंडळीलातर गाढ झोंप लागली होती. पण तेथें एक त्यांच्या सलगीचे बोकोबा निजले होते ते जागे होऊन त्या सर्पाच्या अंगावर धावले व मोठ्यानें ओरडून त्यांनीं फार गडबड करून सोडली. त्यासरशी आमचे चरित्रनायक दचकून उठले. उठते वेळीं त्यांच्या हाताचा धक्का नागसर्पास लागला. पण तो सर्प त्यांस दंश वगैरे कांहीं न करतां सौम्य वृत्तीनें तेथेंच राहिला होता. ह्यांनीं लगेच बत्ती पेटविली व निजलेल्या मंडळीस जागें केलें, तरी तो नागोबा तसाच स्वस्थचित्तानें डुलत असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. हा भीतिप्रद प्रकार पाहून सर्वांची गाळण होऊन गेली व मोठा गलबला माजला. त्याबरोबर नागोबा उठून चालते झाले. एक दोघांनीं त्यांच्यामागें सावकाश जाऊन त्यांचा तपास केला, पण कोठें पत्ता लागला नाहीं. त्या रात्रीं सारीच गडबड होऊन सकाळपर्यंत कोणासच नीज आली नाहीं. प्रत्येकाच्या अंतःकरणांत भीति उत्पन्न झाली होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांचे बंधु हा काय प्रकार असावा, ह्याचा उलगडा करून घेण्याकरितां त्यांच्या पूर्वापार समजुतीप्रमाणें **महाशैल** येथें आपल्या देवास प्रसाद लावण्याकरितां निघाले. कांहींजण ज्योतिषाकडे शुभाशुभ परिणामासंबंधानें प्रश्न विचारूं लागले, कित्येक आसामी त्यांचें जन्मटिपण जोशीबुवांस दाखवून ग्रहांची बाधा वगैरे असल्यास त्याच्या परिहारार्थ कायकाय प्रकार केले पाहिजेत हें समजून घेण्याच्या धांदलींत गुंतले. कोणी पंचाक्षऱ्यास घेऊन आले व झालेला सर्व प्रकार त्यास कळवून शुभाशुभ फल विचारण्याच्या घाईस

लागले. सारांश, जो तो आपापल्यापरी त्या गोष्टीचा विचार करूं लागला. इतक्यांत पुनः असें झालें कीं, चरित्रनायकांची स्वारी नित्या-प्रमाणें स्नानगृहांत आंघोळीस गेली होती, तेथें अकस्मात् कौलांतून त्याच नागोबांनीं खालीं उडी घेतली व त्यांच्यासमोर आपली फडा प्रफुल्लित करून जवळच केळीचीं झाडें होतीं त्यांत घुसून ते पार निघून गेले, त्याचा नंतर थांग लागला नाहीं. इकडे प्रत्येकानें आपआपल्या समजुती प्रमाणें कांहीं शुभाशुभ फलें सांगितलीं. इतक्यांत त्यांचे बंधुहि **महाशैलास** गेलेले परत घरीं आले व देवाकडे प्रसाद चांगले झाल्याचें कळवून "कांहीं भिण्याचें कारण नाहीं, हें सर्व शुभचिन्ह आहे, याच्या हातून कांहींतरी मोठीं कृत्यें घडून हा पुढें कीर्तिमान् होईल, असें देवाच्या प्रसादावरून ध्वनित होतें." असें त्यांनीं सर्व मंडळीस सांगितलें असो.

आमच्या चरित्रनायकांस वैद्यक शिकण्याची गोडी लागून त्या विषयांत दृढनिश्चयानें पारंगतता मिळविण्यास पुढील गोष्ट कारणीभूत झाली. वरील प्रकार घडल्यानंतर दोनतीन महिन्यांनीं त्यांची वडील वहीण **माणकूबाई** आपल्या आठ वर्षांच्या लहान मुलीस घेऊन माहेरीं आली होती. एके दिवशीं त्या मुलीस जंताचा वगैरे विकार होऊन अंगांत बराच ताप भरला, तेव्हां त्यांच्या घरापासून जवळच एक ख्रिस्तियन डाक्टर रहात होता त्यास आणून त्यांनीं त्या मुलीस दाखविलें. डाक्टरानें मुलीची प्रकृति वगैरे पाहून औषधांची यादी लिहून दिली. त्याप्रमाणें दवाखान्यांतलें औषध आणून मुलीस दिलें. एकदोन दिवस औषध चाललें तरी त्या मुलीचा ताप हटेना व जंताचा विकारहि कमी होईना! तेव्हां त्यांनीं आणखी एकदोन वेळां त्या डाक्टरास आणून चांगल्याप्रकारें तपासणी करविली. डाक्टरानेंहि पहिल्या औषधांत कांहीं फेरफार करून पुनः दुसरी यादी दिली. त्याप्रमाणें तेंहि औषध चालू करण्यांत आलें; पण मुलीस गुण ह्मणून कांहींच दिसेना. एके दिवशीं त्या मुलीचें दुखणें फार अनावर झाल्या-मुळें त्या डाक्टरास जलदीनें बोलवण्याकरितां आमच्या चरित्रनाय-

कांनीं मनुष्य पाठविला; परंतु तो गेलेला मनुष्य लवकर आला नाहीं व इकडेतर आणीबाणीचा प्रसंग. हें जाणून आमचे भावी वैद्यराज त्याच्या घरीं स्वत: गेले आणि प्रार्थना केली कीं, "मुलगी फार संकटावस्थेंत आहे, मेहरबानी करून लवकर चलावें." डाक्टरसाहेबांनीं एकदम उत्तर दिलें कीं 'आपलें आलमुस' (सकाळची न्याहारी) झालें नाहीं, जरा दम खा. हें ऐकून ते थोडा वेळ थांबले तरी डाक्टरसाहेब घराबाहेर पडेनात. ह्मणून ह्यांनीं पुन: विनवणी केली. तथापि डाक्टरसाहेबांची तब्यत लागेना. डाक्टरांचें अशा तऱ्हेचें बेपरवाईचें व निष्ठुरपणाचें वर्तन पाहून ह्यांची तळपायाची आग मस्तकास गेली व त्या डाक्टरांस त्यांनीं निर्भीडपणानें स्पष्ट ह्मटलें कीं "तुमच्याकडे त्या मुलीस बरें करण्यासारखें औषधहि नाहीं व तुह्मांस त्या मुलीच्या रोगाचें निदानहि मुळींच समजलेलें नाहीं; आणि ह्मणूनच तिच्याविषयीं अशी टाळाटाळ तुह्मी करित आहां. यावरून तुह्मांकडून ती बरी होण्याची आशाहि आह्मांस दिसत नाहीं. याकरितां आपण आतां बिलकूल येण्याचें करूं नये, आमच्याकडून जें काय होईल तें आह्मी करूं." असा सणसणित जबाब देऊन ते तडक घरीं निघून आले.

चरित्रनायकांचा हा निर्भीडपणा आणि धाडस पाहून डाक्टरसाहेबांसहि मोठें आश्चर्य वाटलें. इकडे चरित्रनायकांनीं घरीं येऊन त्या मुलीचा जंताचा उपद्रव कमी व्हावा ह्मणून घरगुतीच औषधें सुरू केलीं. पण शेवटीं ती हा असारसंसार सोडून चालती झाली. मुलीचे आईस फार दु:ख झालें व ती अतिशय शोक करूं लागली. पण आमच्या चरित्रनायकांनीं चार उपदेशपर गोष्टी सांगून तिचें शांतवन केलें. परंतु त्या मुलीच्या मृत्यूस त्या डाक्टराचा हलगर्जीपणाच कारण झाला, असें आमच्या चरित्रनायकांस वाटून त्यांच्या मनांत पश्चात्तापयुक्त एक प्रकारची दृढ ईर्षा उत्पन्न झाली. त्यांच्या मनांत येऊन चुकलें कीं, आमच्या हिंदू लोकांत वैद्यशास्त्रज्ञ लोकांची फार उणीव असल्यामुळें या ख्रिस्तियन डाक्टरांचे उंबरठे झिजवावे लागतात व वरचेवर त्यांची हांजीहांजी करावी लागते, आणि ह्यामु-

ळेंच त्यांचें प्रस्थ अधिक माजलें आहे. तरी ह्याचा आमच्या लोकांस कोणत्याच प्रकारचा विषाद वाटत नाहीं. तेव्हां कांहीं होओ, ह्याकरितां आपण कंबर बांधली पाहिजे. दृढ निश्चयानें प्रयत्न केला ह्मणजे सर्व कांहीं साध्य होतें. हें ज्ञान उत्तमप्रकारें आपण मिळवीन! इत्यादि अनेक ईर्षेचे, महत्वाकांक्षेचे व दृढतर निश्चयाचे उद्गार त्यांच्या मनांत एकदम उद्भवले व ह्या कामीं साह्य करण्याबद्दल त्यांनीं मनोभावें परमेश्वराची प्रार्थनाहि केली.

'**निश्चयाचें बळ। तुका ह्मणे तेंचि फळ॥**' ह्या साधूक्ती-प्रमाणें दृढ निश्चयपूर्वक हातीं धरलेलें काम तडीस जावें, हें साहजिकच आहे. आमच्या चरित्रनायकांचा निश्चयतर ठरलाच. एकदा केलेला निश्चय पुनः फिरावयाचा नाहीं, हा त्यांचा मूळचा स्वभाव. पण त्यांच्या इष्ट वैद्यकाचें शिक्षण देणारा गुरु त्यांनां जवळपास कोठें सांपडण्या-सारखा नव्हता व बाहेरदेशीं कुठें जावें तर वडील माणसांकडून निरोप मिळण्यासारखा नव्हता. यामुळें ते फार काळजींत पडले. त्यांनां अन्नपाणीहि गोड लागेनासें झालें. या बद्दलचा अनुकूल सल्ला देणा-राहि मित्र त्यांनां कोणी भेटेना. तेव्हां योगी लोकांची ज्याप्रमाणें सच्चिदानंद स्वरूपीं वृत्ति तल्लीन होऊन जाते, त्याप्रमाणें त्यांनां वैद्यक विषयाच्या निदिध्यासामुळें दुसरें कांही दिसेनासें व भासेनासें झालें. अशा अवस्थेंत त्यांचे एकदोन दिवस गेले. तिसऱ्या दिवशीं त्यांच्या वडिलांनीं त्यांस विचारलें कीं, "तूं आतांशा फार उदासीन दिसतोस, जेवणाखाणाकडेहि तुझें लक्ष्य नाहीं, ह्याचें कारण काय? तुला कसली चिंता लागली आहे तें मला सांग. तुझ्या मनांत काय आहे तें तूं सांगितल्याशिवाय दुसऱ्यास कसें कळेल?" पण ह्या प्रश्नास त्यांनीं कांहीं विशेष उत्तर दिलें नाहीं. फक्त "कांहीं नाहीं!" एवढें ह्मणून ते स्तब्ध राहिले. कारण मनांत चाललेले ते विचार त्या वेळीं दुस-ऱ्यास सांगून तादृश फायदा होण्यासारखा नव्हता, हें ते जाणून होते. व त्यांच्या मनाच्या सर्व शक्ति आपला इष्ट हेतु सिद्धीस नेण्याचा मार्ग शोधून काढण्यांत गुंतल्या होत्या.

अशा रीतीनें ते एकसारखे त्याच विचारांत गढून गेले असता, तिसऱ्या दिवशीं रात्रौ एक वाजण्याच्या सुमारास त्यांजवर निद्रादेवीनें आपला अम्मल बसविला. अगोदर दोन दिवस त्यांस मुळींच कशी ती झोंप नव्हती, त्यामुळें या रात्रीं त्यांस चांगली गाढ झोंप लागली व त्या झोंपेंत त्यांनां एक स्वप्न पडून त्यांत पुढील शब्दांचा ध्वनी त्यांचे कानीं पडला. तो असा कीं "तूं भिऊं नको. हातीं धरलेल्या कामांत तुला चांगलें यश येईल तुझ्या हातून पुष्कळ परोपकार घडेल. उद्यां तूं पणजीस ह्मामाई कामत यांचे घरीं जा. तेथें तुला वैद्यक ग्रंथ मिळेल."

हे शब्द ऐकून आमचे चरित्र नायक झटकन् जागे झाले व हे शब्द कोण बोलले ह्मणून पहातात तों जिकडेतिकडे सामसूम. तेव्हां त्यांस वाटलें कीं, आपली दृढ निष्ठा पाहून जगदीश्वरानें प्रसन्न होऊन आपल्यास हा स्वप्नांत दृष्टांत दिला आहे. त्याच्या कृपेनें असाध्य तें साध्य करून घेण्यास वेळ लागत नाहीं. असें ह्मणून आनंदपुलकांकित होऊन रात्र असल्यामुळें पुनः निद्रावश झाले. दुसऱ्या दिवशीं मुखमार्जनादि विधी आटपून पणजी येथें रा. ह्मामाई कामत यांचे घरीं जाऊन त्यांनीं शार्ङ्गधर वैद्यक ग्रंथाची चौकशी केली. तों तेथें त्यांस एक जुनी हस्तलिखित प्रत मिळाली. ती त्यांजकडून मागून घेऊन ते घरीं आले.*

---

*स्वप्नदृष्टांतासंबंधानें अलीकडील विद्वानांचें मत एके ठिकाणीं वाचण्यांत आलें, तें फार महत्वाचें वाटल्यावरून वाचकांकरितां येथें देतों — "लोकोत्तर साक्षात्कार व अत्युच्च प्रेरणा होण्यास अनुकूल अशी आपल्या मनाची स्थिति व योजना जर आह्मीं करून ठेवली, तर साक्षात्कार व तसल्या प्रेरणा आह्मांला जरूर होतात. ह्या विषयावर खोल विचार केलेल्या एका गृहस्थाचें असें ह्मणणें आहे कीं 'आपण निजलों असतां ईश्वरी प्रेरणेनें आपणास विज्ञानप्राप्ति होणें, ही अगदीं सहज व नियमबद्ध गोष्ट आहे. हल्लीं बाह्य स्थितीकडे आणि खोट्या व काल्पनिक गरजांकडे जें फाजील लक्ष्य दिलें जात आहे, तें कमी करून आंतल्या स्थितीकडे आणि गरजांकडे जर जास्त लक्ष्य लावण्यांत येईल, तर प्रत्येकाला ईश्वरीप्रेरणा व विज्ञानप्राप्ति हीं अगदीं नेमानें व समाधानकारक

गुरुमुखांतून त्या ग्रंथाचा आरंभ संस्कार व्हावा, अशी त्यांची फार इच्छा होती; पण ती सफळ झाली नाहीं. हातीं घेतलेल्या कामांत प्राविण्य मिळविण्याची त्यांची जी प्रबळ इच्छा तीच त्यांनां गुरु झाली.

**" उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः"** ( भ. गी. )

ह्या भगवदुक्तीचा अर्थ—आपला उद्धार आपणच करावा; आपल्याला आपण अवनतीला नेऊं नये; कारण मनुष्य हा आपला बंधु ( हितकर्ता ) आपणच व आपला शत्रुहि आपणच आहे. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, लहानसान व्यावहारिक विद्येपासून तों अतिश्रेष्ठ ब्रह्मविद्येपर्यंतहि त्या त्या ज्ञानाची सिद्धी संपादण्याकरितां जे जे गुरू ह्मणून करावयाचे, ते ते निमित्तमात्र कारण होत. वास्तविक ज्याचा तोच आपापला गुरू आहे. शिष्याच्या बुद्धिपेटिकेमध्यें ज्ञानाचा सांठा गुप्त असतो, तो ह्या बाह्य

---

रीतीनें होऊं लागतील. आज आपण काय आहों व पुढें काय होणार, हें सर्वथैव आपल्या विचारांवर अवलंबून असतें. आपल्या विचारांचा व्यवसाय आपण रात्रीं झोंपेंत असतांना जास्तच वाढतो. कारण कीं, आपली बाह्य जगताच्या संबंधानें जी निद्रावस्था असते, तीच आंतल्या जगताच्या संबंधानें जागृतावस्था असते. हें आंतलें अदृश्य जगत, हेंच खरें व शाश्वत जगत आहे कारण कीं, त्याचा आधार शाश्वत अशा आत्मिक व नैतिक गुणांवर आहे. बाह्येंद्रियांच्याद्वारें माहिती मिळविण्याचें आपलें काम बंद पडलें, कीं, अंतरिंद्रियांकडून माहिती मिळविण्याच्या कामास विशेष जोर येत असतो. ही गोष्ट प्रत्येकाच्या लक्ष्यांत आली ह्मणजे अमुक एक बिकट प्रश्नाचा खुलासा व्हावा, अशी जेव्हां कोणाला उत्कट इच्छा होते, तेव्हां त्या बिकट प्रश्नाकडे लक्ष्य लावून झोंपी जाण्याचा प्रघात सर्वत्र पडेल. परमेश्वराचा खरा हेतू जाणणाऱ्या तत्त्वदृष्ट्या महात्म्यांनां होणारे दृष्टांत व साक्षात्कार आणि तो हेतु ज्यांस समजत नाहीं अशा मनुष्यांनां निद्रेंत पडणारीं स्वप्नें यांमध्यें जमीनअस्मानचें अंतर आहे, तें हें कीं, पहिल्यामध्यें सर्वत्र सुसंबद्ध विज्ञानच भरलेलें असतें, आणि दुसऱ्यामध्यें असंबद्ध अज्ञान मात्र ओतप्रोत भरलेलें असतें."

( ग्रंथमाला. मा. पु.—'विज्ञान आणि हृदस्थित प्रकाश' पृ. १४१ )

गुरूच्या योगानें प्रकाशित होतो, इतकेंच. नहून गुरु बाहेरील अथवा आपलेकडील ह्मणून नवीन कांहीं देत नाहींत. तर मग विद्या-प्राप्तीसाठीं गुरु करावा, सत्संगति करावी अशी अनुज्ञा शास्त्रानें कां बरें केली आहे? त्याचें कारण एवढेंच कीं, गुरु इत्यादिकांच्या उप-देशानें ह्याची जिज्ञासा अथवा इच्छाशक्ति प्रबळ होते, आणि ही इच्छाशक्ति प्रबळ झाली ह्मणजे आपल्या जाणीवेंत गुप्त असलेल्या विज्ञानाच्या सांठ्यावरील अज्ञानाचा पडदा ताडकन् तुटून जातो; व तो पडदा तुटला, ह्मणजे अंतरांत असलेल्या विज्ञानामध्यें सृष्टींतील एकंदर गूढ रहस्यें प्रकाशित होतात. शंकराचार्यांनीं "विचार हाच गुरु होय, विचारासारखा गुरु नाहीं" असें सांगितलें आहे. ह्याचेंहि तात्पर्य हेंच आहे. कोणत्याहि वस्तूबद्दल जितकाजितका सूक्ष्म विचार करावा, तितकातितका तिच्या गुणधर्मांचा प्रकाश अधि-काधिक होतो. आतां कोणी ह्मणतील कीं, सृष्टींतील अशा वस्तूंच्या गुणधर्मांचें ज्ञान आपणास त्या त्या शास्त्रवेत्त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकां-वरून होत आहे हें कसें? तर त्यांनां एवढाच प्रश्न करावा कीं, त्या त्या मूळ शास्त्रवेत्त्यांनीं जें ज्ञान संपादन करून त्या पुस्तकांत लिहिलें, तें त्यांनीं कशावरून लिहिलें? त्यांनां आणखी कोणाचीं पुस्तकें मिळालीं होतीं काय? अर्थातच नाहीं. तेव्हां सृष्टी हेंच त्यांचें पुस्तक व विचार हे त्यांचे डोळे होत, हें उघड आहे. कोणत्याहि वस्तूचें यथार्थ ज्ञान होण्याला मुख्यत: आपली विचारशक्तीच वाढविली पाहिजे. आणि बाह्य गुरूची मदत ह्मटली ह्मणजे ही विचारशक्ति वाढविण्यासच कांहीं झाली तर होते. एखाद्याची ही शक्ति स्वताच्या दृढ निश्चयानें व तीव्र निदिध्यासानें आपोआप वाढून पूर्णतेस पोहोंचते. गुरूवांचून अशा स्वताच्या तीव्र निदिध्यासानें व विचारानें ब्रह्मज्ञानाच्या पूर्णतेस पोहोंचलेलेहि कांहीं लोक सांपडतात. मग ह्या जड भौतिक सृष्टीचें ज्ञान संपादन केलेले पुरुष सांपडतील ह्यांत काय नवल आहे? श्रवण, मनन, निजध्यास व साक्षात्कार या चतुष्टयापैकीं पहिलीं तीन 'साधनें' व चौथें हें 'साध्य' आहे. हीं साधनें तरी स्वताच करण्याचीं आहेत.

आतां श्रवणाला साधन गुरु होतात, ही गोष्ट खरी आहे; व कृतज्ञ शिष्यानें त्यांचे उपकार अनंतानंत मानणें, हेंहि योग्य आहे; तथापि साक्षात्कार मिळविण्याकरितां प्रयत्न करावयाचा तो स्वताच करण्याचा आहे, हें विसरतां कामा नये. वसिष्ठानें श्रीरामास सांगितलें आहे—

**उपदेश क्रमो राम व्यवस्था मात्र पालनम् ।**
**ज्ञप्तिस्तु कारणं शुद्धा शिष्य प्रज्ञैव केवला ॥ १ ॥**

**अर्थः**—उपदेश करण्याचा क्रम हा मर्यादा पालनाकरितां आहे. बाकी या कामीं शिष्याची सूक्ष्म बुद्धीच सर्वतोपरी कारण आहे. यावरून स्वताची विचारशक्तीच ज्ञानसिद्धीला मुख्य कारण आहे, हें सिद्ध होतें. जो मनुष्य अमुकएक तत्व अमुकानें सांगितलें आहे किंवा अमक्या अमक्या पुस्तकांत लिहिलें आहे ह्मणून गृहित धरून चालतो, त्याचें तें ज्ञान पोपटपंचीपैकीं होऊन एखादे वेळीं तो पढतमूर्खाच्याहि वर्गांत जाऊं शकतो. पुस्तकांतून वाचलें तरी स्वताच्या विचार-शक्त्युद्भूत अनुभवाशीं त्याचें तादात्म्य केल्यावांचून त्याचा योग्य उपयोग होणार नाहीं. आतां ही विचारशक्ति वाढण्याला पूर्वीं लिहि-लेली इच्छाशक्तीची मदत पाहिजे आहे. कारण बळकट इच्छेवांचून त्या गोष्टीचा विचार करावा असें वाटणार नाहीं. आणि इच्छेविरुद्ध केवळ कोणाच्यातरी आग्रहानें अथवा जुलमानें कोणत्याही गोष्टीचा विचार अथवा अभ्यास करणें, हें कंटाळवाणें होईल. या करितां मूळ आपणास ती इच्छा उत्पन्न झाली पाहिजे व पुढें ती दृढ आणि अखंड राहिली पाहिजे. तरच साध्य वस्तु पूर्णपणें आपल्या हातीं येईल. बहुतेक इच्छेच्या अदृढत्वामुळेंच आरंभिलेले उद्योग पुष्कळांनीं सोडलेले दृष्टीस पडतात. मुमुक्षूंमध्यें मंद, तीव्र व तीव्रतर असे भेद, वेदांत शास्त्रांत आढळतात ते ह्या इच्छेचेच दृढादृढतेचे परिणाम होत. आपली इच्छाशक्ति वाढली ह्मणजे इष्ट हेतु पूर्णतेस जाण्याचीं जीं जीं साधनें सृष्टीमध्यें असतात, तीं तीं आपल्याकडे आकर्षिलीं जातात. गुप्त असलेलीं उघड होतात, दूर असलेलीं ज़वळ येतात व अज्ञात असलेलीं ज्ञात होतात. ह्याप्रमाणें स्वानुकूल

साधनाकर्षणशक्ति त्या इच्छाशक्तीवरोबर उत्पन्न होते. मग ती इच्छा शुभ असो किंवा अशुभ असो. ज्याला कल्याणाची अपेक्षा आहे त्यानें नेहमीं शुभ इच्छाच आपल्या मनांत वागवावी.

न्यूटन, डार्विन वगैरे स्वताच्याच विचारशक्तीनें तत्त्ववेत्ते वनले, आणि त्यांनां त्या त्या गोष्टीचे सृष्टि-नियम शोधून काढण्याबद्दल अथवा त्यांनां विचार करण्याबद्दल प्रथम इच्छा उत्पन्न झाली. मग ती इच्छा कोणत्याहि कारणामुळें उत्पन्न होओ. कोणास झाडावरील फळ खालीं पडणें, कोणास चहादाणीवरील झांकण उडणें, कोणाचा सभेंत अपमान होणें, इत्यादि क्षुल्लक कारणांनीं त्यांच्या मनांत एक प्रकारची इच्छाशक्ति उत्पन्न होऊन ते ते लोक पुढें मोठे शास्त्रज्ञ व कार्यकर्ते झाले आहेत. त्याचप्रमाणें आमच्या वैद्यराजांस आपल्या भाचीचें मरण, त्यांच्या ठिकाणचीं गुप्त शक्ति प्रगट होण्यास कारण झालें, यांत मोठेंसे आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. असो.

त्यांचे वडील लहानसहान ज्वरांवर कोणकोणास कधींतरी काढे वगैरे देत असत. पण त्यांस वैद्यक्रियेचें चांगलें ज्ञान नव्हतें. कांहींकांहीं वनस्पतींची त्यांस ओळख होती आणि ते कधींकधीं आपल्या या चिरंजीवांसहि आपल्यावरोबर रानांत नेत असत. त्यामुळें व स्वताच्या शोधक स्वभावामुळें त्यांसहि बहुतेक वल्लींची माहिती झाली होती. यानंतर त्यांनीं ती वैद्यग्रंथाची हस्तलिखित प्रत घेऊन झपाट्यानें पठन करण्याचा क्रम सुरू केला. त्या कामीं त्यांनीं एकसारखी मेहनत घेऊन बरेंच यश मिळविलें. तीव्र निदिध्यासामुळें त्यांनां अर्थाचा प्रकाशहि आपोआप होऊं लागला. सर्व ग्रंथ मुखोद्गत झाल्यावर कषाय, चूर्णें इत्यादिकांचे औषधी प्रयोग प्रथमतः गांवांतच रोगी लोकांवर करून कितपत सिद्धि मिळते, ह्याचा ते अनुभव घेऊन पाहूं लागले. ह्या व्यवसायांत त्यांचें मन गुंतून गेल्यामुळें, त्यांचे वडील बंधु वगैरे त्यांस दोष देऊन बोलूं लागले कीं " अशा तऱ्हेचा फुकट उपद्व्याप करित तूं इकडेतिकडे कां फिरतोस? त्यापेक्षां दुसरा कांहींतरी उद्योग कर, नाहींतर स्वस्थ घरीं बसून रहा. ह्या वैद्यकी-

पासून आमचा थोडाच प्रपंच चालणार आहे! असल्या ह्या नसत्या उठाठेवी तुला कशाला पाहिजेत?" पण ह्यांस त्यांचें हें बोलणें बिलकुल रुचत नसे. कारण त्या विषयाचा त्यांनां छंदच लागून गेला होता. शिवाय त्यांस कांहीं दृष्टांत साक्षात्कार वगैरे होऊन त्यांचा निश्चय दृढतर झाला होता. अर्थात् त्यांच्या सांगण्याचा ह्यांच्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं. उलट, ईश्वरकृपेनें हरएक बाबतींत त्यांनां यशच येऊं लागल्यामुळें त्यांनां तें एक उत्तेजनच मिळालें. त्यांनीं हातीं धरलेला रोगी हटकून बरा होऊं लागला. त्यांच्या औषधानें बरे झाले नाहींत, असे रोगी फार थोडे आढळू लागले. तेणेंकरून कांहीं दिवसांनीं जवळपास असणाऱ्या गांवीं त्यांची कीर्तिपताका फडकूं लागली. लोकांच्या झुंडीच्याझुंडी त्यांनां नेण्याकरितां येऊन दाराशीं थडकूं लागल्या. त्यांनां जेवणासुद्धां अवकाश मिळूं नये, अशा तऱ्हेची गर्दी होऊं लागली! लोकांकडून प्रमाणासिद्ध रीतीनें औषध तयार करण्यांत व देण्यांत कांहीं चूक पडून रोग्याची प्रकृति बिघडेल व त्यामुळें आपणास अपयशाचा वांटा मिळेल, याकरितां स्वताच औषधें तयार केलेलीं बरीं, ह्मणून कषायादि औषधें स्वतः अंगमेहनतीनें तयार करून रोगी लोकांस देण्याचा क्रम त्यांनीं ठेविला. लांबलांबचे लोक ज्यावेळीं त्यांनां आपल्या घरीं नेण्याकरितां येऊं लागले, त्यावेळीं अर्थातच त्यांनां फुरसत न मिळून वरील क्रमास बाध येऊं लागला. पण ज्यांच्यावर विजयदेवीनें आपलें कृपाछत्र एकदा धरिलें, त्यांच्या हातगुणास बट्टा कसा येईल? रोगी लोकांस त्यांजकडून मिळालेलीं औषधें ब्रह्मास्त्राप्रमाणें आपलीं कामें करूं लागलीं. खिस्तीयन डाक्टर लोकांनीं असाध्य ह्मणून सोडलेले रोगी त्यांनीं मुद्दाम हातीं घेऊन त्यांस स्वताच्या खर्चानें जाज्वल्य औषधें देऊन हटकून बरे करावे, असें घडूं लागलें. हें पाहून डाक्टर लोक तोंडांत बोटें घालूं लागले व त्यांचा धन्यवाद गाऊं लागले. पण आंतून त्यांच्या मनांत मत्सराग्नि धुमसूं लागला. कारण ह्यांच्यायोगानें त्यांचें प्रस्थ बरेंच कमी होत चाललें. पण काय करणार! लोकतर

त्यांची अशी स्तुति करूं लागले कीं, अशा तऱ्हेचें निदान व चिकित्सा करणारा वैद्य आह्मीं कुठें पाहिला नाहीं, औषध घ्यावें तर त्यांचेंच घ्यावें, सोक्षमोक्ष काय होणें तो त्यांच्याच हातून झालेला बरा. अशा प्रकारें सर्वत्र त्यांचा होत असलेला जयजयकार ऐकून डाक्टर लोकांची तळपायाची आग मस्तकास जाऊं लागली व दिवसेंदिवस विशेष जोरानें त्यांचा द्वेषाग्नि भडकूं लागला. पण बहुतेक प्रसंगीं आपलें निदान चुकीचें होतें, असें खात्रीपूर्वक वाटल्यावरून व कधींकधीं चारचौघांत ठरल्यावरून नाइलाजानें लोकाग्रहास्तव सल्ल्यास ( कोंसुल्त करण्यास ) त्यांची योजना करणें त्यांस भाग पडूं लागलें. रोगनिदानांत डाक्टर लोकांचें एक मत, तर ह्यांचें दुसरेंच पडे. हा रोग अमुक तऱ्हेचा, ह्याचें पूर्वस्वरूप अमुक, ह्यास अमुक तऱ्हेचें औषध दिलें पाहिजे, अमुक दिवसांनीं रोगी बरा होईल, असें आपलें सणसणित मत हे देऊं लागले. असाध्य असल्यास त्याप्रमाणें रोगी मनुष्याचा कोणी आप्तइष्ट असेल त्यास एकांतीं नेऊन सांगावें कीं, तुह्मी औषधांत निरर्थक पैसा खर्च न करितां कांहीं परलोकसाधनार्थ दानधर्मादिक कृत्यें सुरू करा. तेणेंकरून कांहींतरी पुण्य मिळून सार्थक होईल. अशा तऱ्हेनें त्यांचीं निदानें बिनचूक उतरूं लागलीं. ह्यांनीं असाध्य ह्मणून ठरविलेला रोगी क्वचितच बरा झाला असेल. असो.

नंतर त्यांनीं हळूहळू इंग्रजी अमलांतून अनेक वैद्यग्रंथ आणवून ते स्वतः वाचून ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न झपाट्यानें चालविला. त्या सर्वांत 'माधवनिदाना'कडे त्यांचा कल विशेष होता व आहे. हा ग्रंथ त्यांच्या बहुतेक मुखोद्गत आहे. तो ग्रंथ वाचून व त्यावर विचार करून नाडीपरीक्षेसंबंधाचीं पुष्कळ अंगें त्यांच्या लक्ष्यांत आलीं. पुष्कळ रोग्यांच्या नाड्या पाहून आपल्या तर्कानें ते त्यांची परीक्षा करूं लागले. रत्नाची परीक्षा जशी अनुभवानें होते, तसाच नाडी-परीक्षेचाहि प्रकार आहे. पुष्कळ शिकल्यानें अथवा अन्य कोणत्याहि उपायानें ती होत नसते. कोणीहि गुरु नसतां वैद्यकीचें आणि त्यांत

विशेषेंकरून आश्चर्य करण्यासारखें नाडीज्ञान जें त्यांस झालें, तें त्यांच्या अप्रतिम चातुर्याचें व देवतासाक्षात्काराचेंच फल होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण, ग्रंथांतरीं आढळत नाहींत, अशा कांहीं चमत्कारिक रोगांवरसुद्धां त्यांनीं सूक्ष्म विचारानें व स्वबुद्धीनें कांहीं औषधी प्रयोग करून रोगी बरे केलेले आढळतात. या वेळीं त्यांचें वय ह्मणजे फक्त २५ वर्षांचें होतें.

पुढें एकदोन वर्षांनीं त्यांचा विवाह पणजी येथील पुरुषोत्तम उर्फ रोमटू कामत यांच्या कन्येशीं झाला. हिचें सासरचें नांव **त्रिवेणीबाई** असें ठेविलें होतें. ह्या स्वरूपानें फारशा सुंदर नव्हत्या, तरी गुणानें चांगल्या होत्या. माहेर सोडून सासरीं आल्यापासून आपल्या थोड्याशा कारकीर्दीत त्यांनीं आपल्या सदाचरणानें पति व सासुसासरे, व इतर वडील मंडळींचीं मनें आकर्षण करून घेतलीं. सर्व प्रकारच्या गृहकार्यांमध्यें त्या फार दक्ष असत. पतीच्या सेवेसंबंधाचें हरएक कामतर त्या स्वताच करित असत. पतीचें मन कधींहि अप्रसन्न होऊं नये, ह्मणून त्या फार काळजी घेत असत. आपल्या सद्गुण-मंडित स्वभावानें घरांतील सर्व मंडळीस, शेजाऱ्यापाजाऱ्यांस, सोयरेधायऱ्यांस व चाकरनोकरांसहि त्या फार प्रिय झाल्या होत्या. आपल्या प्रियभार्येचें हें निर्मळ व प्रेमळ आचरण पाहून आमचे चरित्रनायकहि आपणास धन्य मानून घेत असत. आपल्या प्रियतमेच्या हरएक कृत्यापासून त्यांच्या मनाला समाधान होई. पण हें समाधानसुख परमेश्वरानें त्यांनां फार दिवस घेऊं दिलें नाहीं! एकट्या स्वताच्या प्रापंचिक सुखांत अथवा उपाधींत गुंतून जाऊन अन्य सहस्रावधी दीन जनांवर उपकार करण्यास कांहीं प्रतिबंध घडेल असेंतर त्या विश्वकुटुंबी भगवंताच्या मनांत आलें नसेल ना! त्याची लीला तोच जाणे!

**त्रिवेणीबाई** याप्रमाणें पतिसेवेंत देह झिजवित असतां कांहीं काळानें त्या पुत्रवती झाल्या. पण हें पुत्रसुख त्यांनां फार दिवस लाभलें नाहीं. थोड्याच दिवसांत तें मूल हें जग सोडून गेलें. परंतु तो

पुत्र नसून पूर्व जन्मींचा त्यांचा कोणी शत्रूच होता, तर न जाणो! कारण तो गर्भांत असल्यापासून त्यांनां जी रक्तविकाराची व्याधी जडली, ती कांहींकेल्या हटलीच नाहीं. वैद्यतर घरचेच व प्रिय पतीच. त्यांनीं आपल्या प्रियपत्नीकरितां आपलीं स्वताचीं व इतर पुष्कळ वैद्यांचीं व डाक्टरांचीं औषधें केलीं, धार्मिक अनुष्ठानें व दानें वगैरेहि केलीं, पण ईश्वराच्याच मनांत जर ह्यांनां केवळ परोपकाराकरितां अगदीं निरुपाधिक करून ठेवावयाचें आलें होतें, तर तिकडे मनुष्य-यत्नाचें काय चालणार? पत्नीकरितां शास्त्रोक्त तयार केलेलीं औषधें व रसायनें वगैरे मागाहून लोकांच्या मात्र उपयोगीं पडलीं. पत्नीच्या मरणापूर्वी १५ दिवस वैद्यराजांनीं तिचा अंतकाल ओळखून घरच्या मंडळीस सांगून ठेविला व परलोकसाधनास उपयोगी पडतील अशीं अखेरचीं दानादिक धर्मकृत्यें तिच्याकडून करविलीं. भाकित केल्याप्रमाणें तिचा देह त्या दिवशीं पंचत्वास पोहोंचला. त्यावेळीं तिचें वय सारें १८।१९ वर्षांचें होतें. ह्या तिच्या अकालिक मृत्यूमुळें सर्व लोकांस फार दुःख झालें. भर्त्यासहि पराकाष्ठेचें वाईट वाटणें साहजिकच आहे. पण ते विचारी असल्यामुळें त्यांनी आपलें शांतवन करून घेतलें.

जगरूढीप्रमाणें त्यांस द्वितीय संबंध करून घेण्याविषयीं घरचा व इतर पुष्कळ लोकांचा फार आग्रह पडला, परंतु त्यांनीं सर्वांस असें उत्तर केलें कीं, एकटीच्याच श्रम काढतांकाढतां जीव बेजार झाला, तेव्हां पुनः अशी दुसरी बेडी घालून घेऊन सुखी असलेला जीव त्रासांत कां घालावा! ह्यांत कांहीं हंशील नाहीं. अर्थात् तुमचा विचार आपणास अगदीं पसंत नाहीं. आतां जबरदस्तीनेंच तुह्मी हा योग जुळविण्याचें कराल, तर आपण तुह्मांस खचित अंतरेन. असें त्यांनीं निक्षून सांगतांच मंडळीनें तो बेत रहित केला. ह्यावेळीं ह्यांचें वय केवळ ३५।३६ वर्षांचें ह्मणजे अगदीं तारुण्याचें होतें. पण ह्यांचे विचार फार पोक्त ह्मणजे अनुभविक ह्मातार्‍याचे होते. विषय-सुखाची क्षणभंगुरता व दुःखपरिणामिता त्यांनीं पूर्णपणें जाणली

होती. त्यांचा मनोनिग्रह असाधारण होता व आहे. जितेंद्रियता, स्वार्थत्याग, अत्युत्कट परोपकार बुद्धि, ईश्वरनिष्ठा व निर्दंभत्व हे अलौकिक गुण एखाद्या योग्याप्रमाणें ह्यांच्या अंगीं पूर्वीपासून असलेले दृष्टीस पडतात. त्यावरून हे पूर्वजन्मींचे कोणी महायोगभ्रष्ट असावेत, असे कित्येक निर्मत्सर व निरभिमान विद्वानांचेहि उद्गार निघतात.

ग्रंथांतरीं वैद्याचीं जीं गुणलक्षणें वर्णन केलीं आहेत त्यांपैकीं "**गतस्पृहो धैर्यधरः कृपालुः**" हीं तीन लक्षणेंतर यांच्यांत मूर्तिमंत वास करितात, असें ह्मणण्यास कोणतीच हरकत नाहीं. वरील तीन गुणांपैकीं पहिला गुण जो गतस्पृहता तो यांच्या ठायीं इतका वास करितो कीं, हल्लींच्या काळांत यांच्या तोडीचा निस्पृह वैद्य दुसरा सांपडणें कठीण. हे इतके निस्पृह आहेत कीं, यांच्या सांगण्याप्रमाणें औषध घेण्याच्या व पथ्यपाण्याच्या कामांत रोग्यानें हयगय केलेली यांच्या नजरेस आली असतां त्या रोग्यास–मग तो कितीहि मोठ्या योग्यतेचा असो–सोडण्यास, किंवा त्याच्या मनाविरुद्ध बेधडक बोलण्यास, हे कधींहि मागेंपुढें पाहत नाहींत. कारण स्पष्टपणें न बोलतां रहाणें, ह्मणजे आपल्या कर्तव्यास चुकणें व रोग्याचें नुकसान करणें, असें ते समजतात. बाकीचे वैद्य रोग्याच्या देणगीकडे लक्ष्य देऊन ह्मणा अगर त्याच्या मोठेपणाकडे पाहून ह्मणा, औषधास प्रतिकूल असें वर्तन त्याजकडून झालेलें दिसलें तरी त्याची कानउघाडणी न करितां तोंडापुरतें गोड बोलून वेळ मारून नेतात. तें आमच्या चरित्रनायकांस मुळींच खपत नाहीं. त्यांनां या गोष्टीचा अत्यंत तिटकारा आहे. ते रोग्याची चूक स्पष्टपणें बोलून दाखवितात. ह्यामुळें कांहीं लोक त्यांनां रागीट असें ह्मणतात. पण हा त्यांचा राग ह्मणजे रोग्यांवर खरोखर अनुराग असतो, हें त्यांनां कळत नाहीं. तोंडापुरतें गोड बोलणें किंवा श्रीमंत गृहस्थ पाहून त्यांचे समोर लांगूलचालन करणें, अथवा आपल्या मनोदेवतेविरुद्ध त्याचें सांगणें ऐकून घेणें, हें आमच्या भिषग्वर्यांस आवडत नाहीं. हा त्यांचा गुण असामान्य, उत्तम, प्रामाणिकपणाचा आणि खरें कल्याण करणारा आहे, असें कोण

सुज्ञ मनुष्य ह्मणणार नाहीं बरें?* गतस्पृहतेच्या अनुभवानुरूप जे रोगी यांच्या मर्जीप्रमाणें व आज्ञेप्रमाणें वागत असतात, त्यांच्यावर हे कधींच रुष्ट होत नाहींत, तर रोग्यांची आपल्यावर श्रद्धा पाहून हे त्यांचे उलट दास बनून रहातात.

एकनाथ, तुकारामासारख्या प्रसिद्ध सत्पुरुषांनांहि जर जगांत दोष देणाऱ्या व्यक्ती होत्या व आहेत, तर आमचे हे चरित्रनायकच त्यांतून मुक्त कसे होतील? ह्मटलें आहे:—

"मणिर्लुठति पादाग्रे काचं शिरसि धार्यते ।
क्रयविक्रय वेलायां काचः काचो मणिर्मणिः"—

(अज्ञानी मनुष्य खरें रत्न लाथेनें फेंकून देतो व कांचेचा खडा मस्तकावर धारण करितो. तथापि, रत्नपरीक्षकाच्या दुकानीं जाऊन ज्यावेळीं दोन्ही वस्तूंचा विचार होतो, त्यावेळीं काच ती काच व रत्न तें रत्नच ठरतें.) त्याप्रमाणें योग्य वेळेला योग्य पुरुषाकडून गुणीजनांचा मान व्हावयाचा तो होतोच.

यांचा स्वभाव निर्लोभी असल्यामुळें रोग्याच्या देणगीकडे यांचें लक्ष्य मुळींच नसतें. किंबहुना योग्यतेनुरूप दिलेल्या देणग्यासुद्धां त्याच वेळीं परत करून त्या देणाऱ्या गृहस्थांवर अतिशय रागें भरून उलट त्या रोग्याचे घरीं दुसऱ्या खेपेस जाण्याचें यांनीं बंद केलेलें

---

*ज्याला राग आहे तो साधु कसला? असें पुष्कळ लोकांचें ह्मणणें असतें. त्यांनीं खालील तुकारामाचा अभंग वाचून पहावा. ह्मणजे 'खऱ्याचा दास व खोट्याचा वस्ताद' हें निस्पृहतेचें लक्षणहि संताच्या ठिकाणीं असतें, असें त्यांनां समजून येईल.

"मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ १ ॥
मेले जित असों निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ॥२॥
भले तरी देऊं गांडीची लंगोटी । खट्याळाच्या काठी हाणूं माथां॥३॥
मायबापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रूहूनि ॥ ४ ॥
अमृत तें काय गोड आह्मांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ५ ॥
तुका ह्मणे आम्ही अवघेचि गोड । ज्याचें पुरे कोड त्याचे परी ॥६॥

आहे, असें पुष्कळांच्या ऐकिवांत आहे. केवळ शुद्ध विश्वासानें व एकनिष्ठेनें वागणारा एखादा रोगी यांच्या मनास मानला पुरे (मग तो श्रीमान् असो किंवा गरीब असो) त्याच्याकडे होडीसाठीं आपले स्वताचे पैसे खर्चूनहि जाण्यास हे कमी करित नाहींत. वैद्यांवर आणि औषधावर रोग्याचा दृढ विश्वास पाहिजे आहे, तो नसला तर तशा रोग्यास वैद्यानें दाराशींदेखील उभा करूं नये, असे यांचे वारंवार उद्गार निघत असतात. (शार्ङ्गधर खंड १ अ० ३ श्लोक १०७ पहा.) व तें अगदीं खरें आहे व हीच खरी निस्पृहता होय.

मोठेपणाचा डामडौल यांनां मनापासून आवडत नाहीं व हे स्वताहि मोठेपणा कधींच मिरवित नाहींत व त्यामुळें तसा डामडौल करणारा मनुष्य यांनां अप्रिय वाटल्याशिवाय राहत नाहीं. साधेपणा यांनां अत्यंत प्रिय आहे. गतस्पृहतेच्या योगानें रोगी (श्रीमंत अथवा गरीब) कोणत्याहि प्रकारचा असो, त्याच्या मनांत थोडाबहुत तरी यांचा वचक वाटल्याशिवाय रहातच नाहीं. मुष्टीमैथुनानें वीर्यनाश करून घेणारे हल्लींचे तरुण मुलगे तर यांच्या नजरे समोरहि उभे रहात नाहींत. प्रसंगविशेषीं त्यांच्या विशेष परिचयाच्या एखाद्या मनुष्यास बरोबर घेऊन तो आपली धातुनष्ट प्रकृति दाखविण्याकरितां यांच्या भेटीस आलाच, तर तशा रोग्याची चारचौघांत त्याच्या दुर्वर्तनाबद्दल खरडपट्टी काढण्यास हे उशीर लावित नाहींत. आतां असें करणें त्या लोकांस वाईट वाटतें, परंतु आपल्या घातुक संवयीमुळें होणाऱ्या वाईट परिणामाकडे लक्ष्य पुरवून ती सोडण्याच्या खटपटीस लागावयाचें त्यांचे ध्यानींमनींहि येत नाहीं, यास काय ह्मणावें? चारचौघांत केलेली फजीती समाजांत पसरून पुढें होणारे तसलेच अनर्थ टळावे, असा यांचा गुप्त हेतु असतो.

चिकित्सेच्या संबंधानें यांचें धैर्य मोठें विलक्षण आणि वर्णन करण्यासारखें आहे. कसाहि प्रसंग आला, तरी प्रायः यांच्या मनांत भीति ह्मणून उत्पन्न होत नाहीं. आजवर स्वताच्या कल्पकतेनें आणि अनुभवाच्या धीरानें यांनीं ग्रंथांत सांगितलेल्या प्रयोगाशिवाय

बाहेरचीहि पुष्कळ औषधें त्या त्या व्याधींवर देऊन, खात्रीनें चिकित्सा करून सोडिली आहे.

पुण्यासारख्या शहरांतदेखील डा. गणेश कृष्ण गर्दे, एल्. एम्. अँड् एस्. व भिषग्वर्य मेहेंदळे वगैरे विद्वान वैद्यमंडळींनें, यांची कल्पना मान्य करून त्याप्रमाणें चालण्यास आपली संमति दिली.* यावरून ह्यांची योग्यता वर्णन करावी तेवढी थोडीच आहे.

आतां हे जसे निस्पृह आहेत, तसेच मोठे कृपाळू आणि परोपकारीहि आहेत. प्रपंच्याच्या अडचणीमुळें असमर्थ झालेल्या कैक गरीब ब्राह्मण गृहस्थांच्या मुलांचें उपनयन व विवाहसंस्कार वगैरे आपल्या खर्चानें करून, त्यांनां यांनीं फार ऋणी करून सोडिलें आहे. यांची देणगी फार गुप्त असते. ह्यांनां आपली वाहवा व्हावी व आपली कीर्ति सर्वत्र पसरावी, अशी मुळींच इच्छा नाहीं. अर्थात् लौकिकाकरितां त्यांचें कोणतेंच कृत्य नसून अंगच्या सत्वगुणोद्भूत खऱ्या खऱ्या भूतदयेमुळें त्यांच्याहातून परोपकार होतात यांत संशय नाहीं.

आपल्याकरितां दुसऱ्यास त्रास किंवा श्रम देणें, हें त्यांनां मनापासून आवडत नाहीं व याचकरितां फारकरून रोग्याच्या किंवा दुसऱ्या कोणाच्याहि घरीं जेवणास वगैरे न राहतां कितीहि उशीर किंवा रात्र झाली, तरी हे परत घरीं येतात. या वैद्यकीच्यासंबंधानें परोपकारार्थ आपल्या शरीराचीहि काळजी न करितां यांनीं आजवर पुष्कळ श्रम घेतले आहेत व सांप्रतहि अशा उतार वयांतसुद्धां ते घेत आहेत. यांच्यासारखे निर्लोभतेनें परोपकारार्थ श्रम घेणारे वैद्य हिंदूंत किंवा ख्रिस्तीमतांतहि थोडेच मिळतील. **"मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जनां नीववावें"** हें तत्व यांच्या अंगीं पूर्णपणें बाणलें आहे. याची साक्ष यांच्या रोजच्या वर्तनावरून दिसून येते

---

* त्याचप्रमाणें सावंतवाडी संस्थानचे प्रसिद्ध भिषग्वर्य कै. **येसाजी पंत** हेसुद्धां एका बिकट प्रसंगीं ह्मापसें येथें रा. **दणाईत** यांच्या घरीं आमच्या प्रभूंचें नाडीनैपुण्य, धोरण व चिकित्सा पाहून चकित झाले.

आपल्या घरीं आलेल्या पाहुण्याचें आदरातिथ्य करण्यांत हे फार खबरदारी घेतात. कोणत्याहि जातीचा मनुष्य कोणत्याहि कारणासाठीं आला असला तरी तो विन्मुख जाऊं नये, ह्मणून हे फार लक्ष्य पुरवितात व त्याबद्दल ह्यांची घरांतल्या इतर मनुष्यांसहि सक्त ताकीद असते. अतीतअभ्यागतांच्या पुण्याईनेंच आपलें कुटुंब चालतें, याकरितां त्यांचें आगतस्वागत करण्यांत हयगय होऊं देऊं नये, असें यांचें सर्वांस प्रेमपुरःस्सर सांगणें असतें. घटकाभर आपलें वैद्याचें नातें बाजूला ठेवून आलेल्या गृहस्थांचा मानमरातब राखण्यास एखाद्या नोकराप्रमाणें हे झटत असतात. प्रसंगविशेषीं समाजांत अडलेलें एखादें हलकें कामहि करण्यास ते मोठ्या खुषीनें पुढें सरतात, हें पाहून त्यावेळीं मोठेपणा मिरविणाऱ्या लोकांचा गर्व अगदीं नाहींसा होतो व त्यांच्या साधेपणाचें आणि निरभिमानतेचें ते लोक फार कौतुक करूं लागतात.

वैद्यकीस आरंभ केल्यापासून यांनीं गादीवर निजण्याचें वर्ज्य केलें आहे. फक्त एक चटई व उसें घेऊन आपल्या खोलींत रात्रौ अनेक तऱ्हेचे ग्रंथ वाचित बसायाचें व अकरा बारा वाजतां शयन करून पहांटेस चार वाजतां उठावयाचें, हा यांचा नित्य क्रम आहे. धड वेळेवर जेवण नाहीं, निद्रातर तेवढ्या पुरतीच, आणि श्रमतर शक्ती पलीकडे. असें असून यांची प्रकृति कशी अगदीं निकोप आहे. यांनां दुखणें वगैरे कधीं विशेष झालेलें नाहीं. गेल्या चारपांच वर्षांमागें मात्र चातुर्थिक ज्वरानें यांचा पिच्छा पुरवून यांनां जर्जर करून टाकिलें होतें. पण तशाहि स्थितींत ते लोकसेवेचें काम यथापूर्व करितच होते. ह्या चातुर्थिक ज्वरावर त्यांनीं पुष्कळ उपाय केले, पण दोन वर्षें पर्यंत तो हटला ह्मणून नाहीं. शेवटीं तो ताप एका तपस्वी ब्राह्मणाच्या दर्शनानें व आशीर्वादानें एकदम बंद झाला व त्याबद्दल त्यांनां तसा स्वप्नांत दृष्टांतहि झाला. त्या ब्राह्मणाची स्तुति करून ही हकीकत वैद्यराज मोठ्या प्रेमानें सांगत असतात.

हे ब्राह्मण ह्मणजे पेडणें महालपैकीं कोरगांव येथें राहणारे वेदशास्त्र संपन्न **पांडुरंग शास्त्री पित्रे** हे होत. हे अध्ययनाकरितां ह्मणून काशी, नाशीकादि क्षेत्रीं पुष्कळ दिवस राहिले होते. तेथें त्यांनीं अष्टांगयोगाचाहि अभ्यास पूर्ण केला आहे. ह्यांची वृत्ति फार शांत, निरभिमान व निर्लोभपणाची आहे. एखादा रोग असाध्य दिसल्यास आमचे वैद्यराज आपल्या रोग्याला शास्त्रीबुवांकडून कांहीं जप तप अनुष्ठान वगैरे करविण्याची शिफारस करितात व त्याप्रमाणें त्यांनां गुणहि येतो. असो. वैद्यराज शास्त्रीबुवांस जितके पूज्य मानितात, तितकेच मशारनिल्हे शास्त्रीहि वैद्यरजांनां पूज्य मानितात. वैद्यराजांवर जसे शास्त्रीबुवांचे उपकार झाले आहेत, तसेच शास्त्रीबुवांवर वैद्यराजांनींहि केले आहेत. ती गोष्ट अशी:—

शास्त्रीबुवा उत्तरप्रांतांत होते, त्या वेळीं त्यांच्याबरोबर त्यांची सहधर्मचारिणी असे. तेथें तिला गर्भाशयांत एक प्रकारचा रोग उत्पन्न होऊन हळूहळू तो वाढत्या प्रमाणावर जाऊन सर्वांगच रोगानें व्याप्त झालें. त्यामुळें ती गृहकृत्यादि कार्यांस अगदीं नालायक झाली. त्यांनीं मोठमोठ्या वैद्यांस आपल्या गृहिणीची प्रकृति दाखवून चांगलींचांगलीं औषधें दिलीं. पण रोगाचें पाऊल एक रतिभरसुद्धां मागें हटलें नाहीं. अशा स्थितींत तिचीं बरींच वर्षें गेलीं. शेवटीं ते मुंबईस आले व श्रीवेंकटेश्वर छापखान्यांत व कांहीं दिवस निर्णय-सागर छापखान्यांत संस्कृत ग्रंथ वगैरे तपासण्याच्या कामावर राहिले. तेथें त्यांनीं चांगले नांवाजलेले नाडीज्ञान विशारद त्र्यंबक वैद्य ह्यांस आपल्या पत्नीची प्रकृति दाखविली. त्यांनीं नाडी परीक्षेवरून त्यांस सांगितलें कीं, हा रोग असाध्य आहे व हिच्यापासून संतानोत्पत्तीची आशा बाळगणें व्यर्थ होय. जेवढे ह्मणून शास्त्रीबुवांस वैद्य किंवा डाक्टर भेटले, त्या सर्वांत त्र्यंबक वैद्यांनीं तिच्या रोगाचें निदान बिनचूक केलें. त्या वैद्याचें तिला औषध दिलें होतें, पण कांहीं गुण आला नाहीं. ह्याप्रमाणें ते पवित्रक्षेत्रीं व मोठमोठ्या शहरीं प्रवास करून पुष्कळ वर्षांनीं घरीं आले. नंतर कांहीं आप्तइष्ट मंडळीच्या आग्रहा-

वरून फक्त संतानोत्पत्तीप्रीत्यर्थ त्यांनीं दुसरें लग्न केलें. पण कर्मधर्म-संयोगानें ही दुसरी बायकोहि रोगी निघाल्यामुळें त्यांचा सुखांत असलेला जीव दुःखांत पडल्यासारखा झाला. पण काय करणार! "**आलीया भोगासी असावें सादर**" ह्या वाक्याप्रमाणें ते दिवस कंठूं लागले. नंतर कांहीं दिवसांनीं रायबंदर येथील कित्येक सद्गृहस्थांनीं त्यांस आपल्या मुलांस संस्कृत शिकविण्याकरितां तिकडे नेलें. तेथें त्यांनीं आमच्या वैद्यराजांस आपल्या ज्येष्ठ पत्नीची प्रकृति दाखविली. त्यांनीं तिची नाडी पाहून गेल्या सातआठ वर्षांमागची तिनें अनुभविलेली स्थिति व रोग उत्पन्न होण्याचें कारण, इत्यादि सांगून हा रोग निर्मूलन होण्याची व हिच्यापासून संतानोत्पत्तीची आशा करणें व्यर्थ आहे, असेंहि सांगितलें. नाडीज्ञानावरून मागच्या सातआठ वर्षांची माहिती व एकंदर सर्व अंतर्भूत प्रकाराचें केलेलें निदान ऐकून शास्त्रीबुवांस परम आश्चर्य वाटलें व ते तेथल्यातेथेंच तटस्थ झाले. ते ह्मणाले " आपण हिंदुस्थानचा बराच प्रवास केला, मोठमोठे वैद्य व हकीम पाहिले, पण नाडीज्ञानकलेंत एवढे वाकबगार वैद्य कुठेंच आपल्या आढळण्यांत आले नाहींत. धन्य ह्यांची! हे पूर्वजन्मीं कोणी वैद्य असून ह्यांची ती वैद्यक्रिया त्यावेळीं अपूर्ण राहून त्यांचा देह पडल्यामुळें ह्या जन्मीं ती ह्यांनीं पूर्ण केली आहे व खरोखर ह्यांजवर कांहींतरी ईश्वरी प्रसादहि असला पाहिजे, असें आपणास वाटतें."

वैद्यांनीं त्यांच्या बायकोस पोटांत कांहीं औषध देऊन तैल मर्दन सुरू केलें व ती जी अगदीं धरून पडली होती, तिला आपल्या हाता-पायांनीं उठून फिरेसें केलें. अर्थात् ती घरांतील कांहीं कामधंदा करण्यास योग्य झाली. पुढें शास्त्रीबुवांच्या दुसऱ्या बायकोसहि त्यांनीं चांगलीं औषधें देऊन बरें केलें. पुढें तिला ऋतु प्राप्त झाल्यानंतर वैद्य राजांनीं तिचे सर्व सुखसोहाळे मोठ्या थाटानें करविले. त्यांनीं शास्त्री-बुवांस सांगितलें कीं, ह्या बायकोपासून आपणास खचित पुत्र होईल, ह्या विषयीं कांहीं संशय बाळगूं नका. शास्त्रीबुवा हे तेथें थोड्या

दिवसांकरितां आले होते, पण वैद्यांवर त्यांची अतिशय भक्ति बसून व त्यांच्या सहवासाचा लाभ मिळावा ह्मणून त्यांनीं तेथें पांच वर्षें काढिलीं. वैद्यराजांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांस पुत्र झाला असून वैद्यांच्या कृपेचें हें फळ, असें ते मोठ्या प्रेमानें सांगत असतात. अस्तु.

वैद्यराज मोठे ईश्वर भक्तिपरायण असून आपलें कुलदैवत श्रीदेवकी कृष्ण ह्यांचे कट्टे उपासक आहेत. श्रीकृष्णाचे उत्सव चालतात, त्या दिवसांत हे बहुधा घरीं मिळणें कठीण. हे उत्सव साजरे करून घेण्याकरितां ते श्रीस्थळ महाशाल येथें जात असतात.

ह्यांचें अध्यात्म ग्रंथांचें वाचन ह्मटलें ह्मणजे एकनाथी भागवत, ज्ञानेश्वर व तुकाराम, नामदेव इत्यादि साधूंच्या कविता. ह्या साधूंच्या कविता वाचण्यांत त्यांनां फार आनंद होतो. हे वैद्यशास्त्राप्रमाणेंच अध्यात्म विषयांतहि फार निपुण आहेत. तशा संबंधाचा ओघ आला ह्मणजे ईश्वरीज्ञानाविषयीं यांच्याकडून पुष्कळ माहिती मिळते. आणि ही माहिती केवळ शाब्दिक नसून स्वानुभविक असल्याचें दिसून येतें.

ह्यांनीं वैद्यशास्त्रांत चारपांच शिष्य पढवून तयार केले आहेत. त्या सर्वांत कुंभारजुवें येथील वे. शा. सं. **विठ्ठल बाबू कामत वैद्य** यांची विशेष प्रसिद्धि आहे. हे विद्वान गृहस्थ चांगले पुराणिक व उत्तम ज्योतिषी आहेत. यांचा स्वभाव फार शांत असून ते नम्र व मधुरभाषणी आहेत. आपल्या गुरूंवर यांची चांगली भक्ति आहे. हेहि आपल्या गुरुवर्यांप्रमाणेंच लोकहिताचे कामीं फार झटत असतात. एखादा कठीण प्रसंग दिसला ह्मणजे तेथें आपल्या गुरुवर्यांस नेऊन त्यांच्या अनुमतानें हे चिकित्सा करितात. दुसरे आमच्या चरित्रनायकांनीं आपले पुतणे रा. रा. **फोंडू प्रभु** यांचाहि विद्याभ्यास मागें सांगितलेले वे. शा. सं. **पांडुरंगशास्त्री पित्रे** यांनां ठेवून करविला आहे. ह्यांचीहि संस्कृतांत चांगली गति आहे. चुलत्याच्या सहवासानें वैद्यकीचें ज्ञान ह्यांस चांगलें झालेलें दिसतें, तरी त्यांनीं आणखी वरचेवर अनेक बाबतींत वैद्यराजांकडून माहिती

घेऊन आपल्या ज्ञानांत व अनुभवांत विशेष भर घालावी आणि आपण त्यांस पुतणे अधिक शोभूं असें करावें, अशी आमची त्यांस प्रेमाची सूचना आहे. खरोखर पाहिलें असतां आमच्या या सूचनेची त्यांस गरज नाहीं हें त्यांच्या कर्तबगारीवरून व लोकप्रियतेवरून दिसून येतें. तथापि तृप्ति मानिली ह्मणजे वुद्धीची पुढची वाढ खुंटते, एवढ्याकरितांच सूचनेचें थोडेसें साहस केलें आहे, याची त्यांनीं माफी करावी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 913
(स्थळ प्रत)

# भाग दुसरा.

एखाद्या शूराचें चरित्र लिहावयाचें म्हणजे त्यानें जिंकलेल्या लढाईंचें वर्णन करावयाचें, त्याप्रमाणें एखाद्या वैद्याचें चरित्र सांगावयाचें म्हणजे दुर्धर रोगरूपी शत्रूंनीं बेजार केलेल्या मनुष्यांस त्यानें कसें सोडविलें, ह्यांचीं उदाहरणें द्यावयाचीं. रणशूरांची रणांतील कृत्यें जितकीं महत्वाचीं व मनोरंजक, तितकींच अशा वैद्यांचीं आसन्नमरण झालेल्या रोग्यांनां रोगमुक्त करून प्राणदान दिल्याचीं कृत्यें महत्वाचीं व मनोरंजक असतात. पराजित शत्रूंच्या नांवावरून व संख्येवरून जसें शूराचें शौर्य ताडावयाचें, तसेंच, रोग्यांच्या व निर्मूलन केलेल्या रोगांच्या नांवावरून व संख्येवरून वैद्यांचें अद्भूत नैपुण्य व धैर्य जाणावयाचें. या करितांच उत्तरार्ध हा चरित्रनायकांनीं बरे केलेल्या रोग्यांच्या उदाहरणांचा लिहिला असून तोच त्यांचें गुणविशिष्टत्वाचा दर्शक व त्यांच्या चरित्रांतील महत्वाचा भाग आहे. ह्या उदाहरणांवरून फक्त चरित्र नायकाचेंच अद्भूत कार्यकर्तृत्व व त्यांची योग्यता कळेल असें नाहीं, तर आपल्या आर्यवैद्यकाचीहि योग्यता उत्तमरीतीनें लक्ष्यांत येऊन त्यायोगें स्वाभिमान जागृतीसहि थोडी मदत होईल अशी पूर्ण उमेद आहे, ती परमेश्वर पूर्ण करो.

तीं उदाहरणें पुढें लिहिल्याप्रमाणें:—

**उदाहरण १ लें**—सुमारें वीस वर्षां मागें वैकुंठवासी **गिरिधर शेणवी धेंपे** हे कांहीं कामाकरितां **पुणें** मुक्कामीं गेले होते. त्यावेळीं ते तेथील **रामलाल** या नांवाच्या श्रीमंत गृहस्थांच्या घरीं बिऱ्हाडास उतरले. हे रामलाल जातीनें गंवडी असून तिकडे प्रतिष्ठित श्रीमंत गृहस्थांत मोडतात. त्यांच्या घरची व्यवस्था, चाकर माणसांची त्यांच्यावर असलेली पूज्यबुद्धि, गृहकृत्यांतील त्यांची दक्षता, उद्योगधंद्या-विषयींचें धोरण, पाहुण्याचें आदरातिथ्य, स्वतः करण्याविषयींची खबरदारी, देव देवतार्चन अतीतअभ्यागतांस निष्कामबुद्धिपुरःसर

दानधर्म करण्याची त्यांची वांच्छा इत्यादि पाहून श्रीमंत **धेंपे** यांस सानंदाश्चर्य वाटलें. पण इतकीं प्रापंचिक सुखें त्यांस अनुकूल असतांहि ते फार चिंताग्रस्त दिसत होते, हें पाहून श्रीमंत **धेंपे** यांनीं त्यांस त्याचें कारण विचारिलें. त्यावर त्यांनीं सांगितलें "प्रपंचासंबंधीं वगैरे ईश्वरकृपेनें आपल्यास कशाच प्रकारची उणीव नाहीं. पण ज्यावर प्राण्यांचीं सर्व सुखें अवलंबून असतात, तें आरोग्य आपणास मुळीं कमी आहे व त्यामुळें या सर्व प्रापंचिक सुखाचा व वैभवाचा कंटाळा येऊन गेला आहे. आज किती दिवस झाले, आपणास एक नाडीव्रण झाला आहे, त्यायोगानें जीवाचे हाल होतात ते सांगून पुरवत नाहीं. जिभेस रुचि नाहीं, लघ्वी व शौचास साफ होत नाहीं, शक्ति क्षीण होत चालली आहे व त्यामुळें काळजांत धडकी भरली आहे. कोणचेंच औषध लागू पडत नाहीं. मोठमोठ्या युरोपियन व हिंदु डाक्टरांचीं, नामांकित आर्य वैद्यांचीं वगैरे पुष्कळ औषधें घेतलीं, पण त्यापासून कांहींच गुण नाहीं. कोणी अमुक वैद्य चांगला आहे त्यांच्या औषधापासून आपणास गुण येईल असें सांगितलें कीं पुरे, त्यास तावडतोब आणून प्रकृति दाखवून औषध घ्यावें. पण अद्याप गुणाचें नांव नाहीं. आतां सर्व भरिभार ईश्वरावर टाकून बसलों आहें, तो काय करील तें करील!" हे त्यांचे उद्गार ऐकून श्री० **धेंपे** यांनीं त्यांस सांगितलें कीं, आमच्या गोव्यांत **त्रिविक्रम प्रभु लवंदे** या नांवाचे नामांकित आर्य वैद्य आहेत ते नाडीपरीक्षेंत व चिकित्सा वगैरे करण्यांत फार कुशल आहेत. त्यांनीं अति क्षीण होऊन मृत्युपंथास लागलेले असाध्य रोगीसुद्धां बरे केले आहेत. तेव्हां आपण गोव्यांत येऊन त्यांचें औषध घ्याल तर निःसंशय बरे व्हाल. त्यांच्या योग्यतेचें वर्णन आमच्यानें येथें करवत नाहीं. आपणास प्रचीति आली म्हणजे खात्री होईल. दुसऱ्या दिवशीं श्री० **धेंपे** गोव्यास जाण्यास निघाले. त्यावेळीं **रामलाल** यांनीं आपण दोनतीन दिवसांनीं इकडची व्यवस्था करून येतों असें सांगून श्री० **धेंपे** यांस निरोप दिला. चौथे दिवशीं रामलाल बरोबर

चाकर माणसें घेऊन गोव्यास येण्याच्या. तयारीनें शहापुरास रा० **गोपाळ नाईक गिंडे** यांचे घरीं आले व त्यांनां आपली हकीकत कळविली. गिंडे यांनींहि त्यांची हकीकत ऐकून घेऊन फार चांगलें केलें, असें त्यांस सांगितलें व आपणहि बरोबर येण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं तेथून निघून ही मंडळी पणजी येथें श्री० **धेंपे** यांचे घरीं आली. श्री० **धेंपे** यांनीं त्यांचें आगतस्वागत चांगल्या रीतीनें करून त्यांस एक दिवस ठेवून घेतलें. तिसरे दिवशीं ते **रायबंदर** येथें वैद्यराजांचे घरीं आले. पण वैद्यराज घरीं नाहींत! सातआठ दिवसांनीं येतील असें त्यांस कळलें व आपली खेप फुकट झाल्याबद्दल त्यांस फार वाईट वाटलें. त्यानंतर त्यांस पणजीच्या एका गृहस्थानें सांगितलें कीं, **केरी** येथें रा. **पांडुरंग वैद्य** हेहि फार चांगले आहेत. त्यांच्याकडे उत्तमोत्तम औषधांचा संग्रह आहे, त्यांचें औषध अगत्यपूर्वक घ्यावें. हें ऐकून **रामलालांनीं** प्रयत्न करून त्यांचें औषध घेतलें. पण त्यांच्या खात्रीजोगा त्यांस गुण वाटेना. तेव्हां ज्यांच्याकरितां पुण्याहून मुद्दाम इकडे आलों, त्यांस एकदा भेटून ते कोणत्या तऱ्हेची चिकित्सा करितात हें पाहून परत आपल्या गांवीं जावें, असा त्यांनीं निश्चय केला व पुनः थोड्या दिवसांनीं ते वैद्यराजांचे घरीं आले. यावेळीं वैद्यराजांची व त्यांची सुदैवानें गांठ पडली. आगतस्वागत वगैरे झाल्यावर वैद्यराजांनीं प्रसन्नवृत्तीनें त्यांची बराच वेळ नाडी पाहून त्यांस होत असलेले सर्व विकार तावडतोब सांगितले व व्याधीचें अद्याप असाध्य लक्षण झालेलें नाहीं, आपण कांहीं भिऊं नये, असें त्यांस आश्वासन दिलें. नंतर औषध चालू करून त्यांस स्वतः आपल्या घरीं आठ दिवस ठेवून घेतलें. आपण 'पोत' करून घेतला पाहिजे, त्याशिवाय रोगाचें निर्मूलन व्हावयाचें नाहीं असेंहि वैद्यराजांनीं त्यांस सांगितलें. त्यांनीं तें कबूल करून फार दिवस रहाण्याची सवड नसल्यामुळें पुण्यास जाण्याचा निरोप मागितला. या आठ दिवसांत औषधसेवनापासून त्यांस बरें वाटूं लागलें. पुण्यास गेल्यानंतर पोत करून घेण्याचें ठरलें व **रामलाल**

वैद्यराजांकडून तीन सप्तकांचें औषध घेऊन पुण्यास निघाले. घरीं पोंचल्यानंतर औषध चालू करून वैद्यराजांनीं सांगितल्याप्रमाणें पायाला पोत करून घेतला. एकदोन आठवडे झाल्यानंतर त्यांस हळूहळू भूक वगैरे लागूं लागली व जिवास बरीच हुशारीहि दिसूं लागली. पण व्रण कांहीं भरून येईना. ह्मणून त्यांनीं वैद्यराजांस तिकडे जरूर निघून येण्याविषयीं नम्रतापूर्वक प्रार्थना करून पत्र पाठविलें. तें पत्र त्यांचे हातीं पडतांच दुसऱ्या दिवशीं पुण्यास निघण्याची त्यांनीं तयारी केली. तेथें पोहोंचल्यानंतर वैद्यराजांनीं त्यांची प्रकृति पाहिली, व त्यांस सांगितलें कीं, आपणास पाहिजे असल्यास इतर वैद्यांनां मिळवून कॉन्सुल्ज (सल्ला) करूं. त्यासाठीं आपल्याइकडचे नामांकित आर्यवैद्य किंवा डाक्टर असतील तर त्यांनां बोलवा. त्याप्रमाणें रामलालांनीं चौघांजणांस ठरल्यावेळीं येण्याविषयीं पत्रें पाठवून निमंत्रण केलें. त्यांत पुण्यांतील सुप्रसिद्ध डा. **गणेश कृष्ण गर्दे** हे होते. ते सर्व एकत्र मिळाल्यानंतर, मशारनिल्हे गर्दे यांनीं आमच्या भिषग्वर्यांस प्रश्न केला कीं, आपण निदान व चिकित्सा काय केली आहे? वैद्यराजांनीं उत्तर केलें:—

**हेत्वादिरूपाकृतिसात्म्यजातिभेदैः समीक्ष्यातुर सर्वरोगान्‌।**
**चिकित्सितं कर्षणबृंहणाख्यं कुर्वीत वैद्यो विधिवत्सुयोगैः॥**

"हेतु[1], आदिरूप[2], आकृति[3], सात्म्य[4] व जाति[5] या भेदांनीं

---

१. **हेतु** ह्मणजे रोगोत्पत्तीचें कारण त्यालाच **निदान** असें ह्मणतात. २. **आदिरूप**–पुढें रोग उत्पन्न होणार असें ज्या लक्षणानें कळतें तें. त्यालाच पूर्वरूप ह्मणतात. ३. **आकृति**- व्याधि उत्पन्न झाल्यावर त्या व्याधीचीं जीं लक्षणें उद्भवतात तीं. ह्मणजे जसें ज्वर उत्पन्न झाल्यावर संताप, तहान, मूर्छा, भ्रम, निद्रानाश इत्यादिक त्या लक्षणांलाच रूप असें ह्मटलें आहे. ४. **सात्म्य**–औषध, अन्न, विहार यांचा जो सुखावह होणारा उपयोग तो, त्यालाच उपशय असें ह्मणतात. ५. **जाति**– आपल्या कारणांनीं कुपित झालेला दोष आपलें स्थान सोडून शरीरांत वर खालीं चहूंकडे फिरून जी रोगाची उत्पत्ति करित असतो, त्यावेळची जी स्थिति (ह्या दोषांची इति कर्तव्यता) ती होय, तिलाच संप्राप्ति ह्मणतात.

व्यापलेले रोगी यांची कर्षणारूप ( स्थूल झालेल्या रोग्यांस वारीक करणें ) व बृहणरूप ( अति क्षीण झालेल्या रोग्यांस मोठे करणें ) हें समजून विधिपूर्वक उत्तम योगांनीं वैद्यानें प्रतिक्रिया करावी. तसेंच-

**द्विधा व्रणः परिज्ञेयः शारीराग्न्तु भेदतः ॥**
**दोषैराद्यस्तयोरन्यः शस्त्रादिक्षतसंभवः ॥**

शारीर व आगंतुक ह्या भेदानें व्रण दोन प्रकारचे होतात. पहिला शारीर दोषांनीं व दुसरा शस्त्रादिकें करून होतो. तसेंच व्रणाचे पुष्कळ प्रकार आहेत, परंतु त्यांत सद्योव्रण, नाडीव्रण, अग्निदग्ध व्रण व आगंतुक व्रण हे वैद्यग्रंथांत मुख्य भेद मानिले आहेत. माधवनिदानांत सांगितलें आहे कीं, कुशल वैद्यांनीं त्या नाडीची गति पाहून शस्त्रानें फाडून तें छिद्र मोठें करावें व नंतर व्रणोक्त क्रिया करावी. रोगी कृश व भित्रा असा असेल, तर मात्र.क्षारादिक लावून तें छिद्र मोठें करावें किंवा सोन्याची काडी त्या छिद्रा एवढी करून अग्नींत तापवून त्या छिद्राला डाग द्यावा. इत्यादि पुष्कळ प्रकार आहेत; परंतु आह्मी आमच्या एका अनुभविक सिद्धांतावरून यांस पोत करून घेण्यास लाविलें व व्रणावरचें औषध चालू केलें आहे, तेणेंकरून ह्यांस आरोग्य सिद्धि होईल असा आमचा तर्क वाहतो. आपलें यावर काय ह्मणणें आहे तें कळवा. परंतु त्यांचीं मतें निदानाविषयीं भिन्न पडलीं. इतक्यांत तेथील सुप्रसिद्ध आर्यवैद्य **मेहेंदळे** हेहि येऊन पोहोंचले. **मेहेंदळ्यांनीं**हि आमच्या भिषग्वर्यास कांहीं प्रश्न केल्यावर त्यांची खातरी होऊन त्यांचेहि मतें प्रभूंनीं सांगितलेलें निदान व केलेली चिकित्सा हीच खरी आहे असें ठरलें व सर्वांनीं आपलें एक मत करून ह्यांचेंच औषध चालविण्याविषयीं अनुमोदन दिलें. **मेहेंदळ्यांनीं**तर यांची नाडीज्ञान विशारदता व धोरण पाहून अतिशय स्तुति केली व अशा तऱ्हेचे नाडीपरीक्षक इकडे क्वचितच मिळतील, किंबहुना नाहींतच ह्मटलेंतरी चालेल, असेंहि त्यांनीं उद्गार स्पष्ट काढिले. **मेहेंदळे** यांची ही सत्यप्रियता व निर्मत्सरता तारीफ करण्यासारखी आहे. असो. आमच्या वैद्यराजांनीं त्यानंतर त्यांस दुसरें औषध चालू केलें व एकदोन दिवसांनीं त्यांनीं

गोव्यास निघण्याची तयारी केली. कारण तेथील हवा त्यांस मानेनाशी झाली. ढेंकूण, चिलटें यांचा मनस्वी त्रास होऊं लागल्यामुळें सारी रात्र त्यांस जागरण होऊं लागलें. याकरितां **रामलालां**कडून त्यांनीं लवकर निरोप घेतला. **रामलालां**नींहि या प्राणदात्या भिषग्वर्यांची उत्तम तऱ्हेनें संभावना केली. मग वैद्यराज इकडूनच **रामलालां**स वरचेवर औषधें पाठवित असत. कांहीं महिने गेल्यावर ते **रामलाल** त्या रोगांतून अगदीं चांगले झाले. वैद्यराज ह्मणजे त्यांनां प्रति धन्वंतरीच भासूं लागले. वैद्यराजांस त्यांचीं वरचेवर आभारदर्शक पत्रेंहि येत असत. याप्रमाणें सर्व महाराष्ट्रास भूषणभूत असलेल्या पुणें शहरांत नामांकित वैद्यांसमोर यश मिळवून आमचे वैद्यराज परत स्वस्थानीं आले.

**उदाहरण २ रें**—सन १८७७ सालीं गोमांतकांतील **चोडण** नांवाच्या गांवीं रा० **विठ्ठल ह्माले** या नांवाच्या गृहस्थास *दाहपूर्वक ज्वर येऊं लागला. ह्मणून घरच्या मनुष्यांनीं त्याच गांवच्या दोघां ख्रिस्तियन कार्ताद ( सनदी ) डाक्टरांस आणून त्यांची प्रकृति दाखविली. त्यांतील एकाचें नांव **कायतान मेणकर** व दुसऱ्याचें **तोलेंतीस लोब** असें होतें. हे डाक्टर सुशिक्षित असून त्यांची त्या गांवांत प्रख्याति असे. दोघांहि डाक्टरांनीं रोग्याची चांगल्या तऱ्हेनें तपासणी केल्यानंतर औषधाची यादी लिहून दवाखान्यांतलें औषध आणून देण्याविषयीं घरच्या मनुष्यांस फर्माविलें. त्याप्रमाणें त्यांनीं औषध आणून रोग्यास दिलें. डाक्टर साहेबांनीं दिवसांतून

---

* ( मा. नि. ) पहिल्यानें पित्त रसगत होऊन अत्यंत दाह करितें. नंतर त्याचा वेग शांत झाला ह्मणजे वातकफ, शेवटीं शैत्य करितात. दाहपूर्वक आणि शीतपूर्वक हे दोन्ही ज्वर त्रिदोषांच्या संबंधानें होतात. त्यापैकीं दाहपूर्वक ज्वर दुःखप्रद आणि अत्यंत कष्टसाध्य आहे. आणि शीतपूर्वक ज्वर सुखसाध्य आहे. कारण शीतज्वराला उष्ण उपचार करितां येतात, परंतु दाहपूर्वक ज्वराला अति शीत उपचार करावयाचे नाहींत.

रोग्याचे घरीं सकाळ संध्याकाळ अशा दोन खेपा कराव्यां व ज्वर हटविण्याकरितां नाना तऱ्हेचीं दिव्य औषधें द्यावीं, पण गुण ह्मणून कांहींच न दिसतां दिवसेंदिवस प्रकृति जास्तजास्त बिघडत चालली व ज्वरहि अनावर होत चालला, आणि शक्तितर अगदीं क्षीण झाली. डाक्टरांचें ह्याप्रमाणें एक महिना औषध करून गुण कांहींच नाहीं, त्यामुळें घरांतील मंडळीची अगदीं निराशा झाली व त्यांनीं त्यांचें औषध बंद केलें. अशा पदवीधर अनुभविक डाक्टरांकडून जर ज्वर हटत नाहीं, तर आणखी आशा करणें निरर्थक होय, असेंहि त्यांनां वाटूं लागलें. शेवटीं वैद्यराज **त्रिविक्रम प्रभु लवंदे** यांनां आणण्याचा सिद्धांत करून घरचा एक मनुष्य होडी करून रायबंदरीं गेला. या वेळीं रोग्याची स्थिति फारच भयंकर झाली होती. ज्वरानें त्याचें अंग इतकें तप्त झालें होतें कीं, जवळच्या मनुष्यासहि तो दाह सहन होत नव्हता. शरीरांत मांसाचा भाग शिल्लक राहिला नसून फक्त अस्थि आणि चर्म राहिलें होतें. त्याला देहाची स्मृति बिलकुल नव्हती. प्राण आहे ह्मणून समजण्यापुरता मात्र श्वासोच्छ्वास चालला होता, व आतां घटकेनें या प्रापंचिक मायेला लाथ मारून आह्मांस हा निःसंशय सोडून जाणार, असें वाटून अन्नपाण्याविरहित एकंदर मंडळी दुःखग्रस्त होऊन रुदन करित बसली होती. प्राण्याला सद्गति मिळावी ह्मणून कोणी रामरक्षा, कोणी विष्णुसहस्रनाम, कोणी गीतापाठ, कोणी गरुडपुराण इत्यादि वाचित होते. आपल्या सौभाग्यमंदिरावर आज आकाशाची कुऱ्हाड तुटून पडते ह्मणून मोठ्या आक्रोशानें देवा देवा! असें ह्मणत एका कोपऱ्यांत त्यांची पत्नी विव्हळत पडली होती. तिच्या शेजारीं शांतवन करणाऱ्या दोनचार बाया नेत्रांतून अश्रू ढाळित तिचें समाधान करित होत्या. परकी गृहस्थमंडळी बाहेर आपापसांत कुजबुजत होती. कोणी ह्मणे कीं, आतां वैद्य येऊन काय करणार? पुढील तयारीच केली पाहिजे! कोणी ह्मणे '**तुका ह्मणे भोग सरे, गुण देतील आंगारे!**' त्याप्रमाणें ते दोघे डाक्टरहि निराशेमें आपसांत पोर्तुगीज भाषा बोलत खुर्च्यांवर बसले होते. इतक्यांत

आमचे दयाळू व उदार अंतःकरणाचे चरित्रनायक तेथें येऊन दाखल झाले व आंत जाऊन त्या डाक्टरांजवळ तिसऱ्या खुर्चीवर बसले. त्यांनीं पांच मिनिटें रोग्याचा हात धरून नाडी पाहिली व मंडळीस सांगितलें, कीं "हा ज्वर फार मोठा आहे, पण रोग्याच्या सुदैवानें हा अद्याप असाध्य स्थितींत गेलेला नाहीं; कांहीं काळजी करूं नका. ईश्वरकृपेनें हे चार दिवसांनीं बरे होतील." असें ह्मणून त्यांनीं खिशांतून औषध काढून दिलें व ताबडतोब देण्यास सांगितलें. "ह्या औषधानें यांनां गुण पडेल व प्रकृतींत अमुक अमुक फेरफार होईल, तुह्मी बिलकूल भिऊं नका." इत्यादि सूचना करून वैद्यराज घरीं जाण्यास उठले. इतक्यांत त्या दोघां डाक्टरांनीं थट्टेस आरंभ करून खदखदा हंसून गर्वोक्तीनें वैद्यराजांस प्रश्न केला कीं "या रोग्याला तुह्मी चांगला कराल काय? हा रोगी ह्यांतून पार पडेल तर ह्याचे बायकोचें महद्भाग्यच समजलें पाहिजे. जर तुह्मी ह्यास बरा कराल, तर आह्मी आपल्या सरकारांतून मिळविलेल्या सनदांस हरताळ लावूं. यास बरा करण्याकरितां आह्मीं नाना तऱ्हेचीं औषधें दिलीं, आमची होती तितकी पराकाष्ठा केली, पण कांहीं नाहीं; तेव्हां तुमचेकडून कसें काय होणार तें समजून चुकलेंच आहे. ह्या लोकांस व्यर्थ आशेवर कां ठेवतां?" वैद्यराजांनीं त्यांस जास्त कमी कांहीं उत्तर न देतां "फक्त ईश्वर कृपा करील तर हा रोगी चार दिवसांनींच बरा होईल असें मला वाटतें." असें ह्मणून सर्वांचा निरोप घेतला व घरीं जाऊन आणखी रामबाण औषध पाठवून दिलें. काय आश्चर्य सांगावें! वैद्यराजांनीं सांगितल्याप्रमाणें हटकून चौथ्या दिवशीं त्यांचा ताप कमी झाला व त्यांस जरा स्मृति आली. आठपंधरा दिवसांनीं रोगी चांगला बरा होऊन हिंडूंफिरूं लागला. हें पाहून त्या दोघां डाक्टरांस अतिशय आश्चर्य वाटलें. एकदोन महिन्यांनीं वैद्यराज आणखी एका रोग्यास पहावयास चोंडणास गेले होते. त्यावेळीं वैद्यराज आल्याचें समजतांच वरील डाक्टर त्यांस मुद्दाम जाऊन भेटले व झाले यांचे घरीं थोडेंसें टाकून बोलल्याबद्दल पश्चात्ताप दर्शवून त्यांनीं

वैद्यराजांची क्षमा मागितली व तेथून होडीपर्यंत सत्कारपूर्वक वैद्यराजांस पोहोंचवून ते मागें परतले. वैद्यराजांनीं आणखीहि आपलीं जीवावरचीं दुखणीं बरीं केल्याबद्दल त्यांचें स्तोत्र ते ( विट्ठल झाले ) गात आहेत.

**उदाहरण ३ रें**—अंत्रूज महालांत बांदोडें गांवीं **पांडुरंग नाईक नमशीकर** या नांवाच्या गृहस्थास एका दुर्धर रोगानें गांठलें होतें. तो रोग कोणत्या प्रकारचा होता, ह्याची परीक्षाच कित्येक वैद्यांनां व डाक्टरांनां बिलकूल होईना. त्या रोगांतून चांगला होण्याकरितां त्या गृहस्थानें मोठमोठ्या डाक्टर व वैद्यलोकांचीं औषधें घेतलीं. पैशांची बरीच राखरांगोळी केली. पण त्यांस होत असलेला विकार रतीभरसुद्धां कमी होईना. दिवसेंदिवस त्याचें शरीर क्षीण होत चाललें व पुढील जीविताची त्यास निराशा भासूं लागली. एके दिवशीं बारदेश वेरें येथील **जिऊ नाईक भाटकर** या नांवाचा त्याचा एक मित्र त्यास कांहीं कामाकरितां भेटण्यास गेला होता. मशारनिल्हे नाईकाचा क्षीण दशेप्रत पोहोंचलेला देह पाहून भाटकर यांनीं विचारलें कीं "आपली अशी दशा होण्यास कारण काय? आपणास कोणता विकार होतो तें कृपा करून मोकळ्या मनानें मला जरूर सांगावें." त्यानें उत्तर केलें कीं "मी जेवतों खातों चांगला, पण मला काय होतें तें माझें मलाच समजत नाहीं. मला जी व्यथा होते, तिचें निर्मूलन करणारा कोणीच वैद्य आजपर्यंत मला भेटला नाहीं व भेटेल असेंहि मला वाटत नाहीं. ह्या कामीं मीं मागेंपुढें न पाहतां पैशाचा बराच चुराडा केला, पण सर्व निरर्थक. माझ्या रोगाचें मूळबीज आपणास सांगतों तें ऐका. प्रथम माझ्या पायाच्या अंगुष्ठास कांहीं चावल्यासारखें होऊन जी तिडीक उठते त्यासरशी धाडकन् जमिनीवर पडून बेशुद्ध होऊन माझी मृतवत् अवस्था होते व देहाचें कांहींच भान रहात नाहीं. एका तासानें पूर्ववत् स्थितीवर येतों. हा क्रम आठवड्यांतून दोनदा होतो. हा एक प्रकारचा वायू आहे, असें बहुतेक वैद्यांनीं सांगितल्यावरून

वायूवरचीं अनेक तऱ्हेचीं औषधें घेतलीं; तसेंच चांगलींचांगलीं तेलेंहि रगडून पाहिलीं, पण कांहींच फेरफार न होतां रक्तशोषण होऊन अशी स्थिति झाली आहे. त्यास काय करावें? पूर्वकर्मानुसार जें कांहीं प्राप्त होईल तें भोगलें पाहिजे, दुसरा उपाय नाहीं. औषधोपचार तर सर्व करून थकलों." असें ऐकून त्याच्या मित्रानें त्यास सांगितलें कीं "या तुमच्या रोगाची योग्य परीक्षा, तुह्मांला होत असलेले विकार व त्याचे पूर्वकर्मविपाक आमचे प्रसिद्ध नाडीज्ञान विशारद वैद्य त्रिविक्रम प्रभु लवंदे हे निःसंशय करतील. तें ऐकून आपण अगदीं थक्क व्हाल. त्यांच्या परीक्षेचें कोणाच्यानेंहि वर्णन करवणार नाहीं. स्वतः आपण अनुभव घ्यावा, ह्मणजे खात्री होईल." हें मित्राचें सर्व बोलणें ऐकून सदहु नाईक यांस वैद्यांस केव्हां जाऊन भेटेन अशी फार उत्कंठा लागली व आपल्या त्या मित्रासहि बरोबर घेऊन ते वैद्यांच्या घरीं आले. पण त्यावेळीं वैद्य घरीं नव्हते, त्यामुळें त्या रात्रीं ते दोघेहि त्यांच्याच घरीं राहिले. रात्रौ ११ वाजतां वैद्यराज घरीं आले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं वैद्यांनीं त्यांची नाडीपरीक्षा करून सांगितलें कीं "आपल्यास वातपित्तकफ या भेदेंकरून विशेष रोग नाहीं. पण अंगुष्ठास कांहीं जीवजंतु चावल्यासारखा भास होऊन त्याबरोबर आपणास अकस्मात बेशुद्धपणा यावा, असा भाग नाडीवरून दिसून येतो. माधवनिदानांत 'पाददर्शवायू'चें असें एक लक्षण सांगितलें आहे. पायास मेहरी येऊन स्पर्श कळेनासा होतो. हा कफवातापासून होतो. अशा तऱ्हेचा हा वायू असेल असें समजून कित्येक वैद्यांनीं त्यावर आपण सांगतां त्याप्रमाणें औषधें दिलीं असतील. पण हा वायुरोग वगैरे कांहीं नसून आपणास ही आपल्या घरच्या समंधाची बाधा आहे व तो समंध आपल्यामागें हात धुऊन पाठीस लागला आहे. त्याची पीडा आपणास फार त्रासदायक होऊन तो आपल्या शरीराची राखरांगोळी केल्याशिवाय सोडणार नाहीं. त्यास दुसरें कोणतेंच औषध नाहीं. फक्त तशा तऱ्हेचे कांहीं उपचार कराल, तरच यांतून आपण पार पडाल."

हें ऐकून सदहू नाईकांस फार आश्चर्य वाटलें. "समंधाचा वगैरे प्रकार आमच्या घरीं विलकुल नाहीं," असें ते सांगूं लागले. वैद्यराज ह्मणाले "आपल्या नाडीवरून गृहसमंधाची बाधा याशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. जर तसा कांहीं प्रकार नसेल, तर आपण अन्य ठिकाणीं जाऊन औषधोपचार केल्यास फार उत्तम. फक्त आह्मी औषधाशिवाय दुसरी तजवीज सांगूं त्यास आपण मान्य आहां तर काय तें सांगा." असें त्यांनीं ह्मटलें. त्यावेळीं तेथें थोरलें गोवें येथील रा. पुरुषोत्तम नाईक हे होते. त्यांनीं वैद्यराजांस विचारलें कीं "समंधिक पीडा ह्मणजे काय याचा स्पष्टार्थ सांगा." वैद्यांनीं सांगितलें "मानवी प्राण्याचा मनांतील हेतु परिपूर्ण न होतां, दुर्दैवानें अकस्मात् त्याजवर मृत्यूचा घाला पडला ह्मणजे इच्छित वस्तूवर त्याची आशा राहून त्या वस्तूचा उपभोग दुसरा घेऊं लागला ह्मणजे त्याची हेतुरूपी आशा भोक्त्यास पीडा करिते, यास समंधिक पीडा ह्मणतात." हें ऐकून मशारनिल्हे नाईक वैद्यांस सांगूं लागले "ह्यांची (नमशीकरांची) आपणास जी थोडीबहुत माहिती आहे ती येणेंप्रमाणें—हे दोघे बंधु. ह्यांचा प्रपंच मध्यम स्थितीचा असून सर्व कारभार वडील बंधु करित होते. ते स्वभावानें चांगले असून सर्वत्रांशीं सारख्या प्रेमानें वागत असत. त्यांस एक मुलगा होता, त्या मुलास त्यांनीं कांहीं दागदागिने केले होते, तें ह्यांस (पाडुरंग नाईकांकडे बोट दाखवून) मत्सरबुद्धीनें सहन होईना. पण काय करणार! सर्व कर्तासवरता तो वडील बंधु पडला, त्यामुळें ह्यांस मुकाट्यानें उगी राहणें भाग पडे. कांहीं दिवसांनीं तो अकस्मात् मृत्यु पावला. तेव्हां ह्यांस आपला इच्छित हेतु तडीस नेण्यास आयतें सांपडलें. मुलगा अज्ञानदशेंत असल्यामुळें सर्व कारभार ह्यांच्याकडे आला. त्याबरोबर त्यांनीं त्या मुलाचे दागिने वगैरे सर्व कांहीं आपल्या हस्तगत करून घेतले व त्यास चांगल्या प्रकारें वागवीनातसे झाले. यामुळें फार त्रास पावून तो मुलगा व त्याची आई हीं घरांतून बाहेर पडलीं. एवढी गोष्ट माझ्या ऐकिवांत आहे." ही हकीगत

ऐकून वैद्यराजांनीं सांगितलें कीं, ह्यांत " आणखी काय संशय आहे! ह्यांचाच बंधु अनेक क्लेशजनक त्रास देऊन ह्यांस पीडतो आहे, दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां ह्यांतून पार पडण्याची जर इच्छा आहे तर मत्सरबुद्धि सोडून त्या मुलाशीं ह्यांनीं चांगल्या प्रकारें वर्तन ठेवावें, चीजवस्त असेल ती त्याची त्यास द्यावी. हेंच आपणास औषध आहे."

फक्त नाडीज्ञानानें ह्या वैद्यांनीं एखाद्या उत्तम ज्योतिषाप्रमाणें यथातथ्य सांगितलेली अपूर्व माहिती ऐकून, आश्चर्यभरित व तटस्थ होत्साते पांडुरंगनाईक वैद्यराजांच्या चरणीं लीन होऊन त्यांचे धन्यवाद गाऊं लागले व त्यांचे प्रेमपुरःस्सर आभार मानून घरीं गेले. आणि वैद्यराजांनीं सांगितल्याप्रमाणें चांगल्या रीतीनें त्या मुलाशीं वागूं लागले. तेव्हां एका वर्षानें नाईक पूर्वस्थितीवर येऊन आनंदानें काळक्रमणा करूं लागले.

**उदाहरण ४ थें**—वारदेश प्रांतांत एका गांवीं एका गृहस्थाच्या मुलास साधारण ताप येत होता. ( ह्या गृहस्थाचें नांव आह्मी प्रगट करूं इच्छित नाहीं. ) त्यास प्रथम घरगुतीच औषधोपचार केले, तरी ज्वर न हटतां वाढत्या प्रमाणावर जाऊं लागला. सर्वांचीं औषधें देऊन गुण न दिसला ह्मणजे अखेरीस आमच्या भिषग्वर्यांस रोग्याची चिकित्सा करण्यास नेण्याचा जिकडेतिकडे बराच प्रघात पडलेला दिसून येतो व बहुतकरून तशाच रोग्यांनां ह्यांनीं औषध देऊन व्याधीमुक्त केल्याचीं उदाहरणेंहि हजारों आढळतात. असो. जेव्हां त्या मुलाचा ताप १०५ अंशावर ( ग्राव ) गेला, त्यावेळीं मुलाच्या बापाचें धाबें दणाणलें व तसाच तो वैद्यराजांचे घरीं गेला आणि त्यांस सर्व प्रकार सांगितला व अगत्य येण्याविषयीं विनंति केली. वैद्यांच्या मनांत आलें पुरे, मग तेथें रात्रअपरात्र झाली असली तरी लगेच तयारी व्हावयाची. वैद्यांस घेऊन तो आपल्या घरीं आला. वैद्यराजांनीं मुलाची नाडी पाहिली व सांगितलें कीं, "आईबापांच्या दुष्ट वर्तनाचा परिणाम बहुतकरून त्याज्या पुढील संततीस भोगावा लागतो. पुरुषापासून रक्तद्वारा ह्मणजे संभोगानें गर्भ राहून स्त्रीस व मुलासहि रोग

होतो. हा पिंड रोगी अवस्थेंत उत्पन्न झाला आहे. बापाची प्रकृति रोगी असून त्यापासून झालेल्या पिंडांत रोगट बीजाचा संचार होऊन तोच भाव उठला असावा. असा प्रकार नाडीवरून दिसून येतो. हा ताप उतरेल त्याविषयीं काळजी नको." असें सांगून त्यांनीं एक कषायाची यादी लिहून दिली व १४ दिवस पर्यंत घेतल्यावर आपणास कळविण्याविषयीं सूचना केली. वैद्यराज जाण्याच्या तयारींत होते, इतक्यांत 'वद्य दिसला कीं, जेथूनतेथून रोग्यांचा सुळसुळाट!' ह्या प्रमाणें त्या मुलाची आईहि आपली प्रकृति दाखविण्यास पुढें सरली. वैद्यराजांनीं बराच वेळ तिची नाडी धरून आश्चर्यचकित मुद्रेनें तेथील एकाला विचारलें कीं "ही बाई कोण आहे?" त्यानें सांगितलें कीं "ही त्या ज्वर येत असलेल्या मुलाची आई होय." हें ऐकून वैद्यराज जरा विस्मित झाले. कोणतेंच निदान किंवा चिकित्सा याविषयीं कांहींच न सांगतां ते उगीच राहिले. हें पाहून तिचा भाऊ तेथें होता त्यानें वैद्यराजांस औषधें देण्याविषयीं विनंति केली. "बरें आहे, घरीं जाऊन पाठवून देतों." असें सांगून त्यांनीं त्यांचा निरोप घेतला. त्यांनां पोंहचविण्यास दुसरे एक गृहस्थ गोष्टी करितकरित त्यांच्याबरोबर चालले होते त्यांस वैद्यराजांनी सांगितलें कीं "त्या बायकोस दुसरा तिसरा कोणताहि रोग नसून फक्त तिची कोणा परपुरुषावर इच्छा गेली आहे व तो प्राप्त कसा होतो हा तिला निदिध्यास लागला आहे. इच्छिलेल्या पुरुषाची प्राप्ति न झाल्या कारणानें त्याचे चिंतनेंकरून तिला ज्वर आला आहे, आणि तो कामज्वर होय. 'रसिक, कामानें रसरसलेल्या, शृंगारिक भाषण करणाऱ्या अशा तरुण पुरुषाचें आलिंगन, संभाषण व स्पर्शादि केले असतां कामज्वर शांत होतो,' असें माधवनिदानांत सांगितलें आहे. विरहिणी स्त्रियेस सुंदर पुरुषाचें अधरचुंबन हा काढा व आलिंगन हें पथ्य! याप्रमाणें कामज्वर शांत होण्यास इच्छित पदार्थांच्या लाभाशिवाय दुसरा उपचार नाही." वैद्यराजांचें हें निस्पृह व किंचित् निर्भर्त्सित मुद्रेचें आणि अद्भुत अनुभविक तर्काचें भाषण ऐकून बरोबरचे गृहस्थ अगदीं आश्चर्यचकित झाले

व तटस्थ वृत्तीनें ते वैद्यराजांच्या तोंडाकडे पहात राहिले. वैद्यराज निरोप घेऊन मार्गस्थ झाल्यावर ते गृहस्थ मागें परतले व झालेला सर्व प्रकार त्यांनीं कांहीं नेमक्या मंडळीस सांगितला. हें ऐकून वैद्यराजांचे नाडीज्ञाननैपुण्याची प्रशंसा करावी तेवढी थोडीच असें सर्वजण ह्मणूं लागले. बारीक तपास काढतां तो सर्व प्रकार खरा असल्याचें त्या मंडळीस कळून आलें. असो. पुढें त्या मुलास त्या काढ्यानें आराम वाटून त्यांतून तो बरा झाला. पण वैद्यराजांनीं सांगितलेल्या पिंडाच्याच दोषामुळें पुढें तीनचार वर्षांनीं तो मुलगा हा मृत्युलोक सोडून गेला.

**उदाहरण ५ वें**—सन १८७७ सालांत रा० **पुरुषोत्तम** उर्फ **किरू नाईक** मु० थोरलें गोवें, ह्यांस जें भयंकर दुखणें झालें त्याची हकीकत पुढील प्रमाणें:—

किरू नाईक ह्यांस पौषांतील ( मालिनी ) पौर्णिमेकडे प्रथम ताप येऊन ३ ऱ्या ४ थ्या दिवशीं तो एकदम भडकला व त्यांस भ्रम, दाह, तहान व मस्तकशूल हीं लक्षणें उत्पन्न झालीं. प्रथम गांवच्याच ख्रिस्तियन डाक्टरांस आणून त्यांचें औषध त्यांनीं चालू केलें. पण कांहीं केल्या ज्वर ह्मणून हटेना. दिवसेंदिवस चढती पायरी दिसूं लागली. त्यांच्या ज्वराच्या ७ व्या दिवशीं सहज एका कामाकरितां तेथें रा० **व्यंकटेश प्रभु पानवेलकर** हे त्यांस भेटण्यासाठीं गेले होते. पहातात तों त्यांस नाईकांची कठीण अवस्था दिसून आली. त्या बरोबर ते तिकडून लगेच परतले व थेट रायबंदरीं येऊन वैद्यराजांस सर्व हकीकत कळवून त्यांस घेऊन थोरलें गोवें येथें गेले. वैद्यराजांनीं नाडी पाहून सांगितलें कीं "आतांच तावडतोब यांनां १२ जळवा घाला. हेळसांड करितां कामा नये, फार त्वरा करा." असें सांगून त्यांस एक काढा तयार करून दिला. "हा ताप एवढ्या उपायानें हटेल, नच हटला तर मग दुसऱ्या औषधाची योजना करूं." असें सांगून वैद्यराज आपल्या घरीं आले. वैद्यांनीं सांगितल्याप्रमाणें जळवा लावून रक्त काढिलें व औषध चालू केलें, ज्वर जरा कमी

दिसूं लागला, पण त्यांनां जो मस्तकशूल व भ्रम झाला होता तो कांहींकेल्या कमी होईना. अतिशय वेदना होऊं लागल्या, त्यामुळें ते फार मोठ्यानें बडबडूं लागले. परत दुसऱ्या दिवशीं वैद्यराजांस आणण्यास त्यांच्या घरचा मनुष्य गेला, पण वैद्य घरीं नाहींत. ते कुठें ह्मणून पोहोंचणार? रोजच्यारोज लोकांची कोण गर्दी! कोणास नाहीं ह्मणावें व कोणास होय ह्मणावें, यांची त्यांस मोठी पंचाइत पडे व पडते. एक ह्मणतो "अद्यापिहि वैद्यराज आमच्या घरीं येऊन आमच्या मुलास प्राणदान द्या. घरांतील मंडळीनें व आमच्या मुलानें आपलाच हेतु धरला आहे, सर्व मंडळी चिंताग्रस्त होऊन बसली आहे व आपल्या येण्याची वाट पहात आहे. करितां मज गरिबावर उपकार करून एवढें पुण्य पदरीं बांधा." दुसरा ह्मणतो "आपली प्रियकर एकुलती एक बहीण आतिशय दुखण्यांत आहे, तिला वांचवा." कोणी आपली आई, कोणी आपली सून, कोणी आपला घरांतील सर्व कारभार पाहाणारे, ज्याच्यावर सर्व कुटुंबपोषणाचा भार ते आमचे वडीलच अंथरुणावर पडल्यामुळें सर्वतोपरी आमची त्रेधा उडाली आहे, आह्मांस तुमच्याशिवाय कोणी त्राता नाहीं. तर कृपा करून कांहीं तरी औषध द्या. अशा तऱ्हेनें नाना प्रकारच्या प्रत्येकाच्या विनवण्या चालल्या असतात. यामुळें वैद्यांनां जेवण्याचीसुद्धां एखादे वेळीं फुरसत मिळत नाहीं. दिवस असो, रात्र असो, लोकांची गर्दी असावयाचीच. आज इकडे जा, उद्यां तिकडे जा, या रीतीनें कोणत्याहि प्रकारें आपल्या जिवाचीहि काळजी न करितां लोकसेवा करण्याकडे ज्यांच्या प्रवृत्तीचा ओढा, त्यांस फुरसत व सुख कोठून मिळणार? त्यांनां विश्रांति ह्मटली ह्मणजे रात्रीचे बारा वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत मिळाली तर मिळते. तरीहि आपल्या घरीं येत नाहीं ह्मणून लोक त्यांच्या मस्तकीं दोष लादतातच! असो.

इकडे रा० किरू नाईक यांचा मनुष्य एकसारखा दोनतीन दिवस येतच होता. पण वैद्यांची गांठ पडली नाहीं. चौथ्या दिवशीं रा० व्यंकटेश प्रभु ह्यांनीं वैद्यांस रस्त्यांत गांठून एकदम ह्मटलें कीं

"आपण किरू नाईक यांस औषध दिल्यास आज चार रोज झाले. त्या नंतर त्यांची विचारपूस कांहींच नाहीं. आपण त्यांचा कुटुंबघात करण्याचें योजिलें आहे कीं काय?" त्यावर वैद्यांनीं ह्मटलें "काय करावें, बिलकूल फुरसत नाहीं." एवढें ह्मणून दुसऱ्या कांहीं कामांत गुंतून राहिले. जास्त कांहीं बोलले नाहींत. पण रा० व्यंकटेश प्रभु यांचा त्याबद्दल विपरीत समज होऊन ते तेथून निघाले व क्लावदीन नांवाचा एक ख्रिस्तियन डाक्टर घेऊन थोरले गोव्यास गेले. नाईकांची स्थिति त्यावेळीं फार भयंकर होऊन गेली होती. घरांतील एकंदर मंडळीच्या मुखचर्येवर उदासीनतेचें चिन्ह भासत होतें. बहुतांशीं चांगला परिणाम होणें फार कठीण, असें प्रत्येकाला वाटत होतें. डाक्टरानें येऊन रोग्याची स्थिति पाहिली, तों तो प्रकार असाध्य असें त्याच्या मनांत येऊन चुकलें. पण धीर न सोडतां त्यानें मस्तकास सोळा जळवा घालण्यास सांगून पोटांतहि औषध दिलें. ह्यायोगें रात्रौ जुलाब होतील, जुलाब झाले ह्मणजे हरकत नाहीं, असें सांगून तो डाक्टर निघून गेला. त्यानें सांगितल्याप्रमाणें त्यांस जुलाब झाले व ज्वरहि कमी झाला. दुसऱ्या दिवशीं त्यांस जरा शुद्धि आली. थोडासा गुण दिसल्यामुळें सर्वत्रांस हुशारी वाटली. हळूहळू रोग्यासहि बरें वाटूं लागलें. ज्वर गेल्यासारखा झाला, पण मशारनिल्हे नाईक यांचा विश्वास आमच्या वैद्यराजांवर होता, त्यामुळें त्या डाक्टराकडे औषध आणण्यास जाणाऱ्या मनुष्याबरोबर ऐका लहानशा शिशींत लघवी देऊन ती ते वैद्यराजांकडे पाठवित असत. लघवी पाहून वैद्य सांगत कीं "अद्याप नाईक बरे झाले नाहींत. ह्या रोगाचें स्वरूप केव्हां बदलून जाईल, याचा नेम नाहीं. आपण बरे झालों असें कदाचित् त्यांस वाटत असेल, पण तें वाटणें व तो गुण तात्पुरता होय." ह्याप्रमाणें कांहीं दिवस गेले. वैद्यराज **महाराल** येथें **श्री देवकी कृष्णाच्या** उत्सवास गेले होते ते तेथें कांहीं दिवस राहिले. मशारनिल्हे नाईक यांनीं वैद्यराज रा० **वामन नाईक करंडे** यांचें औषध सुरू केलें. तेथेंहि त्यांनीं

औषध आणण्यास मनुष्य पाठविते वेळीं पहिल्या प्रमाणेंच शिशींतून लघवी पाटवून आमच्या चरित्रनायकांस दाखविण्याचा क्रम ठेवला. त्यांनीं फक्त सांगावें कीं "त्यांची प्रकृति अद्याप चांगली झाली नाहीं. दुखण्याचें स्वरूप एकदम भयंकर होईल." असो.

ह्याप्रमाणें त्यांनां वैद्यराज रा. वामन नाईक यांचें औषध चालू होतेंच. तशा स्थितींत थोडे दिवस गेल्यावर रा. किरू नाईक यांच्या प्रकृतीचें हळूहळू दुसरेंच रूप दिसूं लागलें. त्यांचें अंग फुगल्यासारखें झालें व रक्त गोठून देहावर लाल रंगाच्या थोडथोड्या अंतरानें ग्रंथी दिसूं लागून त्यांनां असह्य वेदना होऊं लागल्या. बसल्या जाग्यावरून त्यांनां उठवेनासें झालें व पुनः थोडथोडा ज्वरहि येऊं लागला. दोन दिवस जातात न जातात तों एकदम त्यांचा ताप अतिशय भणाणला व सर्व अंग धरलें. त्याबरोबर त्यांनीं पणजी येथील आपले मित्र वै. वा. **कुट्टु शेणवी नेवरेकर** यांस असा निरोप पाठविला कीं "आतां आपणास जगण्याची आशा दिसत नाहीं. पणजींतील श्री महालक्ष्मीच्या देवळांत महाशिवरात्रीस होणाऱ्या उत्साहास येऊन जी अल्पस्वल्प देवीची सेवा करण्याची उमेद होती, ती पार निघून गेली असें समजा. ( हे गृहस्थ तेथें पूर्वीं जे खेळ होत असत त्यांतील एक प्रमुख उमेदी नट होते. ) तेव्हां मेहेरबानी करून आपण कोणत्याहि निकडीच्या कामांत गुंतलां असलां, तरी तें मजकरितां एकीकडे ठेवून अगत्यपूर्वक रायबंदरीं जाऊन वैद्यराज **त्रिविक्रम प्रभु लवंदे** यांस दोन सामोपचाराच्या गोष्टी सांगून त्यांच्या मनांत कांहीं किंतु असल्यास काढून टाका व त्यांस जरूर घेऊन या. आतां दुसऱ्या कोणाच्याच औषधाची आपणास अपेक्षा नाहीं. फक्त त्यांजवर श्रद्धा व आशा ठेवून राहिलों आहें. ईश्वरकृपेंकरून त्यांच्या हातास यश येईल, अशी मला माझी मनोदेवता सांगते." हा निरोप ऐकण्याबरोबर नेवरेकर तेथून निघाले व प्रथम रा. **व्यंकटेश प्रभु** यांस भेटून सर्व हकीकत सांगितली व त्यांस घेऊन वैद्यराजांच्या घरीं आले व त्यांस सांगितलें कीं, "रा. किरू नाईक हे फार अत्यवस्थ असून

फक्त आपला हेतु धरून राहिले आहेत. तर अशा आणीवाणीच्या व प्राणांताच्या समयीं आह्मीं अगोदर कांहीं बोललोंसवरलों असलों तरी मनांत कांहीं न धरतां आतांच जाऊन त्यांजवर एकदा नजर घाला." हें ऐकून वैद्यराजांनीं त्यांस सांगितलें कीं, "कांहीं काळजी करूं नका. आपण पहांटेस तिथें पोंहोचतों. आतां आपण चलावें. परमेश्वरकृपेनें आमच्या हातास यश आलें ह्मणजे पुरे." ते दोघेहि गृहस्थ आपआपल्या घरीं गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळचे चार वाजतां वैद्यराजांची स्वारी रा. किरू नाईक यांचे घरीं तयार. त्यांनीं दारावर थापट मारली, तों आंतल्या मंडळीनें विचारलें कीं, बाहेर कोण? कारण वैद्यराज इतक्या पहांटेस येतील, असें कोणासच भान नव्हतें. वैद्यांनीं बाहेरून ह्मटलें कीं, दार उघडा ह्मणजे कोण तो कळेल. त्याप्रमाणें दार उघडून पहातात तों वैद्यराज दत्त ह्मणून उभे. ज्या वेळीं वैद्यराज तिकडे पोहोंचले त्या वेळची रोग्याची स्थिति काय विचारावी! ज्वर भणाणून सर्व अंग तप्त झालें आहे, देहाची विस्मृति पडून बडबड इत्यादि प्रकार चालले आहेत, सर्वांगांत रक्त गोठून ठिकठिकाणीं ग्रंथी दिसत असून त्यायोगें त्यास असह्य वेदना होत आहेत, जाग्यावरून हालचाल करतां येत नसून पोट फुगलें आहे, श्वास व प्रश्वासक्रियेस बराच अवरोध झाल्यामुळें हीच रोग्याची प्राणांतिक अवस्था असें जाणून कित्येकांनीं धीर सोडला आहे, घरांतील बायकामुलें आदिकरून सर्व मंडळी निराशायुक्त उदास अंतःकरणानें त्यांची प्रेतरूपी काया घेऊन ईश्वरापाशीं दीनवदन होत्साती रोग्यास आराम पडावा ह्मणून करुणा भाकित आहे, ह्याची आतां जगण्याची आशा बिलकुल दिसत नाहीं व आतां अंतसमयीं वैद्यराजांचे हातूनतरी काय होणार, व्यर्थ अपेशासमात्र ते पात्र होतील, असें कित्येकजण आपापसांत कुजबुजत आहेत, परलोकीं उत्तम गति मिळण्यासाठीं कांहींतरी मंत्रसंस्कारादि क्रिया केल्यास फार उत्तम, विनाकारण औषधोपचाराचे भरीस पडण्यांत कांहीं हांशील नाहीं, असे कित्येकांचे उद्गार चालले आहेत. याप्रमाणें एकंदरींत सर्वत्रांची

निराशा होऊन बाहेरगांवीं ते परलोकवासी झाल्याचीहि बातमी पसरली. अस्तु. वैद्यराजांनीं अगोदर सर्वांस धीर दिला व सांगितलें कीं, तुह्मी भिऊं नका व रडण्याचा वगैरे अगदीं गोंगाट करूं नका. अशा तुमच्या आक्रोशानें रोगी कदाचित् भिऊन प्राण सोडील. ह्मणून जरा स्वस्थ व्हा. वैद्यराजांनीं त्यांची चांगली तपासणी केली व लगेच औषध दिलें आणि सांगितलें कीं "ह्या औषधानें शौचास होऊन बडबडहि कमी होईल आणि स्मृति चांगली येईल व त्याचप्रमाणें ज्वरहि हळूहळू कमी होत जाईल. ईश्वरीकृपेनें जरा आराम पडला ह्मणजे मग एका दिव्य औषधी तेलानें ह्यांचें सर्वांग भल्या शक्तीवान मनुष्याकडून तीन महिनेपर्यंत मर्दन केलें पाहिजे. त्याची तजवीज मग पहातां येईल. तीन दिवसांनीं आपणास रोग्याचें प्रकृतिमान कळवावें." असें सांगून वैद्यराज घरीं आले. इकडे वैद्यांनीं दिलेलें औषध दिल्यानंतर तीनचार तासांनीं त्यांस बरेंच शौचास झालें व त्यामुळें ते फार गर्भगळित होऊन गेले व त्यांस बरीच भूक लागली. त्याबरोबर पेजपाणी देऊन त्यांस सावध केलें. रात्रौ सर्वांगास दरदरून घाम सुटून तापहि कमी झाला व जरा शुद्धि आली. दुसऱ्या दिवशीं जरा हुशारी वाटून ज्वर नाहींसा झाला. तिसऱ्या दिवशीं झालेला सर्व प्रकार वैद्यराजांस कळविला. त्यांनीं आणखी औषध देऊन दुसऱ्या एका बाटलींत तेल दिलें व ह्याचें अमुक प्रकारें चांगल्या लठ्ठ मनुष्याकरवीं तीन महिनेपर्यंत मर्दन करा, ह्यांत बिलकुल हेळसांड करतां नये, आतां त्यांस कांहीं भीति नांहीं असें सांगितलें. त्याप्रमाणें तीनचार सप्तकें औषध चालू करून तेलाचेंहि मर्दन सुरू झालें. त्यांची प्रकृति हळूहळू सुधरत चालली. चारपांच महिन्यांनीं ते चांगले होऊन वैद्यांचे घरीं जाऊन त्यांस भेटून त्यांचे धन्यवाद गाऊं लागले. मला तुह्मी साक्षात् धन्वंतरी भेटलां, तुमचे उपकार मज गरीबाकडून कसे फिटणार? सर्वत्रांस माझी निराशा झाली होती, पण आपल्या कृपाप्रसादानें आज ही स्थिति प्राप्त झाली आहे इत्यादि. वैद्यांनीं सांगितलें कीं "आमच्या हातीं

काय आहे? ईश्वरानें दयाळू होऊन आपल्या-दीन झालेल्या कुटुंबाचें सौभाग्य राखिलें. आह्मी फक्त यत्न करणारे! त्यांत यश देण्याविषयीं त्या जगदीश्वराचीच अंतःकरणपूर्वक प्रार्थना करून त्याचेच स्तुतिपोवाडे आह्मीं गाइले पाहिजेत. आह्मीं फक्त निमित्तास धनी आहोंत." अशाप्रकारें त्यांचें समाधान केलें व प्रकृतीस वरचेवर फार जपण्याविषयींहि सांगितलें. त्यानंतर तीन वर्षांनी मशारनिल्हे नाईक ह्यांस तसेंच एक मोठें जिवावरचेंच दुखणें झालें होतें, त्यांतूनहि त्यांस प्रतिज्ञापूर्वक सातव्या दिवशीं वैद्यराजांनीं उठविलें. हे नाईक तूर्त हयात आहेत.

**उदाहरण ६ वें**—सुमारें चोवीसपंचवीस वर्षांमागें ह्मणजूण येथें वै. वा. **रामचंद्र पई** यांच्या बायकोस बाळंतक्षयाची व्याधी जडली. प्रथम तिला त्याच गांवचे आंतोन जुजे ह्या नांवाच्या डाक्टराचें औषध सुरू केलें. दोनतीन सप्तकें त्याचेंच औषध चाललें होतें, पण प्रकृतींत कांहींच फरक न होतां दिवसेंदिवस तिचें शरीर अधिकाधिक क्षीण होत चाललें व रोगाचें स्वरूपहि वाढतें दिसूं लागलें. तेव्हां तिच्या बापानें दुसऱ्या वैद्यांचे उपचार करावे ह्मणून तिला ह्मापसें येथें आपल्या घरीं नेली व तेथील कांहीं डाक्टरांचीं औषधें तिला दिलीं. पुष्कळ उपाय केले पण दहांत नऊ दिसेनात. एके दिवशीं मशारनिल्हे आंतोन जुजे हे मजकूर पई यांस भेटले, त्यावेळीं त्यांनीं आपली बायको आतां कशी आहे ह्मणून विचारलें. पुष्कळ औषधोपचार केले, पण कांहीं गुण दिसत नाहीं व दिवसेंदिवस व्याधी चढत्या प्रमाणावर आहे, आतां वैद्यराज लवंदे यांस आणण्याची तजवीज केली आहे; असा त्यांनीं जवाब दिला. त्यावर डाक्टर साहेबांनीं सांगितलें कीं, दुसऱ्या आणखी कोणत्याहि वैद्याचे खटपटीस न लागतां त्यांसच आणण्याबद्दल मीहि शिफारस करितों. ह्याप्रमाणें सांगून ते चालते झाले. दोन दिवसांनीं तिचा बंधु वैद्यराजांस आणण्याकरितां रायबंदरीं गेला व त्यांस सर्व हकीकत कळविली व वैद्यराजांस घेऊन तो ह्मापसें

येथें आला. लगेच खोलींत जाऊन त्यांनीं तिची नाडी धरली व सर्व अंग तपासून पाहिलें व सांगितलें कीं, हा बाळंतक्षय असून फार कष्टसाध्य आहे. तरी तुह्मी भिऊं नका; होईल तेवढा प्रयत्न करूं. असें सांगून एक कषायाची यादी लिहून आपल्या सोबत आणलेल्या १४ पुड्या देऊन घेण्याचा प्रकार वगैरे सांगितला. चौदा दिवस झाल्यानंतर प्रकृतिमान काय तें कळवा, एवढें सांगून वैद्य घरीं गेले. दोन सप्तकें औषध चाललें, तरी कांहींच गुण नाहीं, ह्मणून पुनः वैद्यांस जाऊन त्यानें कळविलें. वैद्यांनीं तोच काढा आणखी १४ दिवस चालू करावा असें सांगितलें. त्याप्रमाणें १४ दिवस तोच काढा सुरू केला. तेणेंकरून हातपाय गळणें, वांति, कफ, खोकला हे विकार कमी झाले खरे, पण शरीर फार अशक्त होऊन त्यावर सूज दिसूं लागली. त्यामुळें सर्वांस फार भय वाटलें. पुनः वैद्यांस त्यांनीं सर्व प्रकार जाऊन कळविला. वैद्यांनींहि तोच काढा व आणखी २१ पुड्या देऊन सांगितलें कीं, आणखी २१ दिवस तिला हाच काढा चालू केला पाहिजे. मग दुसऱ्या औषधाचा विचार करूं. सूज आली ह्मणून भिण्याचें कारण नाहीं. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें पुनः तोच काढा तीन सप्तकें चालू केला. कांहीं विकार कमी दिसूं लागले. पण तिच्या सर्वांगास सूज वळकावून लोखंडासारखें घट्ट झालें. दुखणें अनावर भासूं लागलें. ह्या रोगांतून तिचा बचाव होणें कठीण, असें सर्वत्रांस वाटून चुकलें. ग्रहपीडा निवारणार्थ कांहीं दानेंहि करण्यांत आलीं. शेवटीं वायूनेंहि तिच्या अंगांत संचार करून आपल्या दिव्य स्वरूपाचा गुण दाखवून तिला उन्मत्तता आणली. केव्हांकेव्हां तिला घेरी येऊन तिनें धाडकन् जमिनीवर पडावें, ह्याप्रमाणें तिची स्थिति झाली. तिला होत असलेले विकार पाहून सर्वांचे मनांत खास येऊन चुकलें कीं, हिची इहलोकची यात्रा खचित आटपते. पण पुनः एकदा वैद्यांस आणून तिची अखेरची स्थिति दाखवावी ह्मणून तिचे सावत्र मुलगे वै. वा. **गोपाळ पई** रायबंदरीं गेले व वैद्यांस सर्व प्रकार कळवून अगत्य आलें पाहिजे अशी

त्यांनीं प्रार्थना केली. वैद्यांनीं त्यांच्या तोंडाकडे पाहून सांगितलें कीं, तिच्याकरितां आपण आलां हें योग्य केलें; पण आपल्या आरोग्याची अगोदर कांहीं तजवीज करा. आपल्या चेहऱ्यावरून दिसून येतें कीं, आपली दृष्टि शाबूद नाहीं व पोटांत आपणांस अमुक विकार उत्पन्न झाला आहे, तर त्याची हेळसांड करूं नये. हें ऐकून मशारनिल्हे पई ह्यांस फार आश्चर्य वाटलें व ते तेथल्यातेथेंच तटस्थ झाले. आपणास होत असलेला विकार ह्यांनीं आपली नाडी न पहातां फक्त मुखचर्येवरून सांगितला, तेव्हां ह्यांच्या अंगांत कांहीं तरी अलौकिक शक्ति असली पाहिजे, असें त्यांस वाटलें. असो. वैद्यांनीं त्यांच्या विनंतीकडे लक्ष्य देऊन मार्गक्रमण केलें. तों इकडे काय दुःखदस्थिति पहावी ! हे दोघेहि तिकडे पोहोंचण्याचे पूर्वी अर्धा तास तिला घेरी येऊन ती जमिनीवर धाडकन् पडली तों जीव नाहीं वाचा. त्याबरोबर एकच कल्होळ होऊन गेला. कोणी कोणाचें शांतवन करित आहेत, कोणी त्या प्रेतवत् होऊन पडलेल्या बाईच्या कपाळास सुंभ बांधून नाकाकडे कांदा धरित आहेत, कोणी आप्तइष्ट तिला हांका मारित आहेत, पण ती हूं कीं चूं करित नाहीं. असें पाहून सर्वत्रांनीं हातपाय गाळले. कोणीतर तिची पुढची तयारी करण्याचा बेत करूं लागले. इतक्यांत वैद्यराज तिकडे पोहोंचले तों हा आकांत चाललेला होता. त्यावेळीं सकाळचे ७ वाजले होते. वायूचे गुण कोणकोणत्या प्रकारचे असतात, हें वैद्यांस ठाऊक होतेंच. ते न डगमगतां पुढें सरून पहिल्यानें त्यांनीं तिची नाडी पाहिली व लगेच त्यांस सांगितलें कीं "आतांच ताबडतोब दोन भले सशक्त मनुष्य आणा. तुह्मीं उगीच रडण्याचें कारण नाहीं. तिला कांहीं होत नाहीं. फक्त वायुविकारानें तिची अशी स्थिति झाली आहे. वैद्यांच्या सांगण्याप्रमाणें एक असामी जाऊन दोन चांगले भले 'लठ्ठ मनुष्य घेऊन आला. वैद्यांनीं तेथें चांगला बिस्तर करविला व आपण आणलेलें दिव्यतेल त्यांकडे देऊन सांगितलें कीं, हें तेल हातास लावून जरा बिस्तवावर शेकून हिच्या सर्वांगास मर्दन करण्यास

तुमची असेल तितकी शक्ति खर्च करा. त्याप्रमाणें तिचें अंगमर्दन करण्याचा त्यांनीं सपाटा चालविला. वैद्यराज तेथून हालले नाहींत. चारपांच तासांनीं ती जरा शुद्धीवर येऊन तिनें डोळे उघडले व सावध झाली. भुकेनें अतिशय जर्जर झालेली पाहून तिला ताबडतोब पेज दिली व नंतर ती उठून बसली. घरांतील मंडळीस जरा स्वस्थता वाटली. ह्याच तेलानें तिला १ महिना रगडणें केलें पाहिजे व हाच काढा आणखी दोन महिने घेतला पाहिजे, तरच हिचें बाळंतक्षयाचें बीज नाहींसें होईल. अन्य कांहीं औषधाची जरूर नाहीं, ह्याच तैलमर्दनानें हिची सर्व सूज जाईल. एवढें सांगून वैद्यराज घरीं गेले. नंतर तैलमर्दनानें तिची सर्व सूज जाऊन अंग सडीक झालें. हळूहळू बारीकचेहि विकार वैद्यराजांनीं सांगितल्या-प्रमाणें कमी होत जाऊन तीन महिन्यांनीं ती अगदीं चांगली झाली.

**उदाहरण ७ वें**—गेल्या ३-४ वर्षांमागें रा. रा. **जनार्दन रामचंद्र जोशी** मु. चोपडें यांस जो चमत्कारिक रोग उत्पन्न झाला होता तो असा—हे एके दिवशीं कांहीं कामाकरितां कळंगूट येथें जात होते. भरतीची वेळ असल्यामुळें त्यांस नदींत पाणी जास्त होऊन ते जरा भिजले. नदींतून वर निघाल्यावर त्यांनीं आपले पाय पुसले पण तशीच त्यांच्या अंगांत हुडहुडी भरली. पुढें कळंगुटीस जाऊन कांहीं अडचणीपरत्वें त्यांस रात्रौ तेथें रहाणें भाग पडलें. दुसऱ्या दिवशीं घरीं येऊन जिवास कांहीं आलस्य वाटल्या-वरून ते निजले. त्या दिवशीं सारी रात्र त्यांस नीज आली नाहीं. डोळ्यांतून ज्वाळा निघूं लागून अंगाचा दाह होऊं लागला व मस्तकशूळहि उत्पन्न झाला. दुसऱ्या दिवशीं शौचास बंद झालें. तशा स्थितींत एकदोन दिवस गेल्यावर त्यांनीं ख्रिस्तियन डाक्टरास आपली प्रकृति दाखवून त्याचें औषध घेतलें. पण दिवसेंदिवस अंगाचा अतिशय दाह होऊं लागला व शौचासहि मोठें कुंथूनकुंथून होऊं लागलें. आतां ह्या रोगाची हेळसांड करून उपयोगीं नाहीं व ख्रिस्तियन डाक्टरांकडून हें काम भागण्यासारखें नाहीं, असा निश्चय

करून त्यांनीं आपल्या बंधूंस रायबंदरीं वैद्यराजांचे घरीं पाठविलें. त्यांस होत असलेला विकार सांगून एकदा स्वतः येऊन प्रकृति बघावी ह्मणून वैद्यराजांस त्यांच्या बंधूंनीं विनंति केली. पण त्यांस दुसरे ठिकाणीं जावयाचें होतें ह्मणून त्या दिवशीं येण्यास त्यांस बनलें नाहीं. त्यांनीं बंधूच्या सांगण्यावरून अमूक असा रोग सिद्ध करून त्याप्रमाणें जिरें व दुसऱ्या आणखी काष्टौषधि यांचा आठदहा अंगांचा काढा लिहून दिला व दुसरें एक औषध देऊन तें काढ्यासोबत द्यावें असें सांगून त्यांस जाण्यास निरोप दिला. मशारनिल्हे जोशी यांनीं १४ दिवसपर्यंत तो काढा घेतला, तरी गुण कांहीं दिसेना व अंगाचा दाह यत्किंचितहि कमी होईना. निद्रादेवीनेंतर त्यांजवर मोठीच अवकृपा केली होती. त्यांनीं पुनः वैद्यांचे घरीं आपल्या बंधूंस पाठवून औषधापासून कांहीं गुण नसल्याचें त्यांस कळविलें. वैद्यांनीं "आणखी दोन सप्तकें तोच काढा सुरू करावा, त्यांतच गुण पडेल, जरा दाह शांत झाल्यावर मग दुसरा औषधी प्रयोग करूं तूर्त दुसरें औषध देऊन उपयोगीं नाहीं, कारण दुसरीं दिव्य औषधें सहन करण्यासारखी त्यांच्या अंगांत शक्ति नाहीं, ती शक्ति प्रथम उत्पन्न करण्याचा यत्न केला पाहिजे; तेव्हां आतां तुह्मीं जाऊन तोच काढा दोन तीन सप्तकें चालू ठेवावा; ह्याचा गुण तुह्मांस लवकर मिळणार नाहीं, तरी धीर सोडूं नका." असें सांगितलें. वैद्यांचें सांगणें प्रमाण मानून त्यांनीं त्यांस काढा चालू केला कितीतरी प्रबळ रोग! कीं ज्याच्यावर पुष्कळ औषधी प्रयोग केले असतांहि तो तिळभर मागें हटला नाहीं. उलट दिवसेंदिवस अंगाचा इतका दाह होऊं लागला कीं, त्यांच्यानें अंगावर वस्त्र धरवेना. शेवटीं ते जिवास फार त्रासले व ताळगांवीं आपल्या श्वशुरगृहीं गेले. हेतू एवढाच कीं, तेथें वैद्यांस येण्यास सुलभ पडावें. पण हा त्यांचा हेतू तडीस न जातां उलट प्रकार घडून आला. वैद्यराज त्यांच्या घरीं जाईनात. त्याचें कारण काय असेल तें असो. मग त्यांनीं तेथें राहून रा. रा. **रामचंद्र पांडुरंग वैद्य** यांस मोठी भीड घालून त्यांचें

मौक्तिक रसायन सुरू केलें. पण त्यामुळें त्यांस भ्रांति होऊं लागून पोटांत कांहीं धरेनासें झालें व अधिकच दाह होऊं लागला. थोड्या दिवसांनीं तें औषध बंद केलें. सासऱ्याच्या घरीं एकटेच माडीवर एक लंगोटी नेसून त्यांनीं बसावें. रात्रंदिवस तळमळत पडावें. "आपणास हा त्रास सहन होत नाहीं, काय करूं, हाय! हाय! पूर्वजन्मीं आपण असें कोणतें पातक केलें होतें कीं त्याचें फळ आतां आपणास अशा रीतीनें भोगावें लागत आहे! आपण एक त्रास भोगतोंच, पण आपल्यामुळें दुसऱ्यासहि फार त्रास होत आहे. ज्या ह्या रोगाचें नांवरूपहि समजत नाहीं, ज्याच्यावर कोणत्याच औषधाचा अंमल चालत नाहीं, असा हा रोग आपणास बहुतकरून ह्या प्रपंचास शेवटचा रामराम ठोकावयास लावणार" असें त्यांस वाटूं लागलें. त्यांची अस्थिपंजरवत् झालेली देहाची स्थिति, दोन महिने निद्रानाशामुळें होत असलेली त्यांची तळमळ, व रात्रंदिवस हायहाय करित अंथरुणावर पडून परमेश्वरापाशीं भाकित असलेली करुणा, इत्यादि पाहून त्यांची सर्वत्रांस कींव येई. त्यांच्या पत्नीनें त्यांची सेवाचाकरी करण्यांत कांहीं कमी केलें नाहीं. त्यांनीं ज्या ज्या पदार्थांची इच्छा करावी ते ते तिनें आणून त्यांस द्यावे. तिलाहि वरचेवर त्यांची शुश्रुषा करण्यांत रात्रीच्या रात्रीं जागरणें व्हावीं. पण फळ कांहीं नाहीं. ही स्थिति पाहून ती बायको त्यांच्या शेजारीं बसून अश्रु ढाळी व ईश्वरापाशीं त्यांनां एकदाचा आराम पडावा ह्मणून पुनःपुनः दीन वदन होत्साती ती प्रार्थना करी. त्यांची अशी अवस्था पाहून बहुतेकांस वाटून चुकलें कीं, हे त्या रोगांतून खास मुक्त होत नाहींत. कारण हा रोग कोणत्या प्रकारचा आहे त्याची कोणत्याच वैद्यास परीक्षा झालेली नाहीं, किंवा झाली असल्यास तो असाध्य ठरला असेल. फक्त औषधें द्यावीं ह्मणून देतात, झालें. शेवटीं डा० **पुरुषोत्तमराव शिरगांवकर** यांनीं त्यांची प्रकृति पाहून औषध दिलें व दाह शमनार्थ थंड पाण्याची आंघोळ करण्यास सांगितलें. पण अशा अशक्त स्थितींत थंड

पाण्याची आंघोळ करण्यास ते भिऊं लागले. तरी धीर धरून थोडे दिवस आंघोळ सुरू करून त्यांनीं त्यांचें औषधहि चालू केलें. परंतु कांहींकेल्या त्यांचा दाह शांत होईना. आतां काय करणार? सर्व उपाय होऊन चुकले. दिवसेंदिवस शक्तितर क्षीण होत जाऊन अंगांत उठून उभें राहण्याचें त्राण राहिलें नाहीं. सर्वांगाचा अतिशय दाह होऊं लागून हायहाय करित ते मोठ्यानें आरोळ्या मारूं लागले. आप्तइष्ट मंडळी त्यांची अखेरची भेट घ्यावी ह्मणून येऊंजाऊं लागली. पण त्यांच्या प्रिय पत्नीचा सौभाग्याचा खांब जर मजवूत आहे, तर तेथें मोठमोठे भयंकर रोग असले तरी त्यांचा अम्मल कितीसा चालणार? मग तेथून ते पोंबुर्पें येथें आपल्या बंधूच्या श्वशुरगृहीं गेले व तेथें त्यांनीं आमच्या वैद्यराजांचा पूर्वीचाच काढा चालू केला व थोड्या दिवसांनीं रायबंदरीं जाऊन वैद्यांस भेटून आपली प्रकृति दाखविली. वैद्यांनीं नाडी पाहून त्यांस सांगितलें कीं, आपल्या धातूचें सर्व पाणी होऊन गेलें आहे व त्यामुळें हे सर्व विकार उपस्थित झाले आहेत. धातु ही देहांतील सर्व शक्तीचा मुख्य राजा आहे. ती ठिकाणावर नसली ह्मणजे भलभलते रोग उपस्थित होतात. आतां पाणी रूपानें असलेल्या धातूस जाडपणा आणून त्याचें रूप बदललें पाहिजे. तुह्मी आपल्या घरीं जाऊन आणखी एक सप्तक तोच काढा चालू करा. मग दुसरें औषध देतों असें सांगून मजकूर जोशी यांस निरोप दिला. त्याप्रमाणें घरीं येऊन त्यांनीं तोच काढा चालू ठेवला. त्यानंतर सातआठ दिवसांनीं वैद्यराज एका ख्रिस्तियन रोग्यास पहावयास शिवोलीस गेले होते तेथें मशारनिल्हे जोशी यांनीं आपली प्रकृति दाखविली. वैद्यांनीं नाडी पाहून सांगितलें कीं, आतां आपणास औषधाची जरूर नाहीं. तुमच्या प्रकृतींत बराच फरक झाला आहे. तुह्मीं फक्त एवढेंच करा कीं, रात्रौ अमुक प्रमाण मेथ्या भिजत घालून त्या सकाळीं दुधांत वाटून घ्या. ह्यानें आपला दाह शांत होऊन आपणास चांगली झोंप लागेल व अंगांत शक्तिहि येईल. ह्याप्रमाणें रा० जोशी यांनीं मेथ्या भिजत घालून दुधांत

घेण्याचा क्रम ठेवला. तों काय चमत्कार सांगावा! त्यांनीं सुखावह झोंप लागूं लागली व अंगाचा दाहहि शांत झाला. दिवसेंदिवस त्यांनां बरें वाटूं लागलें. थोड्या दिवसांनीं त्यांची अंगकांति बदलून त्यांच्या तोंडावर तेज झळकूं लागलें. ज्यांनीं त्यांची पूर्वीची अवस्था पाहिली होती, त्यांस हे अशा स्थितीप्रत पोहोंचलेले पाहून परम आश्चर्य वाटलें. शेवटीं त्यांचे सर्व विकार नाहींसे होऊन ते चांगले बरे झाले. सांप्रतहि रोज मेथ्या घेण्याचें त्यांनीं चालू ठेवलें आहे.

**उदाहरण ८ वें**—आमच्या काकी ती. **रुक्मिणीबाई** ह्या सन १८६८ सालीं गरोदर असतां घडलेला प्रकार—गर्भारपणाच्या ७ व्या महिन्यांत त्यांनां एकाएकीं आलस्य होऊन ताप आला. तोच भडकून सर्वांगाचा दाह होऊं लागला, कफ उत्पन्न झाला, लघवी व शौचास कोंडून पोट फुगलें, तें इतकें कीं, गळा आणि पोट एकच दिसूं लागलें. ह्या कुशीवरून त्या कुशीवर हालतां येईना. प्राण कासावीस होऊं लागून काय होतें तें त्यांचें त्यांनांच समजेना. त्याबरोबर गांवच्याच ख्रिस्तियन डाक्टरांस आणून त्यांची तपासणी करविली. डाक्टरांस अमुक प्रकार झाला आहे असें खात्रीपूर्वक सिद्ध करतां येईना. पोटांत कदाचित् मूल आडवें आलें असेल, किंवा एखादेवेळीं मेलेंहि असेल असा त्यांच्या मनांत संशय आला. गर्भारस्थितींत कडक औषधांचाहि प्रयोग करणें कठीण, असें त्यांनां वाटूं लागलें. मूत्राशय व शौचमार्ग मोकळा व्हावा ह्मणून त्यांनीं जलाल जुलाब दिले. पण कांहींच होईना. प्राण वरचेवर कासावीस होऊं लागले. हा असला भयंकर प्रकार पाहून घरचा मनुष्य धावाधाव करून रायबंदरीं गेला व त्यानें वैद्यराजांच्या पायांवर साष्टांग लोटांगण घालून व झालेला सर्व प्रकार त्यांनां कळवून एक क्षणाचाहि अवकाश न लावतां निघालें पाहिजे, प्रसंग फार कठीण आहे असें सांगितलें. त्याबरोबर तेहि तशीच निघण्याची तयारी करून मार्गस्थ झाले. दोनतीन तासांनीं ते हणजुणास येऊन पोहोंचले. त्यावेळीं गरोदरबाईची स्थिति काय विचारावी! एकसारखे दोनतीन

दिवस त्यांनां अन्न नसल्यामुळें वरचेवर घेरी येऊं लागली, लघवी व शौचास बंद होऊन पोट फुगलें, प्राण कासावीस होऊन पोटांत असह्य वेदना होऊं लागल्या व त्या मोठ्यानें आरोळ्या मारूं लागल्या. तें ऐकून, आतां घटकेनें त्यांचा प्राण जातो कीं काय असें वाटूं लागलें. गांवच्याच दोघां ख्रिस्तियन डाक्टरांस आणून सल्ला करण्याचा विचार ठरून त्यांस बोलावण्यास घरचा मनुष्य जाऊन त्यांस घेऊन आला. डाक्टर येऊन बसले आहेत, इतक्यांत आमचे वैद्यहि येऊन पोहोंचले. वैद्यांनीं नाडी व अंगाचा भाग तपासून पाहिला व डाक्टरांस विचारलें कीं, आपणास हा प्रकार कसा काय वाटतो? त्यांनीं सांगितलें कीं, मूल आडवें आल्यामुळें बाळंतिणीची सुटका होत नाहीं, तेव्हां शस्त्रक्रियेचा प्रयोग करून मूल कापून काढलें पाहिजे; नाहींतर हिचा बचाव होणें कठीण. वैद्यराजांनीं सांगितलें कीं "हिच्या गर्भाशयांत दोन मुलें मृत झालीं असावींत, असा आपला तर्क वाहतो. तेव्हां शस्त्रक्रियेचा प्रयोग न करतां अन्य औषधोपचारानें कांहीं उपाय होत असल्यास पाहूं. नाहीं तर मग नाइलाजास्तव मूल मारून बाळंतिणीची सुटका केलीच पाहिजे. आपण थोडा दम खावा. पण ह्याबद्दल मनांत कांहीं वाईट मात्र धरूं नये. कारण जिवावरचा प्रसंग आहे. व अशा संकट समयीं मालकाचा जीव फार धोक्यांत पडतो." असें त्या डाक्टरांस सांगून आपण आणलेलें औषध पोटांत दिलें व पोटावर दुसऱ्या एका औषधाचें मर्दन सुरू केलें. घरांतील सर्व मंडळीला त्यांनीं धीर दिला. हिची सुटका होईल ह्या विषयीं संशय नको, असें वरचेवर ते सांगूं लागले. डाक्टर त्या प्रसंगीं तेथें होतेच. औषध देऊन तीन तास झाल्यावर असें झालें कीं, जसा एखाद्या तळ्याचा बांध कोसळून मोठ्या जोरानें पाण्याचा प्रवाह वाहूं लागतो, त्याप्रमाणें त्यांच्या पोटांत एकदम कालवून येऊन अतिशय नेटानें मूत्र वेगाचा सपाटा चालू झाला, तो कांहीं केल्या आवरेना. वरचेवर त्यांनां भोंवळ येऊं लागली, त्यावेळीं त्यांच्या नाकाकडे कांदा वगैरे धरून त्यांस सावध करून अन्नपाणी देण्याचा क्रम चालू केला.

एकसारखा झपाट्यानें मूत्रप्रवाह चालला आहे तोंच त्यांची सुटका होऊन दोन मुलें जन्मास आलीं. मुलांचें रडणें व हालचाल वगैरे कांहीं नव्हतें, वरून तीं गर्भांतच मृत झालीं असावींत असें सुईणीनें सांगितलें. बाळंतिणीस सावध केलें. याप्रमाणें एकदा त्यांची सुटका झालेली पाहून सर्वांस स्वस्थता वाटली. वैद्यांची ही आश्चर्यकारक चिकित्सा अवलोकन करून व त्यांनीं नाडीज्ञानानें केलेलें सर्व विधान हुबेहुब प्रत्ययास आलेलें पाहून सर्वजण जागच्याजागींच विस्मित होऊन गेले. कांहीं वेळानें बाळंतिणीस शौचास होऊन जरा आराम वाटला. वैद्यराज निरोप घेऊन घरीं गेले व जातेवेळीं त्यांनीं एक काढा लिहून दिला व तो ४ सप्तकेंपर्यंत चालू करावा असें सांगितलें. त्याप्रमाणें त्यांचा काढा चालू केल्यावरून त्यांस हुशारी वाटूं लागली व एका महिन्यानें त्या पूर्वस्थितीवर येऊन चांगल्या झाल्या. असो. जें काम शस्त्रक्रिया केल्याशिवाय निभावण्यासारखें नाहीं, असा त्या डाक्टरांचा समज झाला होता, तेंच काम त्यांनीं फक्त औषधानें सुधारून घेतलें, त्या डाक्टरांसहि हा सर्व प्रकार प्रत्यक्ष दिसून आल्यावर ते वैद्यराजांच्या अप्रतिम ज्ञानाचे पोवाडे गाऊं लागले.

**उदाहरण ९ वें**—बार्देश प्रांतांत वोलावली ह्मणून एक गांव आहे. तेथें सन १८९५ सालीं एका ५५ वर्षें उमरीच्या **आलेश बॉर्ज** नांवाच्या मनुष्यास साधारण ताप येत होता. दोन्ही कुशी तप्त व्हाव्या, डोळ्यांची आग व्हावी व जेवते वेळीं अन्न पोटांत गेलें पुरे, लगेच अतिशय जळजळ उठावी, असें त्याला घडत असे. आपला ताप नाहींसा होऊन पोटांत होत असलेला विकार जरा तरी शांत व्हावा ह्मणून त्यानें बहुतेक डाक्टरांचे औषधोपचार केले, पण त्यास कांहींच गुण दिसेना. अमुक एक वैद्य किंवा डाक्टर चांगला, त्याच्या औषधानें आपणास खचित गुण पडेल, ह्याप्रमाणें कोणी सांगितलें ह्मणजे तो त्यास आणवून आपली प्रकृति दाखवी व त्याचें औषध चालू करी. पण गुणाचें नांव नाहीं. डाक्टर लोकांची फी व औषधें ह्या प्रीत्यर्थ त्यानें पांचसहाशें रुपयांची राखरांगोळी केली.

'शिर सलामत तर पगड्या पंचवीस' असें तो ह्मणत असे. त्यानें दोनतीन महिनेपर्यंत औषध घेतलें. होतेनव्हते तेवढे सर्व उपाय करून बिचारा थकला व शेवटीं जिवास फार कंटाळला. अखेरीस पोंवुपें येथील एका हिंदु गृहस्थानें त्यास आमच्या भिषग्वर्यांचें औषध घेण्याविषयीं शिफारस केली. त्यावरून त्याचा घरचाच मनुष्य वैद्यराजांस आणण्याकरितां रायबंदर येथें गेला. ते वैद्य येणार, तेव्हां आणखी डाक्टर लोकांस आणून सल्ला करावी, असें रोग्याच्या मनांत आलें व त्यानें आपला हेतू इतर मंडळीस कळविला व लगेच दुसऱ्या दिवशीं सल्ला करावयाचा सिद्धांत ठरून तीनचार डाक्टरांस पत्रें रवाना झालीं. दुसऱ्या दिवशीं नेमलेल्या वेळीं पांच डाक्टर तेथें येऊन दाखल झाले. हे पांचही डाक्टर पदवीधर असून ते वैद्यराजांची वाट पहात बसले. त्यांनां येण्यास जरा वेळ लागला, तोंपर्यंत त्यांनीं रोग्याची तपासणी केली. ज्वराचें स्वरूप कांहीं मोठेंसें नाहीं, अमुक औषध दिल्यास ह्याचा ताप हटकून जाईल, असें सर्वानुमतें ठरून रेसेत (औषधाची यादी) करण्याच्या विचारांत आहेत, इतक्यांत वैद्यराज आल्याचें समजलें. ते येऊन त्यांनीं रोग्याची नाडी धरून पाहिली व तशीच दोन मिनिटांनीं सोडूनहि दिली व डाक्टरांस विचारलें कीं, तुह्मी या रोगाचें निदान काय ठरविलें आहे? त्यांनीं जीर्णज्वराचें निदान ठरविल्याबद्दल सांगितलें. वैद्यराजांनीं सांगितलें कीं, तुह्मांस या रोगाची बरोबर कल्पना झालेली नाहीं, असें मला वाटतें. नंतर त्यांच्या घरच्या मनुष्यास सांगितलें कीं, तूर्त ह्यांस देण्यास आपणाजवळ औषध नाहीं. घरीं जाऊन पहातां येईल. असें त्यांचें उडवाउडवीचें बोलणें ऐकून त्यांची उमेद खचल्यासारखी झाली. जास्त कांहीं न सांगतां वैद्यांनीं जाण्याची तयारी केली. हें पाहून घरचा एक इसम त्यांस पुढें पोहोंचवावयास गेला व त्यांस खोदून खोदून विचारूं लागला व ह्मणाला कीं, खरा प्रकार असेल तो स्पष्ट सांगा. बिलकुल अंदेशा बाळगूं नका. अशी त्याची विनंति ऐकून वैद्यराजांनीं सांगितलें कीं, प्राणांत होई-

पर्यंत रोग्यास त्याचें मरण सांगूं नये, असें आमच्या वैद्यशास्त्रांत सांगितलें आहे. तुह्मांस फार वाईट वाटेल ह्मणून खरा प्रकार दाबून ठेवून धरसोडीचा प्रकार मीं सांगितला. आतां ज्या अर्थी आपला फारच आग्रह पडला आहे, त्या अर्थी सांगणें भाग आहे. तुमच्या ख्रिस्तिधर्माप्रमाणें आतांच पाद्रीस बोलावून आणून संतेसांव (स्वर्गगति मिळण्याविषयींचा एक ख्रिस्तियन धर्मांतील विधि ) लावावें. कारण तो रोगी फक्त चार तासांचा तुमचा सोबती आहे. आणखी औषधें वगैरे देण्याच्या भरीस पडून व्यर्थ पैसा उधळूं नका. कांहीं तुमच्या धर्माप्रमाणें उत्तम गति प्राप्त्यर्थ जे तुमचे संस्कार असतील ते करा. बिलकुल वेळ लावूं नका. त्याचा चार वाजतां खचित अंत होईल." एवढें सांगून वैद्यराज निघाले. त्यांस पोहोंचविण्यास गेलेला इसम घरीं परत आला व त्यानें तो सर्व प्रकार त्या डाक्टरांस कळविला. सहजच घरच्या मंडळीस तो सर्व मजकूर कळून आला व त्याबरोबर त्यांची गाळण उडाली. त्यांस कांहींच सुचेनासें होऊन ते चिंतातुर झाले. डाक्टरांनीं त्यांस सांगितलें कीं " हा सर्व प्रकार झुट आहे. त्या वैद्यांस ह्या रोगाची परीक्षाच कळली नाहीं. कांहींतरी बहकून ते गेले. हातच्या कांकणास आरसा कशास पाहिजे ! आतांच कळून येईल. कारण रोगी रोजच्यासारखा चांगला बोलतो-चालतो, स्मृतींत कांहींच पालट झालेला दिसत नाहीं, त्यावरून इतक्या लौकर ह्याचें देहावसान होईल असें मानणें ह्यासारखा आणखी मूर्खपणा नाहीं." एवढें जरी त्यांनीं ह्मटलें, तरी वैद्यराजांनीं सांगितलेला प्रकार कितपत खरा होतो ह्याकडे त्यांचें लक्ष्य लागलें होतें. दोघे डाक्टर तिकडे राहिले व बाकीचे निघून गेले. तों काय अद्भुत प्रकार सांगावा! दुपारचे २ वाजतां त्या रोग्याच्या प्रकृतींत एकदम फेरबदल होऊन स्थिति बिघडली. चेहऱ्यावर निराळ्याच तऱ्हेचीं चिन्हें दिसूं लागलीं, जीभ अडखळूं लागली. त्याबरोबर एकच आकांत कोसळला ! पाद्रीस आणण्यास धावले. इकडे रोग्याचे पंचप्राण कासावीस झाल्यामुळें तो डोळे वटारूं लागला. पाद्री संतेसांव

घेऊन येईपर्यंत अवकाश न राहून त्यानें आपली इहलोकची यात्रा आटोपली. झालें. घरांत बायकांमुलांची रडारड सुरू होऊन एकच कल्होळ झाला. काय करणार? मृत्यूपुढें कोणाचाच इलाज नाहीं. दोघेहि डाक्टर फार हळहळले व नंतर तेथून निघून आपल्या घरीं गेले.

**उदाहरण १० वें**—सांवडें स्टेशनापासून जवळच एका अर्ध्या कोसाच्या अंतरावर काकोडें ह्मणून एक गांव आहे. तेथील कोणीएक मराठा गांवकर ह्याच्या मुलास एक प्रकारचें दुखणें होऊन तो फार क्षीण झाला होता. जो पदार्थ खावा, किंवा जें अन्न पोटांत जावें, तें त्याच्या मंद जठराग्नीमुळें पचन न होतां कधींकधीं वांती होऊन बाहेर पडावें. ह्याबद्दल त्याच्या बापानें पुष्कळ औषधोपचार केले, पण कांहीं फळ दिसून आलें नाहीं. अशा स्थितींत कांहीं महिनें गेल्यावर त्या मुलाची स्थिति एकाएकीं पिशाच्चवत् होऊन तो भलभलतें बडबडूं लागला. ज्यालात्याला शिव्या द्याव्या, मारहाण करावी, गाडगींमडकीं फोडावीं, इकडेतिकडे फिरावें, ह्याप्रमाणें त्याची स्थिति झाली. त्याच्या बापानें देवळांत जाऊन प्रसाद वगैरे घेऊन पाहिलें, पण कांहीं नाहीं. मग पुढें मंत्रसिद्ध ताईत बांधले, रमल जाणणाऱ्या कांहीं मुसलमान लोकांनां आणून भूतपिशाच्चबाधेसंबंधानें अनेक तऱ्हेचे उपाय केले, अनेक वैद्यांनां आणून त्याची चिकित्सा करण्यांत आपणाकडून होईल तेवढे प्रयत्न केले. याप्रमाणें सर्व उपाय करून तो थकला. नंतर कोणींएकानें त्यास आमच्या वैद्यराजांस अगत्यपूर्वक नेऊन मुलाची प्रकृति दाखविण्याविषयीं सूचना केली. त्याप्रमाणें त्या मुलाचा बाप एकदोन दिवसांनीं वैद्यांचे घरीं येऊन त्यांस भेटून आपल्या मुलाची एकंदर स्थिति त्यानें सांगितली. तेव्हां बरें आहे, त्यास पाहून नंतर कसा काय तो विचार करूं, असा वैद्यांनीं जबाव दिला. त्या दिवशीं वैद्यांनीं त्यांस ठेवून घेतलें व दुसऱ्या दिवशीं ते काकोडें येथें जाण्यास निघाले. दोघेहि काकोडें येथें पोहोंचल्यानंतर जरा स्वस्थ होऊन वैद्यांनीं त्या मुलाची नाडी-

पाहिली. त्या वेळेस वैद्यराज काय परीक्षा करतात, हें पहाण्याकरितां त्याच्या घरीं लोकांची बरीच दाटी झाली होती. वैद्यांनीं बराचवेळ नाडी धरून सोडली व सांगूं लागले कीं " हा मुलगा फार धातुक्षीण झाला आहे, त्यामुळें त्याचें अग्निबळ कमी पडून खाल्लेल्या पदार्थांचा रस होऊं नये, उलटी व्हावी इत्यादि अनेक तऱ्हेचे विकार ह्यास होत असले पाहिजेत. आतां पिशाचासंबंधानें प्रकार असा दिसून येतो कीं, गेल्या सहासात महिन्यांमागें ह्यानें काजूच्या बिया बऱ्याच खाल्ल्या आहेत, तेणेंकरून ह्यास पित्ताश्रित वायु उत्पन्न होऊन तो ह्याच्या मस्तकास झोंबून ह्याची पिशाचवत् अवस्था झाली आहे, दुसरें कांहीं नाहीं. भूतबाधेसंबंधाचा हा प्रकार नव्हे. ह्याचें पिशाच आतांच काढूं या. विहीर कोठें आहे ती मला दाखवा." असें ह्मणून वैद्यराजांनीं त्या मुलास विहिरीवर नेण्यास सांगितलें. सर्वजण विहिरीवर एकत्र झाले. त्या मुलास एका कोळंबींत बसविलें व त्याच्या मस्तकावर एकसारखी थंड पाण्याची धार धरविली. तितकें पाणी मस्तकावर पडण्याबरोबर त्याचा पित्तगत वायु मागें हटून मुलगा चांगला बोलूं लागला, पिशाच पार निघून गेलें. तेथें जमलेली सर्व मंडळी आश्चर्यसागरांत बुडाली. त्यांची मति कुंठित झाली. सर्वत्रांनीं वैद्यराजांचा जयजयकार केला. त्यानंतर धातुक्षीणतेवर वैद्यराजांनीं दिलेलें औषध घेऊन तो मुलगा थोड्याच महिन्यांनीं चांगला झाला.

**उदाहरण ११ वें**—कोणी शहापूरचे गृहस्थ खांडोळें येथें आपला कुलदेव श्रीगणपतीचें दर्शन घेऊन कांहीं दिवस सेवा करावी ह्मणून आले होते. ते कांहीं दिवस तेथें सेवेस राहिले. श्रीगणपतीची सेवा आराधना वगैरे सर्व कांहीं भक्तिपुरःस्सर जरी ते करित होते, तरी त्यांची चर्या सूक्ष्मरीतीनें पहाणारांनां त्यांच्या अंतस्थ विचारतरंगांत उदासीनतेची झांक मारल्याचा भास होई. एके दिवशीं त्यांनीं वे. सं. रा. कृष्णंभट्ट नांवाच्या महाशाल येथील पुजाऱ्यांस विचारलें कीं, इकडे चांगले नाडीज्ञानविशारद वैद्य कोण आहेत? पुजाऱ्यांनीं त्यांस आमच्या वैद्यराजांचें नांव कळविलें व त्यांच्या कीर्तिचेंहि थोडेसें

वर्णन केलें. तें ऐकून त्या गृहस्थांनीं आमच्या चरित्रनायकांस नम्रतापूर्वक पत्र लिहून त्यांस खांडोळें येथें अगत्य येण्याविषयीं प्रार्थना केली. वैद्यांनीं पत्र वाचून मजकूर लक्ष्यांत घेतला व तिकडे जाण्याचें टरवून ते निघाले. खांडोळें मुक्कामीं पोहोंचल्यानंतर ते वरील गृहस्थांच्या बिऱ्हाडीं गेले. वैद्यराजांनीं त्यांची नाडी पाहिली व सांगितलें कीं, "वात, पित्त, कफ भेदेंकरून आपणास ह्मणण्यासारखा विशेष रोग नाहीं; तथापि आजकाल निरोगी मनुष्य सांपडणें कठीण. कांहीं कमजास्त प्रमाणानें सर्वांचे ठिकाणीं रोगाचा प्रादुर्भाव झालेला असतोच; परंतु त्याचें विशेष आधिक्य झालें ह्मणजे दुसरें रूप होत असतें. आपल्या नाडीवरून असें दिसून येतें कीं, आपणास कोणतीतरी चिंता प्राप्त झाली असावी व ती बहुतकरून प्राप्तीच्या संबंधानें. अर्थात् आपणास पूर्वीं एखादा चांगला हुद्दा असून त्याची बढती होण्याऐवजीं पूर्वीच्याच अधिकारावरून आपणास काढून दुसऱ्या कमी योग्यतेच्या जागीं आपली नेमणूक झाली असावी, ह्मणजे आपला पगार कमी झाल्यामुळें आपल्या मनानें त्याच बाबतींत पुनःपुनः चिंतन करण्याचें घेतल्यावरून आपणास हा चिंतारूपी रोग जडला असावा असें आह्मांस वाटतें, दुसरें कांहीं दिसत नाहीं." वैद्यांनीं असें सांगतांच खूण पटून त्या गृहस्थांनीं वैद्यांच्या पायांवर डोकें ठेवून ह्मटलें कीं, आपला हा परीक्षेचा अद्भुत प्रकार पाहून माझी मति गुंग झाली. मला दुसरेंतिसरें कांहीं बोलणें सुचत नाहीं. आपण साक्षात् अश्विनीकुमारवत् मला भासतां. धन्य आहे तुमची! आपली परीक्षा कितपत खरी ठरते हें पहाण्यासाठींच मीं मुद्दाम असा प्रकार केला. तरी मजकडून झालेल्या अपराधाची क्षमा असावी. याप्रमाणें त्यांनीं वैद्यराजांनीं सांगितलेला सर्व मजकूर खरा आहे असें सर्वांस कळविलें. अशा योग्यतेचे नाडीज्ञानविशारद वैद्य क्वचित् सांपडतील, ह्यांच्या अतर्क्य ज्ञानाची स्तुति करावी तेवढी थोडीच, असेंहि ते ह्मणूं लागले. त्यानंतर आमच्या वैद्यराजांनींहि त्यांचा निरोप घेऊन आपला मार्ग धरला.

**उदाहरण १२ वें.**—वैद्य **गोविंद नाईक पानवेलकर** यांस एक कन्या होती, तिचें त्यांनीं ह्मापसें येथील **रवळू जोशी** या नांवाच्या श्रीमंत तरुण गृहस्थाशीं लग्न लावून दिलें. ती मुलगी स्वभावानें चांगली असून रूपानेंहि साधारण बरी होती. सृष्टिक्रमानुसार तिला ऋतु प्राप्त झाल्यानंतर तिचे सर्व सुखसोहाळे होऊन चुकले व ती आनंदानें आपल्या पतीशीं नांदूं लागली. तिचा बाप चांगला सधन असून नवऱ्याचीहि स्थिति तशाच योग्यतेची होती. पण,

**सुखस्य दुःखस्य न कोपि दाता परोददातीति कुबुद्धि रेषा।**
**अहंकरोमीति वृथाभिमानः स्वकर्म सूत्रग्रथिताहि लोक ॥**

"सुख किंवा दुःख देणारा दुसरा कोणी नांहीं; दुसरा देतो ह्मणणें हें मूर्खत्व होय; तसेंच आपण करितों ह्मणणें हाहि अभिमान वृथा होय; तें (सुखदुःख) आपल्या बऱ्यावाईट पूर्वकर्मांच्या संस्काराप्रमाणें प्रत्येक प्राणिमात्रांस प्राप्त होत असतें." त्याप्रमाणें तिच्या तारुण्याच्या भरांत पूर्वजन्मार्जित कांहीं पातकामुळें वातरक्त अर्थात् रक्तपिती या महारोगानें तिला गांठलें. या रोगानें त्या तारुण्यसंपन्न अबलेवर आपला अम्मल बसविल्यामुळें तिच्या सर्व आप्तइष्ट मंडळीस फार वाईट वाटलें. कारण ह्या महारोगावर कोणताच औषधीप्रयोग चालत नाहीं, फक्त कांहीं साधुसंतांच्या कृपेनें किंवा तीर्थयात्रादि केल्यानें पूर्वकर्म बलवत्तर असल्यास त्याचा उपशम होतो, असें त्यांनीं पुष्कळांच्या तोंडून ऐकिलें होतें. तिलाहि आपला जन्म व्यर्थ वाटूं लागला. काय आपलें पूर्वजन्मींचें अघोर पातक असेल कोण जाणे, त्याचें फल मला ह्या जन्मीं भोगावें लागत आहे! भवितव्यतेपुढें सर्व प्रयत्न लंगडे आहेत. असो. प्रभूची इच्छा. असें ह्मणून ती सदोदित उदासीनवृत्तीनें रहात असे. एके दिवशीं तिनें आपल्या प्रिय पतीस सांगितलें कीं, आतां मजपासून संतानोत्पत्ति होण्याची आशा तुह्मी सोडा. तुमचें पुढें बरेंभलें झालें पाहिजे ह्याकरितां तुह्मीं दुसरें लग्न करा. माझ्या सहवासापासून आतां आपण दूर रहा. हा महारोग असून कांहीं सांसर्गिकहि आहे.

कदाचित् माझ्यापासून तुह्मांसहि तज्जन्य दुःखावस्था प्राप्त होईल. असें सांगून व भावी परिणामाकडे लक्ष्य देऊन आपल्या पतीपासून ती अलग राहूं लागली. तिच्या भर्त्यास तें तिचें बोलणें अक्षरक्षः खरें वाटलें. त्यावेळीं त्याच्या मनांत काय आठवलें असेल कोण जाणे ? त्यास कांहीं पश्चात्ताप होऊन तो तीर्थक्षेत्रादिकांची यात्रा करण्यास घरांतून एकदम निघून गेला तो अद्याप परत आला नाहीं ! असो. इकडे त्याच्या बायकोस पुष्कळ वैद्यांचे औषधोपचार करून पाहिले पण त्यापासून कांहीं फलप्राप्ति झाली नाहीं. नंतर आमच्या चरित्रनायकांस ह्यापसें येथें नेऊन तिची प्रकृति दाखविली. त्यांनीं सर्व प्रकार पाहून सांगितलें कीं, कांहीं अघोर पातकसंचयापासून अशा तऱ्हेचा रोग होत असतो. तेव्हां तिच्या पूर्वकर्मविपाकाप्रमाणें कांहीं अनुष्ठानें, नवचंडी, दानधर्मादि क्रिया करवून कांहीं सिद्धि मिळविली पाहिजे. त्यापूर्वी औषधाचा प्रयोग करणें निरर्थक होय. याकरितां प्रथम चांगल्या सुशील, सज्जन व कर्मनिष्ठ अशा ब्राह्मणांकडून हे संस्कार उरकून घ्या. मग औषध सुरु करूं. त्या कामास अमुक खर्च लागेल, असाहि त्यांनीं अजमास सांगितला. एवढें जरूर करण्याविषयीं सांगून वैद्यराज घरीं गेले. वैद्यांनीं सांगितलेलें त्यांनीं चांगलें मनावर घेतलें नाहीं. अशा स्थितींत कांहीं महिने गेल्यावर, वैद्यांनीं पूर्वी करण्यास सांगितलेला प्रकार केल्याशिवाय ते औषध बिलकूल द्यावयाचे नाहींत, हें सर्वांच्या लक्ष्यांत पूर्णपणें येऊन चुकलेंच होतें ह्मणून तिच्या बापानें सावईवेरें येथील कै. **नीलकंठ शास्त्री** यांस व आणखी कांहीं चांगल्या ब्राह्मणांस आणण्याची तयारी केली व त्याप्रमाणें आमच्या वैद्यराजांस अमुक दिवशीं हा प्रकार करण्याचें ठरलें आहे हें कळवून त्यांस त्या दिवशीं येण्याबद्दल विनंति केली. त्यांनींहि येण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें ठरलेल्या दिवशीं आमचे भिषग्वर्य **नीलकंठ शास्त्री** व इतर ब्राह्मण ह्यापसें येथें रा. **जोशी** यांच्या घरीं एकत्र झाले. शास्त्रीबुवादि वैद्यकविषयांत प्रवीण होते.

तिला पाहून ते आमच्या चरित्रनायकांकडे वळून ह्मणाले "या महारोगास अमुकअमुक औषध चालू करावें, असें आपणास वाटतें." वैद्यराजांनीं त्यांस सांगितलें कीं "आपलें ह्मणणें खरें आहे. पण तिच्या पूर्वकर्मविपाकांकडे तुमचें लक्ष्य गेलें नाहीं वाटतें. तें प्रथम सुधरून मग औषधीप्रयोग चालू केल्यास कांहीं फल होईल असें मला वाटतें." शास्त्रीबुवांसहि तें खरें वाटलें. त्याप्रमाणें अनुष्ठानादि संस्कार झाल्यानंतर आमच्या वैद्यराजांनीं तिला औषध दिलें. त्या औषधापासून पांचसहा महिन्यांनीं ती बरीच चांगली झाली. नेहमीं देवाची पूजा व गाईची सेवा भक्तिपुरःस्सर करण्याचा क्रम वैद्यराजांनीं तिला लावून दिला होता. त्याप्रमाणें ती रोज आपला तो क्रम करूं लागली. एके दिवशीं अकस्मात् त्या गाईचें शेंपूट तुटून पडलें व ती लांडी झाली. हा प्रकार त्यांनीं वैद्यराजांस कळविला नाहीं. पण त्यांनां हा झालेला प्रकार कर्णोपकर्णी कळून आला. त्याबरोबर त्यांनीं ती गाय दान करून सोडावी, असें सांगून पाठविलें. पण ती गाय त्यांनीं दान केली नाहीं. शेवटीं ती एका खडकावर पडून मेली. त्या बाईला औषध चालू होतेंच. दोन वर्षेंपर्यंत ती चांगल्या स्थितींत होती. मग पुनः तो रोग उपस्थित झाला. त्यावर आणखी अनुष्ठानादि संस्कार करण्यास वैद्यांनीं सांगितलें, पण तें कांहीं त्यांच्याकडून घडून आलें नाहीं. मग तशा स्थितींतच तिचा अंत झाला. अस्तु. अशा महारोगावरसुद्धां औषध देऊन त्यांनीं तिला चांगली केली होती. मग सांगितलेले योग्य संस्कार बरोबर अमलांत आले नसल्यामुळें त्या रोगांतच तिचा अंत झाला. याचा दोष वैद्यराजांकडे अर्थातच नाहीं. अशा महारोगावर त्यांच्या औषधाची मात्रा चालली, हें कांहीं लहानसहान नव्हे. हा त्यांजवर ईश्वरीप्रसादच ह्मटला पाहिजे. ह्या गोष्टीस आज सुमारें पंचवीस वर्षें होतील.

**उदाहरण १३ वें**—बारदेश प्रांतांत कांदोळी येथें **ड्याजान पिंत** या नांवाचे श्रीमान् व कुलीन गृहस्थ आहेत. ह्या घराण्याचा

पूर्वीपासून फार लौकिक आहे व ह्या घराण्यांत पूर्वी फार नामांकित पुरुष होऊन गेले. मशारनिल्हे **पिंत** यांचे पालवें येथील जामात **पेद्रु आंतोन कोंसेसांव लोब** ह्यांस इ. स. १९०० सालीं एक मोठें जीवावरचें दुखणें होऊन त्यांची जी अत्यवस्था झाली होती, तो प्रकार येणेंप्रमाणें:—

त्यांस प्रथम साधारण ज्वर येऊं लागला. पुढें तो वाढतांवाढतां त्यास जीर्णज्वराचें रूप प्राप्त झालें. कांदोळी येथील डा० **उबाल्द एफ कुञा** यांचें १५ दिवस औषध चालू झालें, पण त्यापासून कांहीं गुण आला नाहीं. नंतर तेथलेच डा. **एन. सी. सोज** यांचें औषध कांहीं दिवस चाललें, पण कांहींकेल्या ज्वर ह्मणून हटेना. दोघांहि डाक्टरांनीं आपली पराकाष्ठा केली, पण ताप यत्किंचितहि कमी न होतां तो वाढत्या प्रमाणावर जाऊं लागून दिवसेंदिवस रोग्याची शक्ति क्षीण होत चालली. शेवटीं रोगाची वृद्धि होऊन रोगी अगदीं जेरीस आला. त्याचें खाणेंपिणें हळूहळू कमी होत चाललें; अन्नावर अरुचि झाली, रक्तशोषण होऊन त्याचा अस्थिपंजर दिसूं लागला व त्याच्या अंगीं उठून बसण्याचेंहि त्राण राहिलें नाहीं. लहानशा बाहुल्यासारखा हा रोगी बिछान्यावर जराशी हालचाल करितो आहे असा दिसूं लागला. अशी त्याची झालेली प्राणांतिक अवस्था पाहून त्याचे सासरे आदिकरून सर्व मंडळीचा धीर खचला व ते मोठ्या संकटांत पडले. त्यांस कांहींच सुचेना. तरी त्यांनीं धीर धरून फार त्वरा करून पणजीच्या हॉस्पीटलचे डाक्टर व दुसऱ्या ठिकाणचे आणखी कांहीं मोठे डाक्टर आणून सल्ला केला. सल्ला होऊन असें ठरलें कीं, हा रोग आतां असाध्य झाला व ह्यावर आतां उपाय होणें कठीण! रोगी चारआठ दिवस काढील तर महद्भाग्य समजलें पाहिजे. रोगी जगणें कठीण, असें त्या सर्व डाक्टरांचें मत **पिंत** आदिकरून सर्वांस कळतांच सर्वांचा एकच कल्लोळ उसळला. त्याच्या बायकोनेंतर एकच आकांत मांडला व सर्व मंडळी निराश होऊन सचिंत बसली. रोग्याची आशा सुटल्यासारखी झाली. शेवटीं सर्व मंडळीची अगदीं निराशा होऊन आपल्या धर्मा-

प्रमाणें संतेसांव ( त्यांच्या धर्मांत मानलेला स्वर्गगति मिळण्याचा एक विधी ) वगैरे लावून सर्व कांहीं उरकून घेतलें. इतक्यांत त्यांचा कोणी नेरूळ येथील हिंदुगृहस्थ मित्र त्या रोग्याच्या समाचारासाठीं तिकडे गेला होता. त्यानें मि. **पिंत** यांस सांगितलें कीं, आपण जामातासाठीं मोठमोठे नामांकित डाक्टर, हिंदु वैद्य वगैरे आणून पुष्कळ औषधें केलीं, त्यापायीं पैशाचें तोंड पाहिलें नाहीं, होतेनव्हते तेवढे उपाय करून सर्व थकले व शेवटीं ह्याची आशा सोडून अंत्येष्टीसंस्कार उरकून घेण्यापर्यंत तुमच्या मनाचा कल झाला, तेव्हां आतां मी एक सांगतों तेवढें करा. तें हें कीं "आतांच रायबंदर येथें जाऊन वैद्यराज **त्रिविक्रम प्रभु** यांस आणून एकदाची त्यांस आपल्या जामाताची प्रकृति दाखवा. केल्यास कांहींतरी उपाय तेच करतील, असाध्य असल्यास ते स्पष्ट सांगितल्याशिवाय रहाणार नाहींत. गुण पडल्यास आपल्या मुलीचें सौभाग्य उदयास आलें असें समजूं." हें ऐकून मि. **पिंत** त्याच गृहस्थांस बरोबर घेऊन आमच्या भिषग्वर्यांच्या घरीं गेले. त्यांस भेटून सर्व प्रकार सांगितला व त्यांस घेऊन कांदोळी येथें आले. आमचे वैद्यराज तिकडे पोहोंचले त्यावेळीं तेथें दोघे ख्रिस्तियन डाक्टर तेथें होते. वैद्यराजांनीं लागलीच रोग्याची नाडी धरून एकंदर स्थिति पाहून सांगितलें कीं, ह्या रोग्याचें जीर्णज्वराचें रूप पालटून क्षय रोगाची तूर्त भावना झाली आहे. आपण यत्न करून पाहूंया. फलदाता परमेश्वर आहे. असें ह्मणून खिशांतून कांहीं पुड्या काढून दिल्या आणि सांगितलें कीं, दिवसास सकाळीं एक पुडी अमुक अनुपानांत द्यावी व वरती अर्धा शेर गाईचें दूध द्यावें व संध्याकाळींहि अर्धा शेर द्यावें. मिळून एक शेर दूध पोटांत हरप्रयत्न करून जाईसारखें करावें. ह्याप्रमाणें सात दिवस झाल्यानंतर माणूस पाठवा, ह्मणजे पुढची व्यवस्था करितां येईल. हें वैद्यांचें सांगणें ऐकून तेथें बसलेल्या डाक्टरांपैकीं एकजण त्यांस विचारूं लागला कीं, ह्याच्या पोटांत एक चमचाभर दूध जात नाहीं व इतकें दूध पचन

होण्याचें ह्याच्या अंगांत त्राण उरलें नाहीं. तेव्हां हें आपण कसें फर्माविलें? हें दूध पोटांत गेल्यास ह्या संसारांतले कदाचित् दोन दिवस काढावयाचा तो ताबडतोब इहलोकची यात्रा आटपील! वैद्यराजांनीं त्यास जवाब दिला कीं, ह्याच्या अंगांत शक्ति नाहीं ही गोष्ट खरी आहे, पण या औषधाचे अंगीं इतका तीव्र गुण आहे कीं, त्यायोगें तें दूध खाक होऊन जाईल. हें औषधच तें दूध पचविणार आहे. इतकें सांगून वैद्य घरीं जाण्यास निघाले. त्यांच्या पश्चात् त्या डाक्टरांनीं मि० **पिंत** यांस तें औषध चालू न करण्याविषयीं पुष्कळ सांगितलें, पण त्यांनीं त्यांस एकच जवाब दिला कीं, आमचीतर सर्वतोपरी निराशा झालीच आहे. तेव्हां आपण हें औषध देऊन पहाणार, काय होईल तें होओ. तें ऐकून डाक्टर मुकाट्यानें घरीं गेले. पुढें प्रयत्नांतीं तें औषध त्या रोग्याच्या पोटांत जाईसारखें केलें व नंतर दूधहि घातलें. तों काय चमत्कार सांगावा! त्याच दिवशीं रात्रौ रोग्याचा शौचमार्ग व मूत्रावरोध मोकळा झाला व दुसऱ्या दिवशीं तापहि जरा कमी भासूं लागला. तिसऱ्या दिवसापासून दूधहि तो आवडीनें घेऊं लागला व त्यास प्रखर भूक लागूं लागली. ह्याप्रमाणें सात दिवस औषध चालू झाल्यानंतर आठव्या दिवशीं वैद्यांचे घरीं मनुष्य जाऊन त्यानें झालेला प्रकार त्यांस कळविला. वैद्यांनीं आणखी १४ दिवसांचें औषध देऊन दुधाचें प्रमाण वाढविलें. ह्या एवढा गुण पडलेला पाहून सर्वत्रांस आनंदीआनंद झाला. डाक्टर लोकांस त्यांच्या चिकित्सेचें अतिशय आश्चर्य वाटलें. २१ दिवसपर्यंत औषध घेऊन तो रोगी चांगला झाला व घरांत हिंडूं फिरूं लागला. ह्याप्रमाणें काळाच्या तोंडांत सांपडलेल्या रोग्यास वैद्यराजांनीं हिसकावून घेऊन सर्वांस आश्चर्यसागरांत बुड्या मारण्यास लाविलें. डा० **उबाल्ूद एफ कुआ** हे फार चकित झाले व त्यांच्या चिकित्सेची फार प्रशंसा करूं लागले व त्यांनींहि आपल्या बायकोस त्यांचेंच औषध चालू केलें. नंतर मि० **पिंत** यांसी वैद्यराजांनीं सांगून पाठविलें कीं, आपले जामात चांगले झाले असें समजूं नका. त्यांनीं आमचे येथें पायीं

चालून आलें पाहिजे, ह्मणजे ते चांगले झाले असें मी समजेन. त्याप्रमाणें ते थोड्या दिवसांनीं आपल्या बायकोसह वैद्यराजांस भेटण्यासाठीं पायींच चालून गेले. त्यांच्याबरोबर त्यांचे सासरे व नेरूल येथील ते हिंदुगृहस्थहि होते. वैद्यराज भेटल्यानंतर सर्वांनीं फार आभार प्रदर्शित केले व ते ह्मणाले, ह्या तुमच्या उपकारांतून उतराई होण्यास आह्मीं असमर्थ आहों. पण त्यांतल्यात्यांत कांहींतरी, असें ह्मणून मि० **पिंत** यांनीं बरीच मोठी रुपयांची रकम त्यांच्यापुढें ठेवली. पण वैद्यराज त्या रुपयांचा स्वीकार करीनात. त्यावर मि० **पिंत** यांनीं पुष्कळ गोष्टी सांगून आपणास तुमच्या उपकारांतून कांहीं अंशींतरी उत्तीर्ण झालें पाहिजे, करितां ह्याचा स्वीकार करावाच, अशी आग्रहपूर्वक प्रार्थना केली व बळजबरीनें ती रकम वैद्यराजांस घ्यावयास लावली. पण असें ऐकण्यांत येतें कीं, मशारनिल्हे **पिंत** याणें दिलेल्या रकमेंतून वैद्यराजांनीं कांहीं ठेवून बाकीचे रुपये त्यांस परत केले. असो. त्यानंतर वैद्यांचा निरोप घेऊन ती मंडळी आपल्या घरीं गेली. ह्यांत वैद्यांच्या चिकित्सेची व थोरपणाची स्तुति करावी तेवढी थोडीच आहे.

**श्रीमत्** परमहंस परिव्राजकाचार्य श्री गोकर्ण मठाधीश महा विद्वान व जितेंद्रिय स्वामी **पूर्णप्रज्ञतीर्थ** हे एकदां **पर्तगाळ** मठांत अत्यवस्थ असल्याचें आमच्या चरित्रनायकांस समजलें. त्याबरोबर ते निघण्याची तयारी करून मार्गस्थ झाले. त्यांनीं मठांत पोहोंचल्यानंतर गुरुवर्यांस साष्टांग नमस्कार करून क्षेमकुशल विचारिलें व जरा शांतचित्त होऊन गुरुमहाराजांची नाडी पाहिली. ते फारच आजारी होते. बोलण्याचेंहि त्राण त्यांच्या अंगीं नव्हतें. त्यांचें रोग निदान लक्ष्यांत घेऊन वैद्यांनीं स्वतः कांहीं औषधें कुटून तीं शिजवून तयार केलीं व स्वामीजवळ जाऊन तें औषध घेण्याविषयीं विनंति केली. त्यांनींहि तें औषध फार आवडीनें घेतलें. ह्याप्रमाणें पंधरा दिवस तेथें राहून त्यांस त्या दुखण्यांतून बरें केलें. नंतर वैद्यराजांनीं गुरुमहाराजांच्या घरीं जाण्यास निरोप घेतला. त्यावेळीं स्वामींनीं

त्यांस कांहीं देण्याकरितां पुढें केलें. तेव्हां वैद्यांनीं सांगितलें कीं, जर गुरुमहाराजांच्या मनांतून कांहीं द्यावयाचेंच आहे, तर **श्रीवीर विठ्ठलाचा** प्रसाद द्यावा, एवढ्यानेंच मीं संतुष्ट आहें. दुसऱ्या कशाचीहि अपेक्षा नाहीं. तेव्हां स्वामींनीं त्यांस **श्रीवीरविठ्ठलाचा** प्रसाद व एक शालजोडी दिली. नंतर वैद्यराज गुरुचरणीं नत होऊन त्यांचा आशीर्वाद घेऊन घरीं परत आले.

**नेत्रावरून परीक्षा व निस्पृहपणा याचें उदाहरण**—एकदा श्रीमंत वै. वा. **रायु शेणवी धेंपे** यांच्या पत्नी बाळंत झाल्यावर कांहीं ताप वगैरे येऊन जरा आजारी पडल्या. तेव्हां आमच्या वैद्यराजांस आणून त्यांची प्रकृति दाखविली. वैद्यांनीं कांहीं औषधोपचार सांगून बाळंतिणीस तेल, नारळाचा रस वगैरे अंगास लावून जें स्नान घालितात, तें थोडे दिवस नुसतेंच तेल रसाशिवाय घालावें, अशी सूचना करून ते निघाले. बायकांच्या गृहकृत्यांतील व्यवस्थेकडे पुरुषांचें थोडेंच लक्ष्य असतें. बायकाबायकांत बोलणीं निघालीं कीं, हें वैद्यांनीं काय सांगितलें! तेल रस लावून बाळंतिणीस नहाण घातल्याशिवाय कसें चालेल? असा आपसांत सिद्धांत करून वैद्यांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष्य केलें व त्यांनां पूर्ववत् तेल रस मर्दन करून स्नानाची क्रिया चालू ठेविली. पुढें चारपांच दिवसांनीं वै. वा. **श्रीमंत गिरिधर शेणवी धेंपे** यांच्या पत्नीस ताप आला म्हणून त्यांनीं वैद्यांस आणून त्यांची प्रकृति दाखविली. वैद्यांनीं काढा लिहून देऊन सात दिवसपर्यंत घेतला म्हणजे प्रकृति चांगली होईल असें सांगितलें. वैद्य आले आहेत तेव्हां बाळंतीण बाईचीहि प्रकृति दाखवावी म्हणून श्रीमंतांकडून निरोप आला. वैद्य येण्याचे पूर्वी त्यांच्या अंगास तेल वगैरे लावण्याचें काम चालू झालें होतें. इतक्यांत वैद्यांस प्रकृति दाखविण्याविषयीं निरोप आला, तेव्हां काय करणार! बारीक तलम सुती वस्त्रें घेऊन दासींनीं त्यांच्या अंगावरचें सर्व तेल साफ पुसून काढिलें, तें अशा रीतीनें कीं, वैद्यांस त्याविषयीं कांहींच संशय येऊं नये. नंतर त्या दुसरें लुगडें नेसून वैद्यांकडे

यावयास निघाल्या. त्यांनां येतांना लांबून पाहूनच वैद्यांनीं श्रीमंतांस विचारलें कीं, त्यांची प्रकृति वगैरे बिघडली आहे काय? त्यांनीं सांगितलें कीं, तसें कांहीं नाहीं, उगीच प्रकृति पहावयाची. तेव्हां प्रकृति पहाण्याचें कांहीं कारण नाहीं, त्या बऱ्या आहेत; दिलेलेंच औषध चालू ठेवावें. असें सांगून श्रीमंताचा निरोप घेऊन वैद्यराज गाडींत बसले व गाडी चालू झाली. त्यांच्याबरोबर रा. पुरुषोत्तम नाईक नांवाचे थोरले गोव्यांचे गृहस्थ होते, त्यांस वैद्यांनीं सांगितलें कीं "त्या बाळंतीण बाईस उद्यां रात्रौ बराच कडक ताप येईल त्यांनां तैलमर्दन करून स्नान न करण्याविषयीं सूचना केली असतांहि तीच क्रिया त्यांनीं अमलांत आणली आहे."

त्यांनीं सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं बाळंतीणबाईस ताप येऊन सर्वांगाची लाही होऊं लागली. तेव्हां तिसऱ्या दिवशीं वैद्यांस आणण्याकरितां गाडी रवाना झाली व झालेला प्रकार त्यांस कळविण्यांत आला. वैद्यांनीं गाडी परत करून मुद्दाम उपरोधिक शब्दांनीं निरोप पाठविला कीं, त्यांनां तेल रस लावून चांगलें स्नान घालावें म्हणजे ताप उतरेल. असा निरोप **श्रीमंत धेंपे** यांस कळतांच त्यांनीं घरांत बायकांकडे चौकशी केली, तेव्हां खरा प्रकार त्यांस कळून आला. वैद्यांच्या परीक्षेचें त्यांनां फार आश्चर्य वाटलें! मग स्वतः श्री. **गिरिधर शेणवी धेंपे** गाडींत बसून वैद्यांच्या घरीं गेले आणि आपल्या नजरेआड हा प्रकार झाल्याचें सांगून त्यांनां घरीं घेऊन आले. वैद्यांनीं तापावर वगैरे औषध देऊन त्यांनां बरें केलें. निस्पृहपणाचा प्रसंग आला म्हणजे तो व्यक्त केल्याशिवाय कधीं रहावयाचें नाहीं, हा त्यांचा स्वभाव सर्वत्र सारखा असतो. श्री **धेंपे** घराण्याची वैद्यांवर फार निष्ठा आहे. श्री. रा. **विष्णु शेणवी धेंपे** हे देहानें जरा स्थूल झाले तेव्हां वैद्यांनीं त्यांस सकाळ संध्याकाळ फक्त व्यायाम करण्याचा क्रम लावून दिला. त्याप्रमाणें आज तागायत ते सकाळचे चार वाजतां उठून ग्रीष्म ऋतूंत रोज समुद्रकिनाऱ्यावरून दोन तीन तास व्यायाम करित असतात, त्यामुळें ते आरोग्यानें चांगले आहेत.

कालापूर येथील प्रसिद्ध व्यापारी व पणजींतील नाव्हेगेशन (आगबोटी) कंपनीचे चालक रा. रा. **रघुनाथ** उर्फ **अनंत प्रभु नाचनोडकर** ह्यांस या चारपांच वर्षांत जिवावरचीं दोनतीन दुखणीं होऊन त्यांची मोठी कठीण अवस्था झाली होती. रक्त विघडून तें ठिकठिकाणीं गोठून जरा उठून बसणें ह्मणजे त्यांना जिवावर येई. त्यावेळीं ते घरांत पडून राहिल्यामुळें त्यांच्या घडामोडीस बरीच अडचण येऊं लागली. पण आपल्या अक्कलहुशारीनें त्यांनीं सर्व सूत्रें सांभाळून धरिलीं होतीं. यांचें धैर्य मोठें विलक्षण आहे. ते कोणताहि प्रसंग आला तरी आपली छाती सोडित नाहींत. हे फार धोरणी असून सर्व कार्यकुशल आहेत. हे पुष्कळ लोकांस उपयोगीं पडतात, अशी यांची बहुतेक ठिकाणीं कीर्ति ऐकूं येते. यांना दोन तीनहि दुखण्यांतून आमच्या चरित्रनायकांनीं उठविलें आहे. यांची आमच्या वैद्यांवर इतकी श्रद्धा व भक्ति आहे कीं, वैद्यांनीं सांगितलेल्या पथ्यपाण्याच्या वगैरे व्यवस्थेंत यांच्याकडून किमपिहि अंतर होत नाहीं. वैद्यराज सांगतील तें प्रमाण मानावयाचें. एकदा एका रोग्यास पहावयास वैद्य शहापुरास गेले होते, त्याच संधीस यांचें दुखणें अनावर होऊन कठीण प्रसंग दिसूं लागला. त्यावरोबर वैद्यांस शहापूर येथें तार पाठवून कळविलें कीं, आपण अत्यवस्थ आहें, जरूर निघून यावें. वैद्य येण्यास दोन दिवस लागले तरी हरकत नाहीं, प्राण गेलातरी वेहत्तर, पण त्यांच्याशिवाय दुसऱ्याचें औषध घेणार नाहीं. कारण आपल्या रोगाचें खरें निदान त्यांसच होऊन चुकलें आहे, असें त्यांनीं लोकांस सांगितलें. तिकडे तार हातीं पडतांच वैद्यहि तसेच निघाले व घरीं येऊन तावडतोव त्यांच्या येथें गेले व त्यांची प्रकृति पाहून औषधोपचार करून सांगितलें कीं, भिण्याचें कांहीं कारण नाहीं. त्याप्रमाणें औषध चालू करून कांहीं दिवसांनीं ते बरे झाले. यांची आपल्यावर असलेली निष्ठा व भक्ति पाहून आमचे वैद्यराजहि त्यांचेवर फार खुष असतात.

एकदा रायबंदर येथील एका मनुष्यास पोटांत एक प्रकारचा

विकार होऊन एक गोळा उत्पन्न झाला. त्यायोगें तो मनुष्य फार त्रास पावूं लागला. एखादे वेळीं असह्य वेदना होऊन त्याजवर मरणप्राय संकट गुदरे. त्यानें अगोदर पुष्कळ वैद्यांचीं औषधें घेतलीं, परंतु त्यास होत असलेला त्रास यत्किंचितहि कमी होईना. शेवटीं तो मनुष्य केरी येथें कै. **पांडुरंग वैद्य** यांजकडे जाऊन त्यांस आपली प्रकृति दाखवून त्यानें आपणास होत असलेला विकार सांगितला. त्यांनीं त्यास औषध दिलें. तें औषध त्यांनीं एकदोन महिनेपर्यंत घेतलें पण त्याचा त्रास कांहीं कमी झाला नाहीं * त्यावेळीं आमचे चरित्रनायक वैद्य या नात्यानें उदयास येऊन थोडींच वर्षे झालीं होतीं. अखेरीस तो त्यांजकडे येऊन त्यानें आपला सर्व प्रकार त्यांस कळविला. वैद्यराजांनीं नाड़ी पाहून निदान लक्ष्यांत घेऊन औषध देण्याचें कबूल केलें. संध्याकाळीं रानांत जाऊन कांहीं झाडपाल्याच्या औषधी आणून त्याच्या रसांत कांहीं अन्य औषधांचें मिश्रण करून तें त्या मनुष्यास दिलें. ह्याप्रमाणें दोनतीन सप्तकें औषध घेतल्यानंतर तो मनुष्य त्या विकारांतून चांगला झाला. त्यास फार आश्चर्य वाटलें व मुद्दाम केरी मुकामीं जाऊन त्यानें **पांडुरंग** वैद्यांस तो सर्व प्रकार सांगितला. कांहीं दिवसांनीं तशाच तऱ्हेचा विकार आमच्या चरित्रनायकांच्या वडिलांस झाला व त्यानें ते फार बेजार झाले. एके दिवशीं त्यांनीं आपल्या मुलास (चरित्रनायकांस) सांगितलें कीं, केरी येथें **पांडुरंग वैद्यां**कडे जाऊन ह्या व्याधीस कांहीं औषध घेऊं. त्याप्रमाणें ते आपल्या चिरंजीवास बरोबर घेऊन केरी येथें गेले

---

*ही गोष्ट व मागेंहि एकदोन अशाच गोष्टी ज्यांत **केरकर** पितापुत्र वैद्य, महाशेलचे विद्यमान ऋषि **वामननाईक करंडे** व डा. **शिरगांवकर** यांजकडून 'प्रारब्धयोगानें' निराश होऊन आलेले कांहीं रोगी आमचे प्रभूकडून बरे झाले आहेत अशा ओघास आलेल्या गोष्टी दिल्या आहेत; त्यावरून आमच्या चरित्रनायकांपेक्षां ते कमी योग्यतेचे आहेत असें दाखविण्याचा माझा प्रयत्न नसून प्रभूप्रमाणेंच तेहि मला परममान्य आहेत, असें वाचकांनीं समजावें व मनांत विकल्प आणूं देऊं नये, अशी प्रार्थना करितों.

व वैद्यांस आपली प्रकृति दाखविली. त्यांनीं त्यांची परीक्षा करून सांगितलें कीं, ह्याच प्रकारचा रोग रायबंदरच्या एका मनुष्यास झाला होता, त्यास आपण औषध दिलें, पण शेवटीं तो **त्रिविक्रम प्रभु** या नांवाचे वैद्य तेथें आहेत त्यांचें औषध घेऊन बरा झाल्याचें त्या मनुष्यानें मला स्वत: येऊन सांगितलें. त्यांच्याकडे ह्या रोगावर दिव्य औषध आहे. तेव्हां आपण तिकडे जाऊन त्यांचेंच औषध घ्यावें. हें ऐकून चरित्रनायकांचे वडील त्यांस सांगूं लागले कीं, **त्रिविक्रम** ह्मणतात तो हा. हा माझा चिरंजीव. त्यावर **पांडुरंग** वैद्यांनीं क्षेमकुशल विचारून त्यांचें आदरातिथ्य केलें. आपणास तुमचें नांव मात्र ऐकून माहीत, कधीं तुमची आमची भेट झाली नाहीं. आतां तुह्मीच ह्यांना औषध द्या, असें त्यांनी सांगितलें. ह्या प्रकारें बोलणें होऊन वैद्यांचा निरोप घेऊन ते पितापुत्र तेथून निघून घरीं आले व लगेच त्यांनीं आपल्या वडिलांस औषध चालू केलें. त्या औषधानें त्यांना बरें वाटूं लागलें. पण हें त्यांचें दुखणें शेवटचें होतें. त्यांतून ते साफ बरे झाले नाहींत. एकदोन वर्षें त्यांनीं त्यांत काढलीं, पण अखेर त्यांतच त्यांचा शेवट झाला.

पणजींतील हॉस्पीटलवरचे आरोग्यखात्याचे मुख्य युरोपियन अधिकारी माजी डाक्टर **तॉरीस** हे आमच्या चरित्रनायकांस फार महात व त्यांच्या नाडीज्ञानाची अतिशय प्रसंशा करित असत. आपणाकडून जो रोग हटण्यासारखा नाहीं, त्यावर मुद्दाम चरित्र-नायकांस नेऊन त्या रोग्याची स्थिति दाखवून औषध देववावें. ह्या प्रकारें बहुतेक युरोपियन लोकांस त्यांनीं औषध देऊन बरें केलें आहे. मशारनिल्हे डा. **तॉरीस** हे ह्या वैद्यांनां सांगत कीं, आपण एक महिना येथील हॉस्पिटलांत जरा प्रॅक्टीस करून आपली औषधीक्रिया व त्यांचे गुणदोष वगैरे इतर डाक्टरांच्या अवलोकनांत आणावे, ह्मणजे मग आपणास सरकारी परवानगी मिळवून देण्याचा यत्न करितों. ह्यावर वैद्यांनीं सांगावें कीं, सरकारी परवानगी मिळवून आपणास विशेष काय करावयाचें आहे? स्वर्गालातर हात लावतां येणार नाहीं!

तिकडे येऊन आपण सांगतां तेवढे खटाटोप करण्यास अवकाश कुठें आहे? आणि व्यर्थ अशा भानगडींत कां पडावें! आतां आपण माझ्या करितां एवढे श्रम घेण्यास तयार झालां, ह्याबद्दल मी आपले फार आभार मानतों. डा० **तॉरीस** हे परोत्कर्षासहिष्णु नसून गुणीजनांचे फार चहाते होते.

डा० **तॉरीस** परलोकवासी झाल्यानंतर पणजींतील कांहीं पदवीधर ख्रिस्तीयन डाक्टर लोक आमच्या भिषग्वर्यांवर फार वक्र झाले व त्यांनां कचाटांत आणून त्यांच्यावर आवत् (खटला) करावा, अशी संधी पाहूं लागले. कर्मधर्मसंयोगानें वे० **वा. सुब्रावनाईक पानवेलकर** यांचा नातु पणजी येथें फार दुखण्यांत होता, त्याला पहाण्याकरितां आमच्या वैद्यराजांस आणलें वैद्यांनीं त्याची नाडी पाहून सांगितलें कीं, हा मुलगा ह्यांतून पार पडणें कठीण व ह्याला औषध देऊनहि निरर्थक. असें सांगून वैद्य तेथून निघून गेले. त्यानंतर ह्यापसें येथील एका भिकाजी नांवाच्या मनुष्याचें त्यास औषध दिलें. एके दिवशीं तो भिकाजी आमच्या वैद्यराजांस भेटला. त्यावेळीं त्यांनीं त्यास सांगितलें कीं, तो मुलगा जगणें कठीण. तेव्हां त्याच्या अंतसमयीं तुझें औषध पडल्यामुळें तुला अपेशास मात्र पात्र व्हावें लागेल, दुसरें कांहीं नाहीं. एवढें सांगून वैद्यराज निघाले. पुढें एकदोन दिवसांनीं तो मुलगा वारला. ही संधी पाहून त्या डाक्टरांपैकीं एकजण त्या मुलांच्या आप्ताकडे जाऊन विचारूं लागला कीं, त्याला कोणाचें औषध दिलें होतें? त्यांनीं आमचे वैद्यराज मुलाची प्रकृति पहाण्यास मात्र आले होते एवढें सांगितलें. त्याबद्दल त्याकडून लेखी लिहून घेऊन तो डाक्टर तेथून गेला व वैद्यांवर खटला करण्याच्या खटपटीस लागला. पण त्यास कांहीं सबळ पुरावा नव्हता हें एक व दुसरें आमच्या भिषग्वर्यांसहि कांहीं हिंदू वजनदार गृहस्थ तसेच कित्येक युरोपियन अम्मलदारहि चांगले होते. त्यांनीं तो खटला ( आवत् ) तसाच भिजत पडूं दिला. त्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. अमुक डाक्टर आपल्या विरुद्ध द्वेषानें खटला

करण्यास तयार झाला होता, इत्यादि बातमी वैद्यांस समजली. पुढें कांहीं महिन्यांनीं पणजी येथें जुन्या बाजारांत **रेग** उपनांवाचा एक ख्रिस्तियन व्यापारी होता (हा हल्लींच वारला). त्याच्या दोघां मुलांस एकदम दुखणें झालें. त्या दोघांचीहि प्रकृति धातुक्षीण झाली होती व त्यांत ज्वरानेंहि आपलें बिऱ्हाड करून त्यांस जर्जर करून सोडलें होतें. डा० **जुवांव फिलीप सोज** ह्यांचें औषध त्या मुलास चालू असे. (हाच डाक्टर आमच्या वैद्यांवर खटला करण्यास तयार झाला होता.) पुष्कळ दिवसपर्यंत त्या मुलांच्या बापानें मशार-निल्हे **सोज** याचें औषध दिलें, पण ज्वर कांहीं हटेना व त्यांची प्रकृति फार क्षीण होत चालली व अन्नहि खपेनासें झालें. शेवटीं त्याच स्थितींत त्याचा एक मुलगा वारला. बापास फार दुःख झालें व दुसऱ्या मुलाचीहि तीच गत होणार असें त्यास वाटूं लागलें. मग एका हिंदु गृहस्थानें त्यांस सांगितलें कीं, जर तुला दुसऱ्या मुलाची आशा आहे तर आतांच वैद्यराज **त्रिविक्रम प्रभु** यांस आणून मुलाची प्रकृति दाखीव. हें ऐकून त्या बापास केव्हां जाऊन वैद्यांस आणीन असें झालें व तशीच गाडी करून तो वैद्यांचे घरीं गेला व त्यांस भेटून सर्व हकीकत सांगितली व येण्याविषयीं प्रार्थना केली. वैद्यांनींहि त्याच्या विनंतीकडे लक्ष्य देऊन व त्याची बापुडवाणी स्थिति पाहून ते त्याच गाडींत बसून पणजीस आले. त्या मुलाची नाडी धरून एकंदर स्थिति पाहिली व त्यास औषध कोणाचें चालू आहे असें त्याच्या बापास विचारलें. त्यानें त्या डाक्टराचें नांव सांगितलें. तें ऐकून वैद्यांनीं त्यास इकडे घेऊन या मग त्याच्याच संमतीनें औषधाचा विचार करूं, असें त्यांस सांगितलें. त्याप्रमाणें त्या मुलाचा बाप डाक्टराचे घरीं जाऊन त्यास घेऊन आला. वैद्यांनीं त्यास विचारलें कीं, हा रोगी आपल्या हातून बरा होईल काय? त्यावर त्यानें जबाब दिला कीं, ह्याच्या भावास हीच व्याधी झाली होती, तो कांहीं माझ्या औषधानें जगला नाहीं, वरून ह्याहि रोगी बहुतकरून माझ्याकडून रोगमुक्त होईल अशी आपणास खात्री वाटत नाहीं.

ग्रंथ संग्रहालय

तेव्हां यास आपणच औषध द्यावें, असें सांगून तो डॉक्टर निघून गेला. आपल्याकडून हा रोग हटत नाहीं असें त्यानें कबूल केलेलेंच ह्यांस पाहिजे होतें. असो. मग वैद्यराजांनीं त्यास १४ दिवसपर्यंत औषध देऊन चांगलें केलें. त्याच्या बापास वैद्यांच्या चिकित्सेचें फार आश्चर्य वाटलें व पहिल्या मुलास ह्यांचेंच औषध दिलें असतें तर तो खचित जगला असता, असें वाटून त्यास फार हुरहुर लागली. पण काय उपयोग! गेली गोष्ट पुनः येत नाहीं. हा मुलगा हल्लीं ह्यात आहे.

# उपसंहार.

ह्याप्रमाणें, ह्या पुण्यपुरुषाच्या आणखी शेंकडों गोष्टी लिहिण्यासारख्या आहेत; परंतु विस्तारभयास्तव त्या येथें देत नाहीं, याबद्दल फार वाईट वाटतें. तरी 'शितावरून भाताची परीक्षा होते' ह्मणतात तशी एवढ्या वर दिलेल्या गोष्टींवरूनच सुज्ञ मनुष्यांस त्यांच्या अंगची योग्यता कळून येण्यास हरकत नाहीं. चरकसंहितेमध्यें अशा वैद्यांस 'प्राणाचार्य' अशी संज्ञा दिलेली आहे. आणि त्यांतच आत्रेय महर्षींनीं वैद्याची स्तुति करून वैद्य व रोगी यांचें परस्परांविषयीं वर्तन कसें असावें याबद्दल जें सांगितलें आहे, तें फारच महत्वाचें व सर्वांनीं लक्ष्यांत ठेवण्यासारखें असल्याकारणानें आमच्या प्रिय वाचकांकरितां येथें देऊन नंतर त्यांची प्रेमाची रजा घेऊं—

**शीलवान्मति मान्युक्तो द्विजातिः शास्त्रपारगः ।**
**प्राणिभिर्गुरुवत्पूज्यः प्राणाचार्यः सहिस्मृतः ॥**
**ये रसायन संयोगा वृष्या योगाश्च ये मतः ।**
**येच्चौषधं विकाराणां सर्वं तद्वैद्य संश्रयम् ॥**
**प्राणाचार्यं बुधस्तस्माद्धिमन्तं वेदपारगम् ।**
**अश्विनाविव देवेन्द्रः पूजयेदति शक्तितः ॥**
**अमरैरजरै स्ताव द्विबुधैः साधिपैर्ध्रुवैः ।**
**पूज्येते प्रयतैरेवमाश्विनौ भिषजाविति ॥**
**मृत्युव्याधिजरा वश्यैर्दुःख प्रायैः सुखार्थिभिः ।**
**किंपुनर्भिषजो मर्त्यैः पूज्याः स्युर्नाति शक्तितः ॥**

**अर्थः**—सच्छील, संपन्न, बुद्धिमान, जितेंद्रिय, चिकित्साकुशल, द्विजन्मा व आयुर्वेदपारंगत असा जो वैद्य त्यांस 'प्राणाचार्य' ही संज्ञा आहे. सर्व लोकांनीं त्याचें गुरुप्रमाणें पूजन करावें. शास्त्रांत सांगितलेले रसायनप्रयोग, वृष्णप्रयोग व रोगांवरील इतर औषधें हीं सर्व

वैद्यवर्यांच्या आधीन असतात: ह्मणून इंद्र जसा देववैद्य अश्विनीकुमाराची पूजा करितो, तशी सुज्ञ पुरुषांनीं आयुर्वेदपारंगत बुद्धिमान प्राणाचार्यांची मोठ्या आदरानें पूजा करावी. इंद्रासहवर्तमान सर्व देव हे अजर, अमर, ज्ञानी व जितेंद्रिय असूनहि आपले वैद्य जे अश्विनीकुमार त्यांस अत्यंत पूज्य मानितात, तर मृत्यु, व्याधि व जरा यांनीं ग्रासलेले आणि नेहमीं सुखाकरितां प्रयत्न करित असूनहि दुःख ज्यांच्या मागचें चुकलें नाहीं अशा मनुष्यप्राण्यांनीं आपल्या वैद्यास अतिशय पूज्य मानिलें पाहिजे, हें काय सांगावें?

वैद्य व रोगी यांचें परस्परांशीं वर्तन कसें असावें याविषयीं पुढील श्लोकांत सांगितलें आहे:—

**नाभिध्यायेन्न चाक्रोशेदहितं न समाचरेत् ।**
**प्राणाचार्यं बुधं कश्चिदिच्छन्ना युरनित्त्ररम् ॥**
**चिकित्सितस्तु संश्रुत्य योवा संश्रुत्य मानवः ।**
**नोपा करोति वैद्याय नास्ति तस्येह निष्कृतिः ॥**

**अर्थः**—'ज्या बुद्धिमान मनुष्यास दीर्घायु होण्याची इच्छा असेल त्यानें वैद्यास कधीं अपशब्द बोलूं नये, त्याच्याशीं कठोर भाषण करूं नये, मला गुण आल्यावर तुह्मांला अमुक बक्षिस देईन असें बोलून दाखवून किंवा न बोलून दाखवितां जो रोगी बरा झाल्यावर यथाशक्ति वैद्याचे उपकार फेडित नाहीं' तो, असें एक मोठें पाप करितो कीं, त्यास या लोकीं प्रायश्चित्तच नाहीं!

आतां वैद्यानें रोग्याशीं कशा प्रकारचा संबंध ठेवावा हें सांगतात:—

**भिषगप्यातुरान्सर्वान्स्वसुतानिव यत्नवान् ।**
**अबाधेभ्योहि संरक्षेदिच्छन्धर्ममनुत्तमम् ॥ ५५ ॥**
**धर्मार्थंचार्थकामार्थमायुर्वेदो महर्षिभिः ।**
**प्रकाशितो धर्मपरैरिच्छाद्भिः स्थान मक्षरम् ॥ ५६ ॥**
**नात्मार्थं नापिकामार्थं मथ भूतदयांप्रति ।**
**वर्तते यश्चिकित्सायां स सर्वमतिवर्तते ॥ ५७ ॥**
**कुर्वते येतु वृत्यर्थं चिकित्सापण्य विक्रयम् ।**

ते हित्वा कांचनं राशिं पांशुराशि मुपासते ॥ ५८ ॥
दारुणैः कृष्यमाणानां गदैर्वैवस्वतक्षयम् ।
छित्वा वैवस्वतान् पाशाञ्जीवितञ्च प्रयच्छति ॥ ५९
धर्मार्थं सदृशस्तस्य दाता नेहोपलभ्यते ।
नहि जीवित दानाद्धि दानमन्य द्विशिष्यते ॥ ६० ॥
परो भूतदया धर्म इतिमत्वाचिकित्सया ।
वर्तते यः स सिद्धार्थः सुखमत्यन्तमश्नुते ॥ ६१ ॥

**अर्थः**—"वैद्यानें सर्व रोग्यांस आपल्या पुत्राप्रमाणें समजून त्यांस रोगमुक्त करण्याचा यत्न करावा, हाच वैद्यांचा परम धर्म आहे. धर्म, अर्थ व काम हे तिन्ही पुरुषार्थ साधून मोक्ष साधतां यावा, एतदर्थ धर्मपरायण महर्षीनीं हा आयुर्वेदाचा उपदेश लोकांस केला आहे. जो वैद्य कोणत्याहि प्रकारच्या स्वार्थावांचून केवळ भूतदयेच्या दृष्टीनें रोग्यांची चिकित्सा करितो, तो सर्वश्रेष्ठ समजावा. याच्याच उलट जो वैद्य चिकित्सा ह्मणजे एक विक्रीचा जिन्नस आहे असें समजून केवळ आपल्या जीविकेकरितां तिचा उपयोग करितो, तो हातची सुवर्णाची रास सोडून देऊन मातीच्या ढिगाकरितां यत्न करित आहे, असें समजावें! दारुण रोगांनीं पीडित होऊन यमालयाकडे खेंचले जात असलेल्या रोग्यांस त्यांचे यमपाश तोडून जो वैद्य परत आणितो अर्थात् त्यांस जीवदान देतो त्याच्यासारखा दुसरा दाता या जगांत कोण आहे? या जगांत प्राणदानापेक्षां दुसरें मोठें दानच नाहीं. सारांश भूतदया हा आपला परम धर्म आहे, असें समजून जो वैद्य चिकित्सा करितो त्यासच यश मिळून सर्व प्रकारचें इह व परलोकांचेंहि सुख मिळतें.

आपल्या आर्यऋषींचे किती उदात्त विचार हे! कोणत्याहि गोष्टींत पाहिलें तरी स्वार्थत्यागपूर्वक स्वधर्मपरायणता ही त्यांची आश्चर्य करण्यासारखी असते. आमचे चरित्रनायक हे इतक्याहि गुणांनीं संपन्न असून निरभिमान आहेत. हे खरोखर सत्पुरुष आहेत, असेसुद्धां उद्गार कित्येक सज्जनांच्या तोंडून ऐकूं येतात व या ग्रंथ

लेखकाची त्यांचेविषयीं भावनाहि तितक्याच पूज्यतेची असल्यामुळें त्यानें हा प्रयत्न केला आहे ह्मटल्यास चालेल! दुसरे कोणी थोर गृहस्थ आमच्या या पूज्य प्राणाचार्यांचे शिष्य आहेत. ते आपला अनुभव असा सांगतात कीं, आपण त्यांच्याच कृपेनें प्राप्त झालेल्या अल्पमतीप्रमाणें रोग्यास औषधें वगैरे देतों. पण कोठें आपली मति अगदीं चालत नाहीं अशीं कांहीं प्रकरणें आढळतात तिकडे भक्त आपल्या देवाचे करितों तसें त्यांच्या नांवाचें स्मरण करून कांहींतरी औषध देतों. त्यावेळीं गुण हा हटकून ठेवल्याप्रमाणें असतो! दुसरे कित्येक गृहस्थ परक्याचें औषध घेण्याचा प्रसंग आला असतांहि **त्रिविक्रम प्रभूं**चेंच हें असें मानून त्याचें पूज्यभावनेनें स्मरण करून घेणारे आढळतात. लोकांचा पूज्यभाव ज्यांचे ठिकाणीं असतो ते पुरुष भगवद्विभूति नव्हेत काय?

दीनजनांस पाहून पोटांत कळवळणें, त्यांचें दुःख निवारण करण्याविषयीं मनोभावें झटणें, प्रसंगीं आपल्या शरीराची व जीवाचीहि परवा न करणें, परार्थ श्रम करित असतां न कंटाळणें ह्मणजे परोपकारार्थ देह झिजविणें, असत्याचा तिरस्कार करून सत्याचा दास होणें, देवब्राह्मणाच्या सेवेंत अगदीं उल्हासानें तनमनधन वेंचणें, तारुण्यापासून ब्रह्मचर्यव्रत धारण करणें, विषयोपभोगाचे ठिकाणीं—अनुकूलता असतांही—कडकडीत वैराग्य असणें व भगवत्प्राप्ति हीच मनुष्य जन्मांतील इतिकर्तव्यता समजणें, हीं लक्षणें सत्पुरुषांचीं नव्हेत काय?

**सतां सत्ययुगं साक्षात्सर्वदैवासतां कलिः।**

ह्मणजे सज्जनांला सर्व काळ सत्य (कृत) युगच असतें व दुर्जनाला सर्व काळ कलियुगच असतें. या व्यासोक्तीचा अनुभव अशा पुरुषांच्या ठिकाणीं दृग्गोचर होतो. यांनां कलियुगांतले युगधर्म कधींहि बाधत नाहींत ह्मणून अशांचें स्मरणहि कलिमलीचा दोष हरण करणारें असतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

कित्येक परोत्कर्षासहिष्णु मनुष्यांनां हे शब्द कर्णकटु लागतील,

त्यास उपाय नाहीं. रामदास तुकारामासारख्या विभूतींनांहि जर निंदक होते व आहेत, तर तेथें इतरांची काय कथा! त्यांचें मत बदलण्याकरितां ह्मणून कांहीं हें पुस्तक लिहिलेलें नाहीं. फक्त माझे प्रेमोद्गार मी यांत बोललों आहें. कोणास आवडतील त्यानें घ्यावे, नावडतील त्यानें सोडावे. अशा बाबतींत कोणाचेंहि मत बदलण्याचा कोणासहि अधिकार नाहीं व हा कायदा उभयतांसहि लागू आहे. असो.

आमच्या या भिषग्वर्यांची जीवनचर्या एखाद्या ऋषीप्रमाणें आहे. त्यांनी हें परोपकारव्रत धारण केल्यापासून त्यांच्या देहाकडे व लोकस्थितीकडे सूक्ष्मरीतीनें अवलोकन करतां मोठा चमत्कार दिसून येतो व कित्येक लोक कौतुकानें तो बोलतातहि. यांचे समोर बाल्यदशेंत असलेलीं मुलें तरुणजवान झालीं, तरुण असलेले पुरुष वार्धक्यानें क्षीण झाले, वृद्ध असलेले मनुष्य इहलोक सोडून गेले, बालिका पुत्रवती झाल्या व पुत्रवती असलेल्या पौत्रवती झाल्या. इतका फरक कालगतीनें लोकस्थितींत घडला, परंतु आमच्या प्रभूरायाचें शरीर व स्वरूप इतक्या अवधींतहि जशाचेंतसेंच आहे, त्यांत फारसा फरक झालेला दिसत नाहीं. हें त्यांच्या ब्रह्मचर्यादि स्वधर्माचरणरूप तपाचें फल होय * यांच्या चरित्राची सामुग्री मिळविण्याकरितां फिरत असतां त्यांनां पूर्णपणें ओळखणाऱ्या एका निर्मत्सर विद्वानाची गांठ पडली. त्यावेळीं त्यांनीं मोठ्या प्रेमानें माझ्याजवळ असे उद्गार काढले कीं, चारी आश्रमांतील लोकांनीं या सत्पुरुषाचें अनुकरण करण्यास योग्य आहे. भर तारुण्यांत ब्रह्मचर्यव्रत व देवद्विजपरायणता हे ब्रह्मचारी आश्रमाचे, त्याचप्रमाणें प्रपंचदक्षता व अतिथिसत्कार हे गृहस्थाश्रमाचे, पुनः ब्रह्मचर्यव्रत, लोककल्याणेच्छा व तृणासनशय्यादिक हे वानप्रस्थाश्रमाचे, आणि परोपकारशीलता, वैराग्यशीलता, निरहंकारता व भगवत्परायणता हे सन्यासाश्रमाचे अनुकरणीय गुण होत. कोणाहि व्यक्तीचें गुणदोषग्रहण करणें हें आपापल्या बुद्धिसत्वावर अवलंबून आहे, गुण घेणाऱ्या पुरुषाला भूमि, पर्वत, वृक्षादि जड पदार्थांपासूनहि

---

* पर उपकारें काया वाचा मन। त्येचे सुदर्शन रक्षी तया ॥ (तुकाराम)

घेतां येतात. (श्रीमद्भागवतांतील अवधूतांनीं केलेले चोवीस गुरु प्रसिद्धच आहेत.) त्याप्रमाणें गुणग्राहकशक्ति ज्यांच्या बुद्धीमध्यें नाहीं, किंवा मत्सरादि दुर्वृत्तींनीं ती विकारी झाली आहे, त्यांनां हा आनंद लाभत नाहीं, हें उघड आहे.

परमेश्वर सर्वांच्या बुद्धीचे मळ झाडो, देशांतील दुष्काळ व दुर्व्याधींचा नाश होओ, स्वधर्मांच्या ठिकाणीं सर्वांची प्रवृत्ति होओ. त्रिविधजनांची स्वदेशकल्याणार्थ एकविधता होओ, विजातीय व विधर्मी लोकांचा क्रमाक्रमानें मताभिमान मंदावो, प्रमदांचा मद कमी होऊन त्या स्वपातिव्रत्यानें आपल्या कुळाला व देशाला भूषणीभूत होओत, चाकरीनोकरीची जपमाळ घेऊन यवनांच्या उंबरठ्याशीं वर्णाग्रेसरांची जी जत्रा जमते ती यच्चयावत् कमी होओ, कावेबाजांच्या काव्यानें रसातळास गेलेलें आर्यांचें वैभव व आर्यत्व अस्तित्वांत येओ व सोहंचें तत्व कळण्यासाठीं सर्वेश्वराचे चरणीं दासोहं वृत्तीनें भजण्याची सर्वांची प्रवृत्ति होओ, अशी त्या त्रिजगन्नाथाचे चरणीं प्रार्थना करून हा उपसंहारात्मक लेख संपवितों.

ॐतत्सत्.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ, शाखा

# पुस्तककर्ते
# नारायण जगन्नाथ कामत यांचा शोचनीय मृत्यु.

आमचे मामा ती. स्व. रा. रा. नारायण जगन्नाथ कामत यांच्या आकस्मिक व अत्यंत दुःखकारक मृत्यूबद्दल चार शब्द लिहिण्याचा दुर्धर प्रसंग दुर्दैवानें माझ्या नशिबीं आला आहे!

ह्या चरित्राच्या जाहिराती आह्मीं १८९७ सालांत छापून प्रसिद्ध केल्या होत्या; परंतु अनेक अडचणी उपस्थित होऊन हें तयार होण्याचें काम तसेंच पडून राहिलें. गेल्या सहा महिन्यांच्या पूर्वीं आमच्या गोमांतकांतील पुष्कळ सद्गृहस्थांकडून हें चरित्र एकदा लवकर प्रसिद्ध करावें अशा उत्सुकतायुक्त सूचना येऊं लागल्या. तेव्हां सर्वत्रांची उत्कंठा पाहून पडून राहिलेलें काम हातीं घेऊन त्याचा शेवट लावावा, असें वै. वा. **कामत** यांनीं मनांत आणून तें त्यांनीं यथामति संपविलें. चरित्राची इत्थंभूत माहिती मिळविण्याबद्दल त्यांनीं जे अतिशय श्रम घेतले होते ते लिहून पुरवत नाहींत.

सर्व चरित्र लिहून संपूर्ण करून ते इकडे ( मुंबईस ) पुस्तक छापविण्याकरितां ह्मणून आले व सर्व व्यवस्था मला सांगून ज्या दिवशीं घरीं ( गोमांतकास ) जाणार त्याच दिवशीं त्यांस वातरोगाच्या रूपानें भयंकर काळाचें आमंत्रण आलें! अकस्मात त्यांच्या उजव्या कुशींत वायू चढून येऊन किंचित् कळ उत्पन्न झाली. वायूचा विकार ह्मणून घरगुती औषधोपचार पुष्कळ केले ( हा दिवस आषाढ व. ६ गुरुवारचा होता. ) परंतु गुण दिसला नाहीं. दुसऱ्या दिवशीं त्यांच्या वेदना फारच असह्य झाल्या ह्मणून येथील प्रसिद्ध डॉ. सर **भालचंद्र कृष्ण भाटवडेकर** यांस आणून प्रकृति दाखविली; त्यांनीं त्यांस उत्तम प्रकारें तपासून औषध सुरू केलें. औषधानें बराच गुण दिसला व खेंचूं

लागलेला वात हटला आणि घरांतल्या घरांत ते चांगले हिंडूंफिरूं लागले. दुखण्याच्या बाराव्या दिवशीं डाक्टरसाहेबांनीं त्यांस दूधभात जेवण्यास परवानगी दिली व त्यांनां स्वतासहि बरींच हुषारी वाटूं लागली; बारा वाजण्याच्या सुमारास ते जेवण्यासाठीं जेवणघरांत येऊन पात्रावर बसले व त्यांच्या सांगण्याप्रमाणें त्यांस दूधभात वाढिला. पूर्वीच्या आहाराप्रमाणें त्यांतील अर्धा भात ते जेवले व त्यावेळीं त्यांच्यासमोर श्रीरामाची तसबीर होती तिजकडे त्यांनीं एकसारखी टक लाविली व बराच वेळ स्तब्ध राहिले. त्या समयीं आमच्या मनास एक प्रकारचें उद्भुत वाटलें. नंतर त्यांनीं सुस्कारा टाकून समाधानपणानें व आनंदयुक्त मुद्रेनें 'राम, राम, राम', असे शब्द उच्चारून श्रीरामाचें स्मरण केलें व राहिलेला अर्धा भात जेवले. नंतर आमचेजवळ ते दोन गोष्टी बोलले व जाऊन बिछान्यावर पडले. मी व माझी मातोश्री जवळ होतोंच. माझ्या रोजच्या वहिवाटीप्रमाणें सरासरी पंधरा मिनिटांनीं जाऊन त्यांस पहातों तर त्यावेळीं मला त्यांच्या कलेवराशिवाय तेथें कांहींच दिसलें नाहीं! हर हर!! अशा अति भयंकर प्रसंगीं माझी व माझ्या प्रेमळ मातोश्रीची काय स्थिति झाली असेल, त्याची वाचकांनींच कल्पना करावी!! असा हा अकालिक भयंकर प्रसंग आह्मांवर गुदरेल, असें स्वप्नांतसुद्धां भासलें नव्हतें! हा दिवस ह्मणजे श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवाराचा होता. त्या पुण्यवान प्राण्यानें रामनामाचा घोष करून शिवदिनीं आपल्या आत्म्यास अक्षय्य स्वास्थ्य दिलें! तो दिवस श्रावणाच्या पहिल्या सोमवाराचा असल्यामुळें वैदिकब्राह्मण जिकडेतिकडे शिवपूजेंत गुंतलेले! कृत्य उरकविण्यास वैदिकब्राह्मण मिळेना. परंतु असा पुण्यवान प्राणी, जन्मांत ज्यानें आपल्या धर्माविरुद्ध कोणतेंच कृत्य बिलकुल आचरलें नाहीं आणि शेवटीं अशा शुभदिनीं व श्रीरामनामाचा घोष करून देह ठेविला, त्याचा शेवट चांगल्या प्रकारें झाल्याशिवाय कसा राहील? थोडक्याच वेळांत वैदिकब्राह्मण वगैरे मिळून स्मशानांतील कृत्य उरकविण्यास त्यांच्या चुलतबंधुंचा मुलगा **श्रीधर** हाहि मिळाला! त्यांच्या नाशिवंत पण पुण्यकारक देहाचा

शेवट चांगल्या रीतीनें लागला. भगवंतांनीं अर्जुनास गीतेंत सांगितलेंच आहे कीं "**जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्ममृतस्य च**" ह्मणजे जन्मलेल्या प्राण्यास मृत्यु व मेलेल्यास जन्म हे निश्चयेंकरून आहेतच. परंतु त्या त्या वस्तूचा नाश योग्यकाळीं झाला ह्मणजे त्या पासून जो कांहीं उचित आनंद होतो, तो अशा अकालिक नाशानें होणार नाहीं, हें उघड आहे; परंतु उपयोग काय? "**तस्मात् प्राक्तन रे समर्थ बळिया ललाट रेषा खरी!**" या उक्तीवर लक्ष्य देऊन दुःखाचें परिमार्जन केलें पाहिजे, यावांचून गत्यंतर नाहीं!

हे स्वभावानें फारच साधे, मनमिळाऊ, सर्वांशीं लीन व लोकप्रिय होते. ह्यांच्या अंगीं परोपकारबुद्धी, ईश्वरभक्ति व समाजसुधारणेची उत्कट इच्छा सतत वसत होती. ह्यांचें कुटुंब गेल्या दोन वर्षांच्या पूर्वीं निवर्तलें. यांना **जगन्नाथ** या नांवाचा एकुलता एक मुलगा व **दामोदर** या नांवाचा कनिष्ट बंधु असून वृद्ध मातोश्री यांच्यामागें शोक करण्यास राहिली आहे. ह्यांच्या अकालिक मरणानें त्यांच्या वृद्ध मातोश्रीस वृद्धापकाळीं पुत्रवियोगाचें दुःख असह्य होईल, यांत शंका नाहीं. परंतु तिणें आपला लाडका नातु **जगन्नाथ** आणि चिरंजीव **दामोदर** यांजकडे पाहून आणि जगाच्यां रहाटीकडे लक्ष्य देऊन या पुत्रशोकाचें दुःख गिळावें, त्याशिवाय इलाज नाहीं! त्यांचें मरणसमयीं वय अवघें ३७ वर्षांचें होतें. असो.

शेवटीं जगन्नियंत्याकडे एवढीच प्रार्थना करितों कीं, माझ्या परमपूज्य **नारायण** मामांच्या आत्म्यास आपल्या चरणकमलीं चिरकाळ ठेवून अखंडसुख द्यावें, एवढेंच त्रिवार मागून हा शोचनीय मृत्युलेख पुरा करितों.

**कृष्ण जगन्नाथ थळी.**

# अशा ह्या होतकरू विद्यार्थ्यांकडे आपल्या गोमांतकांतील लक्ष्मीपुत्र कळकळीनें लक्ष्य देतील काय?

हे दोन शब्द लिहून माझ्या स्वजातीय देशबांधवांस सूचना करावी असें वाटल्यावरून लिहित आहें; तरी माझ्या देशबंधूंनीं तिकडे अवश्य लक्ष्य द्यावें, अशी माझी त्यांस सविनय विनंति आहे व यांत कांहीं कमजास्त वाटल्यास त्यांजकडून मला क्षमा असावी, असेंहि मीं त्यांजकडे मागतों.

लिहिण्यास आनंद वाटतो कीं, आमच्या गोमांतक प्रांतांतील होतकरू विद्यार्थीमंडळीस दिवसेंदिवस विद्येची अभिरूचि वाढूं लागल्यामुळें बहुतेक विद्यार्थी मुंबई शहरांत व अन्य ठिकाणीं जाऊन विद्या संपादन करूं लागले आहेत. पैकीं कांहींजणांनीं मुंबईच्या युनिव्हर्सिटीच्या कांहीं परीक्षा पसार होऊन पुढें नेटानें अभ्यास चालविला आहे. कैक आयुर्वेद विद्यालयांत जाऊन वैद्यकीचा अपूर्व लाभ करून घेत आहेत व त्यांतील कित्येकांनीं परीक्षा देऊन सर्टिफिकिटेंहि मिळवलेलीं आहेत आणि असेहि कैक विद्यार्थी आहेत कीं, त्यांस स्वताच्या बलावर विद्या संपादन करण्याचें साधन कोणत्याहि प्रकारें अनुकूल नसून ते केवळ आपल्या दृढनिश्चयाच्या जोरावर अति **हीन स्थितींत** चारचौघां आश्रयदात्यांच्या साह्यावर आपला निर्वाह करून विद्या प्राप्त करून घेत आहेत. ज्यांनां ज्यांनां जशींजशीं साधनें आहेत त्याप्रमाणें त्या साधनांचा ते सदुपयोग करून घेत आहेत अशा ह्या त्यांच्या ( गरीब विद्यार्थ्यांच्या ) विकट प्रसंगीं त्यांजवर मुंबईतील **उदार** आश्रयदात्यांचे असंख्य उपकार आहेत, ते त्यांनीं पदोपदीं स्मरले पाहिजेत.*

---

* हे उद्गार माझ्या प्रत्यक्ष अनुभवावरून मी लिहीत आहें.

ग्रंथ संग्रहालय

तरी माझ्या देशबंधु विद्यार्थ्यांस त्यांत विशेषतः गरीब विद्यार्थ्यांस माझी प्रेमाची सूचना अशी आहे कीं, त्यांनीं आपल्या दृढनिश्चयाच्या जोरावर परमेश्वराच्या चरणीं दृढ भारिभार घालून बिलकुल न डगमगतां प्रसंगपरत्वें आलेल्या हीन स्थितींतून धैर्यानें वाट काढून विद्या संपादन करावी, ह्मणजे "निश्चयाचें बळ। तुका ह्मणे तेंची फळ" ह्या उक्तीप्रमाणें घडून कृतसंकल्प शेवटास जाईलच जाईल! अशा या गरीब होतकरू विद्यार्थ्यांकडे आपल्या धनीक देशबंधूंचें प्रेमपूर्वक लक्ष्य असलें पाहिजे, आणि लक्ष्य असणें हें त्यांचें कर्तव्यकर्म होय, असें माझ्या अल्प समजुतीस वाटतें. याबद्दल मी त्यांस सूचना केली पाहिजे असें नाहीं. खरोखर आपल्या गोमांतक प्रांताचें शिक्षणसंबंधींच नव्हे पण हरएक प्रकारें पाऊल पुढें पडत नसल्यामुळें आज ही अत्यंत शोचनीय स्थिति दिसत आहे. पण ती दिवसेंदिवस लयास जाऊन उच्च स्थिति प्राप्त होईल अशी सध्याच्या मानावरून सुचिन्हें भासत आहेत. ईश्वर करो आणि माझ्या मातृदेशाची दुःस्थिति लवकरच लयास जाओ अशी सर्वसाक्षी परमात्म्याकडे सदैव प्रार्थना करितों.

आपला नम्रसेवक,

**कृष्ण जगन्नाथ थळी.**

# सत्संग.

लिहिण्यास आनंद वाटतो कीं, आपल्या गोमांतक प्रांतांत **कुंभारजुवें** मुक्कामीं त्याच्या संपादकांकडून वरील नांवाचें मासिक पुस्तक गेल्या वर्षापासून सुरू होऊं लागलें आहे आंतील विषय 'सत्संगा'च्यां नांवास शोभतील असेच येत असतात. याबद्दल जास्त प्रसंशां करण्यांची आवश्यकता नाहीं तरी मुंबईतील अगर अन्य ठिकाणच्या उदार आश्रयदात्यांनीं आश्रय देऊन या सत्संग पुस्तकाचा संग्रह करावा, अशी मीं त्यांजपाशीं विनंति करितों. वे उदार आश्रयदाते या माझ्या विनंतिकडे लक्ष देतील अशीहि मला आशा आहे. वार्षिक वर्गणी टपालसुद्धां १ रु. ३ आ. व मागाहून १ रु. ११ आ. आहे.

पत्ता—
संपादक 'सत्संग'
**कुंभारजुवें, गोवा.**

**मु. प्रकाशक.**

# गोमांतकांतील आगाऊ सह्या देणाऱ्यां आश्रयदात्यांचीं नांवें.

## सिवोली.

| नांव | प्रति. |
|---|---|
| रा. रा. श्रीनिवास राय नाईक. | १ |
| ,, जनार्दन रामचंद्र जोशी. | १ |
| ,, नरसिंह विष्णू थळी. | १ |
| ,, अच्यूत सगूण थळी. | १ |
| ,, गोपाळ शाबी थळी. | १ |
| ,, दत्तात्रय आत्मा थळी. | १ |
| ,, त्रिविक्रम पुंडलीक थळी. | १ |
| ,, रामचंद्र पुरुषोत्तम नाईक. | १ |
| ,, दामोदर शेणवी लोटलीकर. | १ |
| ,, लक्ष्मीधर प्रभु मोये. | १ |
| ,, जनार्दन मुकुंद प्रभु मोये. | १ |
| ,, बाळकृष्ण वामन नाईक. | १ |
| ,, विष्णू दामोदर प्रभु मोये. | १ |
| ,, सगुण रायु प्रभु मोये. | १ |
| ,, नरसिंह रामचंद्र जोशी. | १ |
| ,, जगन्नाथ गोपाळ शेणवी डुकळे | १ |
| ,, दत्तात्रय पांडु प्रभु मोये. | १ |
| ,, मर्तु विश्वनाथ प्रभु मोये | १ |
| ,, पद्मनाभ नारायण नाईक. | १ |
| ,, विठ्ठल बाळकृष्ण केणी. | १ |
| ,, पांडुरंग वामन थळी. | १ |
| ,, वैकुंठ शंभु थळी. | १ |
| ,, गणेश गिरी नाईक. | १ |
| ,, दत्तात्रय रामचंद्र जोशी. | १ |
| रा. रा. विठ्ठल पांडु जोशी. | १ |
| ,, शाणू पांडुरंग शेट हळदणकर | १ |
| ,, तुकाराम शंभु फोगेरी. | १ |
| रा. पांडुरंग केशव नाईक. | १ |

## ओशेल.

| नांव | प्रति. |
|---|---|
| रा. रा. गोविंद वामन कामत रेडकर. | १ |
| ,, बाबू वामन कामत रेडकर. | २ |
| ,, दत्तात्रय ग. कामत रेडकर. | १ |
| ,, नारायण पु. कामत रेडकर. | १ |

## चिखली.

| नांव | प्रति. |
|---|---|
| डा. सखाराम बाबू लाड. | १ |
| रा. रा. शंकर लाला आमोणकर. | १ |
| ,, कृष्णाजी पु. आमोणकर. | १ |
| ,, श्रीपाद दाजी आमोणकर. | १ |
| ,, आत्माराम विनायक लाड. | १ |
| ,, सिताराम ज. आमोणकर. | १ |

## वागाळ.

| नांव | प्रति. |
|---|---|
| रा. रा. भिकू पुरुषोत्तम जोशी. | १ |
| ,, हरी नारायण प्रभु खडपे. | १ |

## हडफडें.

| नांव | प्रति. |
|---|---|
| रा. रा. मंगेश लाडोबा केंकरे. | १ |
| ,, रामचंद्र बाबुराव बस्तोडकर. | १ |
| ,, नारायण भिकोबा केंकरें. | १ |
| ,, विठ्ठल रामचंद्र केंकरे. | १ |

प्रति.

रा. रा. भगवंत रघुनाथ प्रभु. १
,, बाळकृष्ण भास्कर पालेकर. १
,, लक्ष्मण शेणवी झंजाळ. १

## कळंगूट.

रा. रा. गोविंद भिकू प्रभु. १
,, कृष्ण नरसिंह शेणवी दुकळे, १

## कांदोळी.

रा. रा. हरिकृष्ण व्यंकटेश भोबे. १
,, रामनाथ पुरुषोत्तम भट. १
,, केशव शेणवी डुकळे. १

## नागवें.

रा. रा. जयवंत शिवराम शेणवी मुंग्रे. १

## साळगांव.

रा. रा. अनंत बाळकृष्ण प्रभु. १
,, शाणु नाईक. १

## नेरूल.

रा. रा. रामचंद्र कृ. कामत चंदगडकर १
,, विष्णु दामोदर पई रायकर. १
,, जगन्नाथ रा. कामत भोंसुले १
,, सांतु पुरुषोत्तम वर्ठी. १
,, व्यंकटेश वामन भोबे. १
,, जगन्नाथ ज. प्रभु चिमलकर. १
,, अनंत सुब्राव भोबे. १
,, पांडुरंग नागेश भोबे. १
,, शंभू मंगेश वागळे. १
,, पुंडलीक कृष्ण भोबे. १

## हणजूण.

रा. रा. विठ्ठल लक्ष्मण संजगिरी. १

प्रति.

रा. रा. पांडुरंग वासुदेव कामत. १
,, विष्णु नारायण पई. १
,, केशव वासुदेव कामत. १
,, त्रिविक्रम पुरुषोत्तम कामत. १
,, अनंत पुरुषोत्तम कामत. १
,, वासुदेव विश्वनाथ कामत. १
,, आपा गोपाळ कामत. १
,, विनायक गोविंद कामत. १
,, श्रीधर जनार्दन कामत. १
,, रामचंद्र गिरी कामत बुडकुले. १
,, यशवंत त्रिंबक संजगिरी. १
,, रघुनाथ विठ्ठल कामत. १
,, मंगेश बापू कावाडी. १
,, वामन माधव कामत. १
,, मुरारी माधव शेट पेडणेकर. १
,, गोविंद शिवा शेट शिरोडकर. १
,, दामोदर शाबीशेट शिरोडकर १
,, पां. ना. शेट लाड शिरोडकर. १
,, बाबुराव तात्या शिरोडकर. १
मिस्तर आंतोन कालिस्त ब्रीत. १

## कायसुव.

रा. रा. गणेश नाईक बांदिवडेकर. १
,, रामचंद्र त्रि. नाईक. १
,, बाळकृष्ण त्रिविक्रम नाईक बांदिवडेकर. १
,, रामचंद्र सावळु प्रभु. १
,, वासुदेव गोविंद नाईक. १
,, माधव दामोदर नाईक. १

प्रति.

रा. रा. धोंडु विनायक भट मयेकर. १
,, सांतु रामचंद्र कामत. १
रा. नारायण आत्माराम नाईक. १

## आसगांव.

रा. रा. गिरी गोविंद कामत बुडकुले. १
,, गणेश रा. कामत बुडकुले. १

## पर्रे.

रा. रा. नारायण काशीबा नेर्लीकर. १
,, व्यंकटेश प्रभु १
,, पद्मनाथ वामन प्रभु. १
,, धर्मा लक्ष्मण नाटेकर. १
,, शामु वामन प्रभु. १
,, नरसिंह शिरू प्रभु. १
,, म्हाळपदीप शेट लोटलीकर. १

## म्हापसें.

वे. रा. रा. कृष्ण ना. नायक पुरोहित. १
,, रायु बाळकृष्ण कामत आडारकर. १
,, पुंडलीक अच्यूत जोशी १
,, सुब्राय रघुनाथ जोशी. १
,, वामन नारायण कामत. १
,, जगन्नाथ पुरुषोत्तम कामत. १
,, श्रीनिवास बाळकृष्ण कामत खडपे. १
,, सांतु प्रभु कोचकर. १
,, वामन रामचंद्र वेर्लिंगं. १
,, विष्णु सदाशिव जोशी. १
,, गोविंद ग. शेणवी महात्मे. १

## ओर्लें. प्रति.

रा. रा हरि वामन प्रभु. १

## वडें.

रा. रा. गणेश वासुदेव भोबे. १
,, केशव उपेंद्र भोबे. १
,, हरि भगवंत प्रभु चिंबळकर १

## गिरवडें.

रा. रा. दत्ताराम लक्ष्मण कामत बुडकुले. १

## वेरें.

रा. रा. पंढरिनाथ रामचंद्र पई. ४
,, नारायण गोविंद कामत. १
,, श्रीधर पुंडलीक पई धुंगट. १
,, उपेंद्र अनंत बोरकर. १
,, नरसिंह हेगडे. १
,, मल्लू जनार्दन कामत. १
,, यशवंत रामचंद्र कामत. १
,, पुरुषोत्तम अनंत पई. १
,, सुब्राव व्यंकटेश पई. १
,, अनंत पुरुषोत्तम पई. १
,, दत्ता वासुदेव बुयांव. १
,, पुंडलीक कृष्ण सांखळेकर. १
,, नागेश जिऊ नाईक भाटकर, १
,, पुंडलीक पई बरि. १
,, व्यंकटेश मुकुंद दांडे. १

## पकोशी.

रा. रा रघुनाथ पांडुरंग पई रायकर. १
,, माधव कामु पई रायकर. १
,, विष्णु कामत तिमले. १

प्रति.

रा. मुकुंद दुलबा नाईक. १

**पोंबुर्पे.**

रा. रा. नारायण गणेश प्रभु लवंदे. १
,, बाबी नारायण शे. न्हावेलकर. १
,, विठ्ठल दामोदर प्रभु. १
,, कृष्ण गणेश प्रभु लवंदे. १
,, पुंडलीक लक्ष्मण प्रभु. १
,, व्यंकटेश धाकू न्हावेलकर. १
,, गोविंद ना० शेट न्हावेलकर. १
,, विश्वनाथ वि.प्र.धारवठकर. १
रा. मर्तो पुंडलीक तारी. १

**असनोडें.**

रा. रा. फटु रा. शेणवी मुळगांवकर. १
,, रावजी महादेव शेणवी मुळगांवकर. १
,, रामचंद्र पुंडलीक नाईक. १
,, घनःशाम शेणवी अडवलपालकर. १
,, सिताराम विठू प्रभू. १
,, कृष्ण गिरी झाले चोडणकर १
,, जगन्नाथ शाबी पई कुचेलकर १
,, पुंडलीक घनःशाम पडवळ. १

**ठिये.**

रा. रा. मुकुंद पु. प्रभु पुनाळेकर. १

**विठ्ठोण.**

रा. रा. दत्ताराम बाळकृष्ण सांबारी. १
,, नारायण प्रभु झांबरे. १
,, पुंडलीक शेणवी राताबोले. १

प्रति.

रा. रा. कृष्ण पांडुरंग प्रभु काळोखे. १
,, गणपत पांडुरंग काळोखे. १
,, रामचंद्र शेणवी राताबोले. १

**नवीन गोवें.**

रा. रा. पांडुरंग रवळु प्रभु लवंदें. १०
डा० पु. वा. शिरगांवकर १
रा. रा. रामकृष्ण विठ्ठल राताबोले. १
,, जयराम सु. सावंत देशाई. १
,, अनंत सखाराम सामंत. १
,, गणेश दामोदर अग्नी. १
,, पांडुरंग म. शेणवी कुकळकर. ३
,, पंढरी रघुनाथ प्रभु. १
,, लक्ष्मण ना. नाईक भाटकर. १
,, राया आत्माराम शेट. १
,, राम व्यंकटेश केणी. १
,, भिका गंगाराम शेट. १
,, माधव कामत शंखावळकर. १
,, बाबली व्यंकटेश पई. १
,, रवळु लक्ष्मण प्रभु पोंबुर्पेकर. १
,, गोविंद पांडुरंग. १
,, रामा बाबलु कामत शंखावळकर. १
वे. रा. कृष्ण रामचंद्र कामत पुरोहित १
रा. रा. श्रीधर आत्माराम शिंगबाळ. १
,, रामनाथ वैजनाथ आचारी. १
,, गणु लक्ष्मण वागळे. १
,, पुंडलीक अ० केणी. १
,, बाळकृष्ण कामत झामाई. १

प्रति.

रा. रा सावळे शेणवी. १
,, पांडुरंग शिरवैकर. १
,, रावजी दत्तु महात्मे. १
,, यशवंत रामकृष्ण गवडकर. १
,, शांताराम स. साखरदांडे. १
, विठु नेवरेंकर. १
,, नारायण शेणवी वर्दे. १
,, महादेव यशवंत खानोलकर. १
,, नारायण प्रभु सिनारी. १
,, व्यंकटेश सुर्याजी पई. १
,, रघुनाथ कामत ह्मामाई. १
,, उष्णो नाईक सुकेरकर. १
,, वासुदेव पुंडलीक सुखटणकर. १
,, मुकुंद व्यंकटेश वागळे. १
,, यशवंत ना. शेट कळंगुटकर. १
,, नारायण पांडुरंग आगशीकर. १
,, कृष्णराव हरी सराफ. १
,, घन:शाम आत्मा. शेट बेंद्रे. १
,, ज्येनु विठ्ठल पई रायकर. १
,, गोविंद पांडुरंग केंकरे. १
,, नारायण कामत घाणेकर. १
,, गिरी कामत शंखावळकर. १
,, भास्कर विश्वनाथ नाडकर्णी. १
,, अनंत शेणवी अग्नी. १
,, विष्णु वावल्ल शिलिमखान. १
,, नानु तारकर पेडणेकर. १
,, सुब्राव प्रभु कोलवाळकर. १
,, रामचंद्र शेणवी लोटलीकर. १

प्रति.

रा.रा. पुंडलीक म. शेणवी कुकळकर. ३
,, विश्वनाथ कामत आजरेकर. २
,, अनंत वासुदेव प्रभु मोये. १
,, वैकुंठ मुकुंद जोशी. १
,, श्रीनिवास कामत बांबोळकर. २
,, पुंडलीक सि. प्रभु लवंदे. १
,, पुंडलीक स. अग्नी. १
,, राम पांडु शेट नागवेकर. १
,, रामकृष्ण नारायण शेट आमोनियस. १
,, धर्मा पांडुरंग शेट मडकईकर. १
,, पुरुषोत्तम विठ्ठल नाईक. १
,, पांडुरंग प्रभु कोलवाळकर. १
,, रायु रघुनाथ जोशी. १
,, व्यंकटेश राम शेट नागवेकर. १
,, सगुण विष्णु शेट मराठे. १
,, भास्कर बोरकर. १
,, दत्तात्रय आपा सरमळकर. १
,, सांतु शेणवी धेंपे. १
,, पांडुरंग शेणवी बोरकर. १
,, ठक्कर रावजी पेराज. १
,, रणछोडदास भोजा. २
,, मोतिचंद नागजी. २
,, काशीम रावजी. २
,, धनजी देवजी शेट. १
,, मोतिलाल आणि ब्रदर्स. १
,, जाधवजी खेरांजी. १
,, मि० इसमायल फतुना. १

प्रति.

रा. रा चूडामणी मिठाईवाला. १

प्रोफेसर पा. सालदान. १

मिस्तर दामियांव दुबार्त फर्नांदिस. १

,, रहीमतुला लालजी. २

## रायबंदर.

रा. रा. सुंब्राव उपेंद्र प्रभु लवंदे. ५

,, व्यंकटेश प्रभु. ४

,, गोविंद अनंत नाईक पानवेलकर. २

,, पुंडलिक व्यं. श्रीवर्धनकर. १

,, पुंडलीक प्रभु मोये. १

,, रघुनाथ पांडुरंग प्रभु सिनारी १

,, माधव जगन्नाथ नेवरेंकर. १

,, गिरी रघुनाथ कामत फार्शे. १

,, रामचंद्र विठ्ठल झाले. १

,, बावली कामत. १

,, धर्मा माधव प्रभु लवंदे. १

,, भगवंत नारायण झांबरे. २

,, अनंत शिवराम प्रभु सिनारी १

,, नारायण गोविंद भोवे. १

,, नारायण शेटये. १

,, अनंत विठ्ठल कामत. १

,, दत्ता श्रीधर प्रभु सिनारी. १

## पानवेल.

रा. रा. पुंडलीक अनंत कामत. २

## कुंभारजुवें.

वे रा.रा. विठ्ठल बाबु कामत वैद्य. १

,, रघुवीर शेणवी केंकरे. १

प्रति.

रा. रा. विनायक शेणवी वागळे. १

,, वासु फोंडु कामत खाडिये १

## डोंगरी.

वे.रा.रा. मुकुंदराज कृष्ण भट्ट वांदकर १

,, ,, अनंत नारायण भट्ट हळदुळे १

,, ,, विनायक नरसिंह भट्ट आचारी. १

,, ,, बाबल गिरी नाईक पानवेलकर. १

## कालापुर.

रा. रा. विष्णु महादेव मुदर्थ. १

,, दत्ता शेणवी भोंसुले. १

,, कृष्णनाथ नारायण नाईक. १

,, लक्ष्मण कामत मळईकर. १

,, हरि प्रभु नाचनोडकर. १

## मेर्सी.

रा. रा. गोपाळ शाणु पई वेर्णेकर. १

,, विठ्ठल ना. कामत बांबोळकर १

## ताळगांव.

रा रा. अनंत गोविंद जोशी. १

## सांकेरी.

रा. रा. नारायण मल्लु प्रभु झापणे. १

## शिरले गोर्वे.

रा. रा. पुरुषोत्तम फटी नाईक. १

,, साजरे अनंत शेणवी जुवांरकर १

,, अनंत रामचंद्र भांडारी. १

,, यशवंत फट्ठ पई. १

प्रति.

रा. रा. भगवंत शेणवी जुवारकर. १

,, गणेश मु. शेणवी जुवांरकर १

,, रायचंद्र शेणवी जुवांरकर १

**भागशी.**

रा. रा. शशिधर नारायण घारशे. १

**करमळ.**

रा. रा. शंकर नाईक. १

**डिचोली**

रा. रा दत्तुराव देसाई. १

,, रवळु मर्तो नाईक. १

,, नरसिंह बाळकृष्ण धोंड. १

,, नारायण पं. कडकडे. १

,, दामोदर र. कडकडे. १

,, दत्तात्रय शेणवी बोरकर. १

,, केशव विष्णु लावंणीस. १

,, व्यंकटेश पां. बांदोडकर. १

,, गणबा फटु कोळमुळे. १

,, नरसिंह पुरुषोत्तम धोंड. १

,, भगवंत शेट आळवे. १

**लामगांव.**

रा. रा. नारायणराव सरदेसाई

**मुरडी.**

रा. रा. शिवराम म. सूर्यराव देशाई. १

**सांखळी.**

रा. रा. व्यंकटेश वासु शेणवी शेटये. १

प्रो० दत्तात्रय आ सुखठणकर. १

,, हरी वासुदेव भट्ट. १

,, रघुनाथ गोपाळ कामत. १

**फोंडा.** प्रति.

रा. रा. विश्वनाथ शां. वालावलीकर. २

**सावई वेरे.**

रा. रा. सुब्राव जनार्दन पई रायकर १

,, त्रिविक्रम यशवंत पई रायकर १

,, दामोदर आत्मा सू. सरदेसाई. २

**मडकई-फोंडा.**

रा रा. दत्ता वामन कामत मडकईकर १

**वाडी-फोंडा**

रा. रा. फोंडू आवडू रामायणी. १

,, दत्तात्रय भास्कर नाईक प्र- सरदेशाई. १

**बांदोडे.**

,, विनायक शेणवी डांगी. १

,, पांडुरंग प्रभु लवंदे वळणीकर १

**कवळे.**

वे. रा. रा. सखाराम नारायण करंडे. १

,, रामकृष्ण अनंत भांडारी. १

,, सदाशिव सुब्राव केंकरे. १

**कुंडई.**

रा. रा. श्रीधर केशव कामत. १

**मठग्राम.**

रा. रा. सुब्राव लक्ष्मण नायक २

,, रायु पंढरिनाथ पई आंगले. १

,, दत्taराम शेणवी दळवी. १

,, वैकुंठ पई आंगले. १

,, शांबा नारायणशेट लोटलीकर १

,, श्रीनिवास पई फोंडेकर. १

,, अनंत श्री. पई रायतुरकर. १

| | प्रति. |
|---|---|
| रा रा. वैकुंठ शेणवी कुंकळकर | १ |
| ,, कृष्ण नाईक. | १ |
| ,, वैकुंठ नाईक. | १ |
| ,, व्यंकटेश नाईक. | १ |
| ,, विष्णु नाईक. | १ |
| ,, पुंडलीक भिकू नाईक. | १ |
| ,, यशवंत पां. शेणवी कीर्तनी. | १ |
| ,, दत्ताराम शे. महात्मे रेसेवदोर | |
| ,, गोविंद शे. शिवैंकर. | |
| ,, आत्माराम रा. शे. भोंसुले. | |

## मुरगांव,

| | |
|---|---|
| रा. रा. भास्कर सदाशिव केंकरे. | १ |
| ,, अनंत सुब्राव जोशी. | १ |
| ,, गोपाळ शिवराम रेडकर. | १ |
| ,, रायु भुतो रेगे. | १ |
| ,, बाळकृष्ण वेतु प्रभु सिनारी. | १ |

## जुवे-सांत इस्तेव.

रा. रा. अनंत लक्ष्मण पई बीर. १

## असोळडें.

रा. रा. विष्णु रंगाजी शेळंडेकर. १

## पारोडें-सासष्ट.

रा. रा. अनंत केशव शेणवी खरंगटे १

## कुसमण.

| | |
|---|---|
| रा. रा. व्यंकटेश प्रभु चिमलकर. | १ |
| ,, त्रिविक्रम श्री. कुकाळिकर. | १ |

## आमोणें केपें.

रा. रा. जगन्नाथ रामकृष्ण तळवंडकर १

## कुडाळ. प्रति.

| | |
|---|---|
| रा. रा. विश्वंभर पुरुषोत्तम केंकरें. | १ |
| ,, रामचंद्र अनंत नाईक. | १ |

## पेडणें

| | |
|---|---|
| रा. रा. परशुराम ना. प्रभु देसाई. | २ |
| ,, गणेश वामन प्रभु देसाई. | २ |
| ,, वामन धोंडू शेणवी देसाई. | २ |
| ,, बाळकृष्ण नि. शेणवी देसाई. | २ |
| ,, कृष्णाजी नि. शेणवी देसाई. | १ |
| ,, लाडू नारायण नाडकर्णी. | १ |
| ,, कृष्णाजी घ. शेणवी देसाई. | १ |
| ,, श्रीनिवास प्रभु लवंदे. | १ |
| ,, विष्णु नारायण शेट चणेकर. | १ |
| ,, जयराम प्रभु खडपे. | १ |
| ,, रामचंद्र पुंडलीक प्रभु देसाई. | १ |
| ,, दत्ताराम सदाशिव तेलंग. | १ |
| ,, पुरुषोत्तम घनःशाम देसाई. | १ |
| ,, जगन्नाथ शिवाजी देसाई. | १ |
| ,, केशव साजबा प्रभु देसाई. | १ |

## आरोबा.

रा रा. दत्ताराम विठ्ठल शेणवी ज्याकी १

## पेडणें-विरनोडें.

रा. रा. जयराम रामकृष्ण नाडकर्णी. १

## मालपें.

| | |
|---|---|
| रा. रा. केशव लाडोबा शिवेश्वरकर. | १ |
| ,, दत्तात्रय दिवाकर भट धुपकर. | १ |

## तुयें.

रा. रा. वासुदेव गोविंद कामत. १

**पारसें.** प्रति.

रा रा रामकृष्ण श्रीराम प्रभु देसाई. ८

,, पुंडलीक विठोबा प्रभु. १

,, दत्तात्रय सदाशिव महात्मे. १

,, दत्ताजी आ. प्रभु देसाई. १

,, शिवराम रघुवीर लाड. १

,, आपा पुंडलीक शेट सोनार. १

**मोरज.**

रा. रा. नारायण पांडुरंग नाईक. १

,, सगुण आपा शेट गांवकर. १

,, भिकोबा पांडुरंग मोरजकर. १

,, बाबू आ. शेट गांवकर. १

**कोरगांव.**

वे. रा. रा. पांडुरंग शास्त्री पित्रे. १

,, जनार्दन शि. प्रभु देसाई १

,, विठ्ठल कृष्ण प्रभु देसाई. १

,, नारायण काळे प्रभु देसाई. १

,, सांतु नारायण घोडगे. १

**केरी.** प्रति.

रा. रा. कृष्णाजी पांडुरंग सांखोळकर. १

**आरंबदें.**

रा. रा. दत्तोबा रामचंद्र जोशी. १

,, केशव गं. प्रभु साळगांवकर १

,, आत्माराम अनंत प्रभु झांबरे. १

**शिरोडें.**

रा. रा. रघुनाथ वामन गुडे. १

**सातारा-चिंचणोर.**

वे रा. रा. मुकुंद गो. महाभागवत. १

**वेंगुर्ले.**

वे. रा. रा. आत्माराम गो. लिमये. १

,, भिका विश्वनाथ गिंडे. १

**उडपी.**

रा. रा. गुंड्ड पद्मनाभ नाईक. १

**बेळगांव.**

वे. रा. रा. भागवतराव रा. पुनरेकर. १

☞ पुस्तक कर्त्यांच्या आकस्मिक मृत्युमुळें गोमांतकांतील बहुतेक गांव सद्या घेतल्याशिवाय राहिलेले आहेत.

963
REFBK-0000183

# मुंबईंतील आश्रयदात्यांचीं नांवें.

| | प्रति. |
|---|---|
| श्री० रा. रा. शांताराम नारायण दाभोळकर. | १ |
| ,, अनंत नारायण सांबारे, L. M. & S. | १ |
| ,, विश्वनाथ सोकरजी त्रिलोकेकर, L. M. & S. | १ |
| ,, शामराव बाळकृष्ण नायक, L. M. & S. | १ |
| ,, रा. ब. शांताराम विनायक कंटक, L. M. | १ |
| ,, विठ्ठल सदाशिव वागळे L.M. & S. | १ |
| ,, दत्तात्रय बळवंत चिटणीस सालिसिटर. | १ |
| ,, निळकंठ आत्माराम शिवेश्वरकर B. A. LL. B. | १ |
| ,, वामन रामचंद्र केरकर B. A. LL. B. | १ |
| ,, दत्ताराम गणपत दळवी, M. A. LL. B. | १ |
| ,, गोविंद मल्लिनाथ ठेंगे B. A. | १ |
| ,, पंढरिनाथ काशिनाथ तेलंग, B. A. | १ |
| ,, जयवंत रामचंद्र गुंजीकर, B. A. B. Sc. | १ |
| ,, विठ्ठल शांताराम संजगिरी, B. A. | १ |
| ,, हरिशंकर हरिश्चंद मंत्री, B. A. | १ |
| ,, जनार्दन यशवंत दाभोळकर, हायकोर्ट वकील. | १ |
| ,, दत्तात्रय वासुदेव पिळगांवकर, हायकोर्ट वकील | १ |
| ,, विष्णु बाळकृष्ण पंडित, L. C. E. | १ |
| ,, दत्तात्रय रामचंद्र भांडारे, L. T. M. | १ |
| ,, सुंदरनाथ दिनानाथ खोटे मुं. का. सभासद | १ |

| | प्रति. |
|---|---|
| रा.रा. सदानंद त्रिंबक भांडारे | २ |
| ,, बलवंत सखाराम दाभोळकर | १ |
| ,, दिनानाथ रघुनाथ दाभोळकर | १ |
| ,, गणपतराव पुंडलिक धुमटकर | १ |
| ,, दिनकर शिवराम भांडारकर | १ |
| ,, महादेव बी. बागळे हेडक्लार्क मुं. स्कूल ऑफ आर्ट | १ |
| ,, महादेव वि. धुरंधर आर्टिस्ट | १ |
| ,, कृष्णराव सखाराम मसुरेकर | १ |
| ,, वसंतराव पुंडलिक धुमटकर | १ |
| ,, जिवाजी कृष्ण परुळकर | १ |
| ,, शंकर विठ्ठल देसाई | १ |
| ,, दत्ताराम वि. मांडगांवकर | १ |
| ,, जिवाजी ना. खांडाळेकर | १ |
| ,, नानु सुर्याजी महात्मे | १ |
| ,, मोरोबा पांडुरंग केणी | १ |
| ,, मेघशाम नारायण लाड | १ |
| ,, सखाराम मंगेश बागळे | |
| ,, शांताराम जगन्नाथ संजगिरी | १ |
| ,, राजाराम शंकर मसुरेकर | १ |
| ,, मंगेश रामकृष्ण तेलंग | १ |
| ,, शिवराम नारायण रेगे | १ |

| | प्रति. |
|---|---|
| ,, महादेव दत्तात्रय नाडकर्णी | १ |
| ,, भगवंत पांडुरंग लाड | १ |
| ,, केशवराव व्यंकटेश कामत | १ |
| ,, नारायण केशव रेगे | १ |
| ,, भिकाजी कृष्णराव भांडारे | २ |
| ,, नारायण धोंडबा दिवाडकर | १ |
| ,, यशवंत गौरोबा दळवी | १ |
| ,, शांताराम ना. ह्मशेलकर | १ |
| ,, दामोदर फटुबा भांडारे | १ |
| ,, परशुराम ना. नावर | १ |
| ,, रा. वि. रेगे | १ |
| ,, कृष्णराव नारायण पाटकर | १ |
| ,, विष्णु गणेश रेडकर | १ |
| ,, विष्णु गंगाधर सुखटणकर | १ |
| ,, शंकर महादेव मतकरी | १ |
| ,, नारायण भाई बर्वे | १ |
| ,, पुरुषोत्तम आत्माराम | १ |
| ,, महादेव पांडुरंग गवाणकर | १ |
| ,, मंगेश अनंत लाड | १ |
| ,, सिताराम विष्णु पराडकर | १ |
| ,, दादाभाई नारायण धुरु | १ |
| ,, दत्ताराम र. राजाध्यक्ष | १ |

या पुस्तकास मुंबईतील थोर लोकांनीं आश्रय दिल्याबद्दल प्रकाशक त्यांचा फार आभारी आहे.

## लवकरच प्रसिद्ध होईल.

गोमांतकांतील प्रसिद्ध साधु कैवल्यवासी **कृष्ण जगन्नाथ भट्ट बांदकर यांचें चरित्र व समग्र कवितासंग्रह.** ग्राहकांनीं आगाऊ सह्या देण्याची कृपा करावी, आगाऊ सही देणारांस एक रुपया पडेल, व मागाहून १॥ रुपया किंवा त्याहून ज़ास्त पडेल. खालील पत्त्यांवर पत्रव्यवहार करावा. हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर प्रयत्नांति गोमांतक-महाशेल येथील प्रसिद्ध ग्रंथकार व टीकाकार कै. **महेश्वर भट्ट** व केरी येथील कै. **रणशूर** व मुत्सुद्दी **जिवबा दादा बक्षी** यांचींहि चरित्रें लिहिणेचा विचार आहे. ईश्वर हेतु सुफल करो.

रा. रा. **रामचंद्र कृष्ण कामत चंदगडकर.**
मु. नेरूल पोष्ट नवीन गोवा.

रा. रा. **कृष्ण जगन्नाथ थळी**
पोष्ट गिरगांव
मुंबई.

## विक्रीस तयार.

गोमांतकांतील प्रसिद्ध भिषग्वर्य रा. रा. **त्रिविक्रम प्रभु लवंदे यांचें चरित्र** सुरेख कापडी बांधणी किंमत पोष्टसह एक रुपया, व गोमांतकांतील प्रसिद्ध साधु कैवल्यवासी **कृष्ण जगन्नाथ भट्ट बांदकर** कृत **"स्वात्मतत्वामृत शतकम्"** किंमत पोष्टसह आठ आणे खालील पत्त्यांवर मिळतील.

वे. रा. रा. मुकुंदराज कृष्ण
बांदकर डोंगरी-गोवा.
रा. रा. दामोदर जगन्नाथ कामत
हणजूण, बारदेश-गोवा.

कृष्ण जगन्नाथ थळी,
पोष्ट गिरगांव-मुंबई.

# मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,
## गिरगांव—मुंबई.

| नंबर. | नांव | किंमत. | टपालखर्च. |
|---|---|---|---|
| १ | धाकट्या सूनबाई. † | ०-८-० | ०-१-० |
| २ | संसारांतल्या गोष्टी. | ०-६-० | ०-१-० |
| ३ | गुणसुंदरी. † | १-०-० | ०-२-० |
| ४ | नवयुग. † | १-०-० | ०-२-० |
| ५ | सरस्वती. † | ०-१०-० | ०-१-० |
| ६ | रमा आणि माधव. | ०-४-० | ०-०-६ |
| ७ | मुरारराव. | ०-४-० | ०-०-६ |
| ८ | हंसदूत. | ०-२-० | ०-०-६ |
| ९ | महाराष्ट्र महिला पूर्वार्ध. | १-४-० | ०-२-० |
| १० | महाराष्ट्र महिला उत्तरार्ध. | १-४-० | ०-२-० |
| ११ | मनोरंजन पुस्तक ४ थें. | १-८-० | ०-२-६ |
| १२ | मनोरंजन पुस्तक ५ वें. | १-८-० | ०-२-६ |
| १३ | मनोरंजन पुस्तक ६ वें. | १-१२-० | ०-३-० |
| १४ | मनोरंजन पुस्तक ७ वें. | २-०-० | ०-३-० |
| १५ | मनोरंजन पुस्तक ८ वें. | २-८-० | ०-३-६ |
| १६ | महाराष्ट्र महिला वार्षिक वर्गणी. | | २-८-० |
| १७ | मासिक मनोरंजन वार्षिक वर्गणी. | | २-८-० |
| १८ | स्त्रियांची कर्तव्यें. | १-०-० | ०-१-० |

† कापडी बांधणीचें पुस्तक हवें असल्यास ४ आणे जास्त पडतील.